# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ- वाणिज्य शिक्षक मंडळ

**चर्चासत्र : २००४-०५**

दिनांक ७ व ८ जानेवारी २००५

● स्थान ●

सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय

तुळशीबाग, महाल, नागपूर

Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ–वाणिज्य मंडळ

**स्थापना-२०००**

## ■ प्रवर्तक ■



प्रा. राजाभाऊ दूरुगकर



डॉ. चंद्रशेखर पाध्ये



डॉ.हसनअली हुद्दा



डॉ. अरुणा सोनेगांवकर



प्रा. मधुकर बोरकर



प्रा. आशा लांजेवार

व

प्रा. नारायण मेंडुले

## • मंडळाची उद्दिष्टे •

१. विदर्भातील कनिष्ठ महाविद्यालयांतर्गत अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिक्षकांना संघटित करणे.
२. अर्थशास्त्र व वाणिज्य विषय शिक्षकांच्या ज्ञानात भर घालणे.
३. अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील नवीन प्रवाह शिक्षकांव्दारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे.
४. शिक्षकांचे ज्ञान विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे.
५. अधिक कार्यक्षमतेसाठी विविध अध्यापकीय साधनांचा उपयोग करणे.
६. अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील विविध शाखांची माहिती करुन घेण्यासाठी खुल्या चर्चा सत्राचे आयोजन करणे. तसेच विविध विषयावरील लघुशोध निबंधाचे वाचन करणे.
७. ग्रामीण भागातील शिक्षकांचा मागास दृष्टीकोन बदलवणे.
८. कालबाह्य विचारधारा दूर करुन आधुनिक विचारांची जाणीव निर्माण करणे.
९. त्यांच्या कल्पनेला वाव देऊन सामान्य व्यासपीठ उपलब्ध करुन देणे.

Scanned by CamScanner

## उद्घाटन समारोहाचे मान्यवर


मा. नितीन गडकरी


मा. वसंतरावजी पुरके


मा. बाळासाहेब महाजन


डॉ. वि.स.जोग

स्वागताध्यक्ष


डॉ. सतीश शास्त्री

## • समारोपाचे मान्यवर •


डॉ.एस.ए. देशपांडे


डॉ.एस.बी. चक्रवर्ती


मा.एम.एन. कापगते


मा.एम.जी. जवंजार

Scanned by CamScanner

## केंद्रिय कार्यकारी मंडळ

अध्यक्ष : डॉ. चंद्रशेखर पाध्ये
सचिव : प्रा. राजाभाऊ दूरुगकर
उपाध्यक्ष : डॉ.अरुणा सोनेगांवकर
कोषाध्यक्ष : डॉ. हसनअली हुद्दा
सदस्य : प्रा. दत्तात्रय सोनेगांवकर
सदस्य : डॉ. जयंत वेलणकर
सदस्य : प्रा. प्रमोद पेंडके
सदस्य : प्रा. रमेश हिंमते
सदस्य : डॉ. माधुरी लेले
सदस्य : डॉ. प्राची देशपांडे
सदस्य : प्रा. आशा लांजेवार
सदस्य : प्रा. मधूकर बोरकर

## कार्यकारी समिती

### चर्चासत्र २००४-०५

कार्याध्यक्ष : डॉ. हसनअली हुद्दा
स्वागताध्यक्ष : डॉ. सतीश शास्त्री
सदस्य नोंदणी समिती प्रमुख : प्रा.डी.एन.पाटणकर
मंच व बैठक व्यवस्था प्रमुख : प्रा. मेघा कानेटकर
प्रमाणपत्र समिती प्रमुख : प्रा. सुमित्रा मरसकोल्हे
सूचना व संपर्क प्रमुख : प्रा. राजाभाऊ दूरगकर
सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख : प्रा. मेधा कानेटकर
निवास व्यवस्था प्रमुख : प्रा. मधुकर बोरकर
शोधनिबंध प्रमुख : डॉ. अरुणा सोनेगांवकर
भोजन व्यवस्था प्रमुख : प्रा. रमेश हिंमते व प्रा. आरती बाराहाते
प्रसिध्दी विभाग प्रमुख : प्रा. आशा लांजेवार व प्रा. जयंत जांभुळकर

Scanned by CamScanner

# स्मरणिका संपादक मंडळ



प्रा. दत्तात्रेय सोनेगांवकर



डॉ. माधुरी लेले



डॉ. प्राची देशपांडे



प्रा. रमेश हिमते



प्रा. जयंत जांभुळकर



प्रा. सुमित्रा मरस्कोल्हे



प्रा. अशोक गव्हाणकर

Scanned by CamScanner

# "जागतीकीकरणात लोककल्याणाचे स्थान"

प्रा. राजेश ब्राम्हणे
हिंदी सिटी कनिष्ठ, महाविद्यालय चंद्रपूर

**संकल्पना आणि संज्ञा**

जागतिकीकरणाची प्रक्रि या नैसर्गिक आहे. अटळ आहे व विकसनशील आहे असा दावा जागातिकीकरणाचे पाठिराखे नेहमी करतात. ते असेही सांगतात की ही प्रक्रिया समृद्धी व वृद्धी आणणार आहे. आपणा सर्वांना कवेत घेवून वैश्विक ग्रामामध्ये गोवण्याचे काम जागतिककरणातून साध्य होईल असे त्यांचे सांगणे आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे तिसऱ्या जगातील जनता जागतिक बाजारपेठेत सहभागी झाली तरच तिला नोकऱ्यांची संधी मिळेल, अधिक चांगले जिणे मिळेल. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की जागतिकीकरण हे नैसर्गिकरित्या सामावून घेत नसते, उलट हा लोकांना वंचित करण्याचा सुनियोजित कार्यक्रम आहे.

दक्षिणेतील गरीब लोकांची उत्पादनसाधने व ज्ञान यांचे वैश्विक बाजारपेठांमध्ये हरण करण्याचा, लोकांचा जीवनाधार हिरावून घेण्याचा, त्यांचे रोजगार व जीवनपद्धती हिसकावण्याचा हा कार्यक्रम आहे.

विश्व वाणिज्य संघ (डब्ल्यू टी ओ-अर्थात विवासं), शेतकी विषयक करार (एओए) व वाणिज्य विषयक बौद्धिक संपदा हक्क करार (ट्रिप्स) हे मुलत: दरोडेखोरीचे नियम आहेत. त्यांना आकडेमोड व कायद्यांच्या भाषेचे अंगरखे चढविले आहेत. या आर्थिक अपहरणात कंपन्यांची चलती होते तर लोकांची व निसर्गाची हानी होते.

विश्व वाणिज्य संघाचे मुख्य उद्दिष्ट बाजारू स्पर्धा वाढविण्याचे आहे. त्यातून दोन गोष्टी साधतात. सर्वप्रथम जीवनाच्या सर्व अंगांना 'विक्रीयोग्य माल' बनविले जाते. संस्कृती, जैविकवैविध्य, अन्न, पाणी, गुरेढोरे, गरजा व हक्क या सगळ्यांना बाजाराचे स्वरूप दिले जाते. दुसरा परिणाम असा होतो की निसर्ग, संस्कृती व रोजगार यांच्या विनाशाच्या स्पर्धेच्या नियमांचा आधार दाखवून समर्थन केले जाते. जीवनाचे पोषण व रक्षण करणारे नैतिक व पर्यावरणीय नियम व्यापारातील प्रतिबंधक अडथळे ठरवून धोरण कर्ते त्यावर हल्ले करतात. वास्तवात विश्व वाणिज्य संघ व्यापारातील प्रतिबंधवादी अडथळे शिथील करीत नाही, त्याऐवजी लोकांच्या व निसर्गाच्या हिताचे प्रतिबंध काढुन टाकून त्या जागी कंपन्यांच्या हिताचे प्रतिबंध उभे केले जातात.

व्यापार कर कमी करणे, रद्द करणे हे विश्व वाणिज्य संघाचे एक उद्दिष्ट आहे. तेवढ्यानेच कंपन्यांना तिसऱ्या जगातील गरीबांची उत्पादनसाधने बळकावण्यासाठी जगव्यापी आवाका मिळतो असे नाही. कोणती गोष्ट खाजगी मालमत्ता म्हणून धारण करता यावी, कोणत्या गोष्टीचा व्यापार करता यावा यावरिल नैसर्गिक व नैतिक मर्यादा हटविल्यामुळेही कंपन्यांना जगभर उत्पादनसाधने हस्तगत करणे सुकर होते. अशा रितीने भुमी व प्रदेश जिंकून बळकावण्याचा वसाहतवादी कार्यक्रम जागतिकीकरणाद्वारे पूर्णत्वाला नेला जात आहे. जीवन प्रक्रियेचा मुळ पायाच असलेली जैविक साधने व जलसंपत्ती यांवर वसाहतवाद लादला जात आहे, त्यांना



Scanned by CamScanner

बाजारू माल बनवून त्यांचे खाजगीकरण केले जात आहे.

विश्व बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या कार्यक्रमांतून व विश्व वाणिज्य संघाच्या शेतकीविषयक करारातून व्यापाराचे उदारीकरण रेटले गेले. व्यापाराच्या उदारीकरणामुळे शेतीवर घाला आला आहे. आजही जगातील तीन चतुर्थांश माणसांची रोजीरोटी शेतीवर अवलंबुन आहे. शेती हा केवळ आर्थिक व्यवहार नाही, ते तेवढेच सांस्कृतिक कार्य ही आहे. अन्न व शेतीप्रणाली यांच्या जागतिकीकरणाचा परिणामत: अर्थ असा की अन्न निर्मितीचक्रावर कंपन्यांचा कब्जा होईल, माणसाचा अन्नाचा हक्क क्षीण होईल, अन्नाच्या बाबतीत जी सांस्कृतिक विविधता आहे ती नष्ट होईल. शेतकी पिकांमधील जैविक विविधता संपुष्टात येईल. खेड्यापाड्यांमध्ये शेतजमिनीवर जे लक्षावधी लोक जगतात त्यांचे तेथून उच्चाटण होईल. कोसावापेक्षा किती तरी मोठ्या निर्वासित झुंडी निर्माण करण्याचा हा कार्यक्रम आहे. तिसऱ्या जगातील गोरगरीब, शेतकरी व छोट्या शेतकऱ्यांचा वंशविच्छेद करावा, असाच हा प्रकार चालला आहे.

जागतिकीकरणाला नव्या धोरणाचा एक पैलु जागतिकीकरण असा आहे. अर्थकारण जागतिकी पातळीवरून व्हावे, राष्ट्रांच्या सीमांनी अडथळा आणू नये अशी अपेक्षा आहे. तत्वत: जागतिकीकरणाला कोणत्याही सुज्ञ माणसाचा विरोध असणार नाही. जगात मानवाचे राज्य व्हावे, मानवाचे जातीक पार्लमेंट व्हावे, युद्ध नष्ट व्हावीत, सर्वत्र शांतता नांदावी, मानवाची प्रगती व्हावी असा जागतिकीकरणाचा उद्देश आहे. याला विरोध तरी कोण करणार ? आपल्याकडे रविन्द्रनाथ टागोर, महात्मा गांधी यांनी विश्व राज्यांची व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विश्वशांततेची कल्पना पुरस्कारिली होती.

भारत हा स्वतंत्र नसतांनाही लीग ऑफ नेशन्स आणि यूनो या जागतिक संघटनांचा सदस्य होता. हे सर्व सांगण्याचे कारण इतकेच की जागतिकीकरण ही संकल्पना आपल्याला नवीननाही. स्वातंत्र मिळाल्यानंतर आपण जागतिक राजकारणात खूपच लक्ष घातले. आपल्या शांततावादी भुमिकेमुळेच आपल्याला आपले लष्करी आर्थिक सामर्थ्यकमी असूनही खूपच महत्व प्राप्त झाले होते. तिसऱ्या जगाचा नेता असा काही काल भारताचा उल्लेख केला जाईल.

**जागतिकीकरणाचा प्रभाव, व्यापार, लाभ, हानी**

उदारीकरण , जागतिकीकरण याच्या नावाखाली सरकारी नियंत्रणे मोडुन टाकणे, खाजगीकरणाला प्रोत्साहन देणे, देशी व परदेशी भांडवलदाराचे स्वागत करणे इ. नवीन आर्थिक धोरण हे अर्थव्यवस्थेला एक नवी दिशा देणारे असून जगातील घडामोडींचा प्रभाव या धोरणावर पडलेला आहे, हे जाणवते. सोव्हिएत रशिया आणि पूर्व यूरोपीय देश यामधील साम्यवादी (नियंत्रणाधिष्ठित) अर्थव्यवस्था अल्पावधीत आमुलाग्र बदलली. या सर्व देशामधील (रूमानिया, हंगेरी, पोलंड, झकोस्लोव्हिकिया, पूर्व जर्मनी, युगोस्लाव्हिया आणि सोव्हिएत रशिया) अर्थव्यवस्था आता मुक्त अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करू लागल्या आहेत.

भारतीय उद्योगांना मुक्तपणे आयात परवाने मिळू लागले. भारतात तयार होणाऱ्या वस्तुत परदेशी घटकांचे प्रमाण वाढले. यामुळे जागतिक दर्जाचे उत्पादन भारतात होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

उदारीकरणाच्या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत एक भाग म्हणुन देशांतर्गत अनेक स्वदेशी व परदेशी

Scanned by CamScanner

खाजगी कंपन्या सुरू आहेत. हाँगकाँग, तैवान, अमेरिका व इतर विकसनशील देशातील खाजगीकरणाची परिणाम भारतात लागू होतील अशी समजूत या मागे आहे. परंतु आपल्या देशाची परिस्थिती पूर्णपणे वेगळी तर आहेच मुळात त्यापेक्षा अधिक मनुष्यबळ आपल्याकडे आहे. सरकारच्या मुक्त धोरणामुळे खाजगी उद्योजकांवर फारसे नियंत्रण नसल्यामुळे खाजगी उद्योजक क्षेत्रात अन्यायकारक अटींवर अवलंबून राहून कार्य करण्याचे आव्हान मनुष्यबळ साधनसामुग्री घटकांसमोर आहे.

पण भारताचे दुर्दैव असे की नोव्हेंबर १९९० ते मार्च १९९१ या चार महिन्यात दोन सरकारे (व्ही. पी. सिंग-चंद्रशेखर)कोसळली. फेब्रुवारी १९९१ मध्ये अंदाजपत्रक मांडता आले नाही. मे जून १९९१ मध्ये निवडणुका झाल्या. राजीव गांधींची हत्या झाली. या राजकीय अस्थैर्यामुळे आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे जागतिक पातळीवरील सावकारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होण्यास मदत झाली. आधीच प्रकृती नाजूक त्यात औषधोपचार बंद होण्याची शक्यता असलेल्या आजारी माणसासारखी भारताची अवस्था झाली.

जुलै १९९१ मध्ये ४७ टन सोने विकत घेण्याच्या बोलीवर स्वित्झर्लंड आणि इंग्लंडच्या बँकामध्ये गहाण ठेवण्यात आले. यामुळे ६० को. डालर्स उभे करता आले.

मक्तेदारी कायद्यात दुरूस्त्या करून उत्पादन क्षमता, प्रत्यक्ष उत्पादन वाढविण्यासाठी पूर्व संमती घेण्याची अट काढून टाकण्यात आली. कंपनीचे एकत्र येणे, विलिनीकरण, यावरिल बंधने उठविण्यात आली, एका कंपनीने दुसऱ्या कंपनीचा ताबा घेण्यास हरकत नाही असा नियमात बदल करण्यात आला. त्यामुळे परदेशी कंपन्या भारतात आल्या.

**''एकुणच सार्वजनिक क्षेत्रे कमी करून सुधारणा करण्याचे धोरण महणजे खाजगीकरण होय''**

सरकारने आपल्या मालकीच्या उद्योगातील भागभांडवल शेअर्स विकण्यास सुरूवात केली. प्रथम २०% ते ४०% भाग भांडवल विकावयाचे ठरले. त्यामुळे हे उद्योग व्यापारी तत्वावर चालविता येतील असा सरकारचा हेतू आहे. मुक्त बाजारव्यवस्था आली की तिची काही शिस्त असते. या शिस्तीमुळे वित्तीय क्षेत्रातील सुधारणा सहज होतील असा सरकारचा समज आहे व होता.

मुक्तबाजार व्यवस्थेत गुंतवणुक करणाऱ्याला जोखीम पत्करावी लागते. हे तत्व आहे पण सामान्य मध्यमवर्गीय लोक बँकेत ठेवी ठेवताना त्यांना हमी मिळाली पाहिजे. नियंत्रणे हटविण्याच्या हव्यासात, अशा लाखो लोकांचा विश्वासघात होता कामा नये. याची काळजी सरकारने घ्यावी लागते.

**अशाप्रकारे जागतिकीकरणामधील मुक्त धोरणाची खाजगीकरण आणि मुक्त बाजार अर्थव्यवस्थेच्या वाटचालीस प्रारंभ झाला.**

नियंत्रणे हटविली म्हणजे मक्तेदारी संपेल आणि स्पर्धा सुरू होईल असे वाटले. नियंत्रणाच्या काळात सरकारी धोरणामुळे काही क्षेत्रात पुरवठा निर्माण झालेला असतो किंवा संघाची कमतरता असते. अशा क्षेत्रात घुसुन चटकन फायदा मिळविणारे उद्योग सुरू होतात. उदा. महाराष्ट्रात एस.टी. ची मक्तेदारी होती. नव्या



Scanned by CamScanner

धोरणानुसार खाजगी वाहनांना परवानगी मिळाली. त्यांना रस्ते, बस स्टॅन्ड, शेड्स यासाठी काही खर्च न करता वाहने चालविता येतात मग ज्या मार्गावर एस.टी. जात नाही त्या मार्गावर जी वाहने धावत नाहीत तर जेथे अधिक पैसा मिळेल तेथे ही वाहने जातात. काही दिवसानी एस.टी. बंद पडेल आणि खाजगी कंपन्यांची मक्तेदारी प्रस्थापित होईल. आणखी एक धोका निर्माण होतो. जागतिक मोठ्या बलाढ्य कंपन्या देशातील कंपन्या ताब्यात घेतात. त्यामुळे त्यांना जास्त भांडवल न गुंतविता, नवे कारखाने न काढता बाजारात हिस्सा मिळतो. टाटा तेल, साबण कं. हिंदुस्थान लिव्हरने घेतली. गोदरेजचे साबण प्रॉक्टर गॅबल कंपनीने घेतली. कोका कोला आणि पार्ले यांचे विलीनीकरण झाले.

सन १९९१ च्या मक्तेदारी कायद्यानुसार आता भांडवलाची कमाल मर्यादा काढून टाकण्यात आली असून ज्याचा भारताच्या परकीय चलन व्यवहारावर काही परिणाम होणार नाही. परकीय तंत्रज्ञान आयात करण्यास करता कपात करण्यात येवून त्यांना मुक्त हस्ताने परवाने देण्यात आले अहेत. तसेच आवश्यक ती रॉयल्टी देण्यात येईल. तसेच आर्थिक विकासासाठी परकीय तंत्रज्ञांची नेमणुक करणे संशोधन करणे किंवा विकासांगतर्गत नवीन तंत्रज्ञान आयात करण्यास आवश्यक ते परवाने देणे असे करण्यात आले आहे.

**जागतिकीकरणाचा विरोध तथा उत्पादने, संसाधने व सरकारी हस्तक्षेप व WTO ची भुमीका**

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या दृष्टीकोनातून शेतीक्षेत्र मोठे किफायतशीर आहे. किंमतीच्या चढउताराचा मोठा फायदा त्या उठवतात. शिवाय प्रक्रिया, वाहतुक, साठवणुक, वितरण यामध्ये त्यांची मोठी गुंतवणुक आहे. कारण त्यामध्ये चांगला नफा सुटतो. आज युरोप, अमेरिकामध्ये खाद्यपदार्थांची बाजारपेठ वाढायला प ारसा वाव शिल्लक नाही. त्यामुळे त्यांना भारतासारख्या तिसऱ्या जगाच्या बाजापेठा 'खुल्या' करून हव्या आहेत. भारतामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचा निरनिराळ्या मार्गाने विस्तार चालु आहे. सधन वर्गासाठी आकर्षक जाहिरातीबाजी मार्फत ब्रेकफास्ट सीरियल, आइस्क्रिम, चॉकलेट, सॉसेजेस, सिगारेट, शीतपेये, तयार कॉफी व इतर पेये, वेफर नुडल्स, सॉस इ. आणि जनसामान्यांच्या बाबतीत दुधाची भुकटी, पाम तेल आदीद्वारा त्या खप वाढवत आहेत. हरित क्रांतीच्या प्रसारातून कीटकनाशके, तृणनाशके, हारमोन्स इ. रसायनांची बाजारपेठ तर संकरित गाई, कोंबड्या यांच्यासाठी पशुखाद्याची बाजारपेठ रूंदावत आहेत. याशिवाय मॅक डोनल्ड सारखी उपहारगृहांची साखळी महानगरातून सुरू करून हॅम्बरगर, हॉट डॉग अशा मांसाहरी पदार्थाचा प्रसार वाढत आहे. एकदा मासाहार वाढला की, पशुखाद्याची बाजारपेठ विस्तारते आणि प्रक्रिया उद्योग वाढतो. त्यावर बहुराष्ट्रीय कंपन्यांचा डोळा आहे.

जनसामान्याच्या तोंडचा घास काढणार ? भारतातला आहार प्रामुख्याने शाकाहारी आहे. भारतात दरवर्षी दरडोई सुमारे १८० कि. धान्य व डाळी वापरल्या जातात. तर मासांचा खप सरासरीने दीड किलो आहे. पाकिस्तानमध्ये तो दहा किलो आहे तर तो चीनमध्ये ३५ कि. आहे. एक किलो मासनिर्मितीसाठी ५ ते१० कि. धान्य/सोयाबिन पशुखाद्य म्हणुन वापरले जाते. भारतामध्ये जर मासांहारात लक्षनीय वाढ झाली तर आज जी नाचणी, बाजर, मक्का, जोंधळा ही पिके मानवी आहारासाठी वापरली जातात ती पशुखाद्य म्हणुन वळविली जाण्याचा धोका आहे. पशुखाद्यासाठी सोयाबीनची लागवड वाढवून धान्य-डाळींचे उत्पादन कमी होण्याचा धोका आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची आक्रमक जाहिरातबाजी यशस्वी झाली तर सधन कुटुंबाची मासांहाराची

Scanned by CamScanner

वाढती मागणी पुरविण्यासाठी अधिकाधिक जमिन वापरली जाईल. अशा रितीने बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जाहिरातबाजीमुळे खाद्य पदार्थाच्या बाजारपेठेच स्वरूप बदलून निरनिराळे घातक रसायने घालून तयार केलेले, साठवलेले पदार्थ 'फेशनेबल' बनत आहेत. ते बनविण्यासाठी देशातील अधिकाधिक साधनसंपत्ती खर्ची पडेल, ती गरिबांच्या तोंडचा घास काढुन !

शेतमालाच्या निर्यातीवर आज जो भर देण्यात येतो आहे त्याचाही जनसामान्यांवर असाच विपरीत परिणाम होण्याचा धोका आहे. गुलाब, द्राक्षे, आंबे आदी फुलाफळांची किंवा पशुखाद्यासाठी सोयाबीनची निर्यात किंवा तांदुळाची, माशांची निर्यात वाढवण्याच्या खास योजनांमुळे काही मोजक्या उद्योजकांचे नफे वाढतीलही. परंतु चांगल्या प्रतीची जमीन व पाणी यांचा अधिक वापर निर्यात पिकांसाठी वाढत्या प्रमाणात होऊ लागला तर डाळी व तेलबियांचे उत्पादन घटेल. उदा. निर्यातीसाठी फुलबागांना उत्तेजन दिल्याने कर्नाटकामधुन १९९०-९१ पासून १९९५-९६ पर्यंत फुलांची निर्यात ८ कोटी रू. पासून ५५ कोटी रू. पर्यंत वाढली. कर्नाटक कृषी विद्यापीठाच्या अभ्यासातून आढळून आले आहे की, फुलबागांमुळे लहान शेतकऱ्यांनी जमिनी गमावल्या व त्या कंपन्यांच्या ताब्यात गेल्या. फुलबागांपायी एका जिल्ह्यातील धान्याचे उत्पादन ७००० टन धान्य आयात करणे शक्य आहे. अशा रितीने फुलांची निर्यातवाढ करून धान्यपुरवठा मोठ्या प्रमाणात घटवण्याचे संकट निमंत्रित केले जात आहे. फलोद्यानासाठी कमाल जमीनधारणा कायद्यातून सूट दिल्याने जमिनीचे केंद्रीकरण होऊन लहान शेतकरी जमिनीवरून उठवला जाण्याचा धोका आहे. भारतातील साधनसंपत्ती युरोपमध्ये फळाफुलांची बरसात करण्यासाठी वळवली गेली तर त्यापायी भारतीयांचा तोंडचा घास काढुन घेतला जाणार आहे.

१ एप्रिल २००१ रोजी आयात खुलीकरणाची प्रक्रिया पुरी करण्यात येऊन १०,००० वर परदेशी वस्तुंवरिल संख्यात्मक निर्बंध काढून टाकले गेले. कापूस, तेलबिंया, तेल, भाजीपाला, बटाटे, नारळ,सफरचंद, लसूण, डाळिंबे, बेदाणे, दुध-भुकटी आदी अनेक शेतमाल / शेतमाल आधारित व पशुजन्य वस्तु, कपडे, पेन वह्या, टी.व्ही मोटारी आदी उत्पादीत वस्तु अशा सर्व वस्तुंवरील आयात निर्बंध उठवण्यात आले.

गॅट कराराखाली १९९६ पासून आयातीवरिल संख्यात्मक निर्बंध काढण्यास भारताने प्रारंभ केला व खुल्या आयातीचे प्रमाण पुढीलप्रमाणे वाढत गेले.

| वर्ष | १९९५-९६ | ९६-९७ | ९७-९८ | ९८-९९ | ९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| वस्तुसंख्या | ६१६१ | ४८८ | ३८१ | ८९४ | ७१४ | ७१५ |

आयात शुल्काद्वारे भारतातील उद्योग व शेती याची बाजारपेठ संरक्षित करता येईल व त्यादृष्टीने काही उपाययोजना केल्या आहेत, असा केन्द्र शासनाचा दावा आहे पण आयात शुल्कातून सुटका कशी करायची हे आयातदार चांगले जाणतात. १ एप्रिल २००१ रोजी मोटारीची आयात खुली झाल्यावर त्याबाबत मात्र शासकीय फतव्याने खास बंधने घालण्यात आली. तीन वर्षाहून अधिक काळ वापरलेल्या मोटारींच्या आयातीला तसेच डाव्या बाजूने चालवण्याच्या गाड्यांना परवानगी नाही. जुन्या मोटारींच्या आयातीला १०५ टक्के आयात शुल्क व अन्य आकार बसवले आहेत. भारतातील मोटार उद्योग वजनदार असल्याने संरक्षणासाठी

Scanned by CamScanner

तांबडतोब पावले उचलली गेलेली दिसतात. पण २००० एप्रिलमध्ये अनेक शेतीमालावरिल निर्बंध खुले होऊन किंमती कोसळल्याने लाखो शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त होत असतांना शासन फक्त आश्वासन देत आहे की आयातीवर कडक नजर ठेवण्यासाठी मंत्रालयात एक स्थायी गट बनवला जात आहे ! पाकिस्तान, श्रीलंका, बंगलादेश या भारतासारख्या शेतीप्रधान देशांनी मात्र आयातीवरिल राशी निर्बंध उठवण्याबाबतचा करार केलेला नाही. भारतीय राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या भवितव्याबाबत बेपर्वा आहेत असाच यातून निष्कर्ष निघतो.

आयात खुली करण्यासाठी अमेरिकेचा दबाव का वाढत आहे ? तर दक्षिण आशियाई देश, ब्राझिल, रशिया, येथील आर्थिक अरिष्टामुळे या देशांची अमेरिकेकडुन असलेली शेतमालाची आयात घटली. म्हणुन अमेरिका व युरोपीय संघ यांचा भारताची बाजारपेठ खुली करण्यासाठी दबाव वाढु लागला. केंद्र शासनाने शेतमाल व शेतमाल आधारित उत्पादनावरिल आयात बंधने काढल्यावर भारताची बाजारपेठ काबीज करण्याच्या दृष्टिने परक्या कंपन्या आयात मालाच्या किंमती भारतातील बाजारपेठेपेक्षा काहीशा कमी ठेवत आहेत. याचा अर्थ परदेशामध्ये उत्पादनखर्च कमी आहे किंवा तेथील उत्पादकांना कमी किंमत मिळते असा नाही तर अमेरिका, यूरोपीय संघातले देश किंमती स्पर्धात्मक राखण्यासाठी तेथील उत्पादकांना उत्पन्नावर अनुदान देऊन भरपाई करतात. म्हणुन त्यांना किंमती उतरवता येतात. १९९७ साली जपानमध्ये शेतीवर सरासरी अनुदान ६९%, युरोपीय संघात - ४२% तर अमेरिकेत -१६% होते. विशिष्ट उत्पादनांवर अनुदानाचे प्रमाण बरेच अधिक आहे. उदा. युरोपात साखरेवर २६५% निर्यात अनुदान आहे. युरोप व अमेरिकेमध्ये दर शेतामागे वर्षाला १५ लाख रूपये तर जपानमध्ये १६ लाख रूपये एवढे रूपये अनुदान विविध साहाय्य योजनांखाली दिले जात आहे.

**भारतातील आयातबंधने उठवल्यावर परकीय मालाचा भारतावर मारा सुरू होऊन शेतमालाच्या सुगी नंतरच्या किंमती एकदम कोसळल्या. ऑक्टोबर १९९५ मध्ये तुरीचा भाव कर्नाटकामध्ये २३३० रू. क्विंटल होता. ऑक्टोबर २००० मध्ये तो १३०० रू. क्विंटल एवढा उतरला. तर ज्वारीचा भाव १९९९ साली १२०० रू. क्विंटल होता तो ४०० रू. पर्यंत घसरला. १९९९ साली बाजरीचा भाव महाराष्ट्रात ७०० रू. / क्विंटल होता तो २००० साली ४०० रू. क्विंटल एवढा घसरला. भारतात, सफरचंदाचे उत्पादन होते. सफरचंदाची आयात सुरू झाल्याने काश्मीर - हिमाचल प्रदेश येथिल उत्पादकांच्या बाजारपेठेवर गदा आली. शासनाने ५० टक्के आयात शुल्क लावले. तरी आयात होत राहील्याने त्यांचे व्यवसाय अडचणीत येत आहेत.**

हीच कथा खाद्यतेलाची, सोयाबीनची, साखरेची, गव्हाची, कापसाची रबराची आहे. सोयाबीनची आयात खुली झाल्याने सोयाबीनची किंमत कोसळली व परिणामी तेलबीयांखालील क्षेत्र व उत्पादन कमी झाले. खाद्य तेलासारख्या आहार घटका बाबत देशातील उत्पादन घसरणे हे आत्मघातकी आहे. साखरेच्या आयातीमुळे साखरेचे साठे वाढत गेले आणि ऑक्टोबर २००० मधे साखर साठा ९० लाख टनावर गेला. परिणामी चालू हंगामातील साखर साठवणूकीचा प्रश्न गंभीर बनून साखर निर्यातीसाठी अनुदान द्यावे अशी मागणी पुढे येत आहे. साखरेची आयात चालू राहून साखरेचे भाव कोसळले तर ३.५ कोटी ऊस उत्पादकांचे



Scanned by CamScanner

भवितव्य धोक्यात येणार आहे. दुध पावडरीच्या आयातीमुळे ९० लाख छोटे दुध उत्पादक उध्वस्त होण्याचा धोका आहे. स्वस्त धान्य दुकानातले भाव वाढविल्याने गव्हाचा उठाव कमी झाला. त्यात भर म्हणजे पीठ गिरण्यांना गहु आयातीला परवानगी दिली. त्यामुळे गव्हाचे साठे गरजेच्या दिडपट झाले. **गव्हाचे जादा सांभाळण्यासाठीच्या मोठ्या खर्चापोटी अनुदान खर्ची घालवण्याएवजी धान्य किंमतीवर अनुदान देऊन गरीब जनतेला कमी दरात धान्य दिले तर गव्हाचे साठे सत्कारणी लागतील. ते वाया गेले तरी चालेल पण बाजारात हस्तक्षेप न करण्याच्या अटीचा भंग होण्याचे शासनाला मोठे भय ! एवढे भारतीय शासन मिंधे बनलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या परवडीची शासनाला पर्वा नाही.**

आयात खुली करणे अपरिहार्य आहे, असा दावा करून भारताने कमाल आयात शुल्क लावावे अशी मागणी केली जाते. भारताला शेतमाल, दुध, दुधाचे पदार्थ यावर १०० टक्के, साखर आदी प्रक्रिया केलेल्या मालावर १५० टक्के, खाद्यतेलावर ३०० टक्के आयात कर लावण्यास परवानगी आहे. भारतात सध्या आयात करांचे प्रमाण फार कमी आहे. परंतु गॅटच्या जमान्यात आयात शुल्क उच्च पातळीवर किती काळ राखता येईल हा एक प्रश्न आहे. आणि दुसरा प्रश्न आहे वाम मार्गाने होणाऱ्या आयात व्यवहारांबाबत. एकदा आयात खुली केली की किती माल भ्रष्टाचारी मार्गाने परस्पर घुसेल असा प्रश्न उपस्थित होतो. शिवाय व्यापारी वर्ग व नागर मध्यमवर्गीय यांना खुष ठेवण्यासाठी आयात-शुल्क कमी ठेवणे शासनाला राजकीयदृष्ट्या फायद्याचे वाटते. तेव्हा आयात-शुल्काद्वारे प्रश्न सुटणार नाही. आंतरराष्ट्रीय मालाच्या माऱ्याच्या कचाट्यातून भारतीय शेतकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी आयात बंदीच असली पाहिजे. बाजारपेठा पादाक्रांत करण्यासाठी अनुदाने देऊन परकीय मालाच्या किंमती मुद्दाम कमी ठेवल्या जातात तेव्हा अमेरिका युरोपीय देशांना अनुदाने कमी करायला लावावी असाही युक्तीवाद केला जातो. येथे प्रश्न असा येतो की १९८६ सालापासून गॅट कराराबाबत वाटाघाटी चालू आहेत. तेव्हापासून धनाढ्य आणि बलाढ्य जी-७ देशांना कायदेशीर व भारताच्या दृष्टिने घातक अशा सर्व अटी गॅट करारात समाविष्ट होऊ दिल्या. आता मात्र जी-७ देशांना अनुदाने कमी करायला सांगता येईल? अशी ताकद भारताकडे अचानक आली आहे, असे कसे मानता येईल ? शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापारातील विपर्यस्त किंमतीमागे अनुदाने हे एकच कारण नाही. दुसरे महत्त्वाचे कारण आहे ते जागतिक पातळीवरील मक्तेदारी, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व. जगातल्या एकुण शेती व पशुजन्य खाद्यपदार्थांच्या निर्यातीत विकसित देशांचा वाटा ६८%, पशुजन्य पदार्थात ७८% तर गहू व मका यांच्या व्यापारात तो ९० टक्के आहे. अमेरिकेतील कारगिल, कॉन्टिनेन्टल ग्रेन व तीन बड्या युरोपीय कंपन्या यांच्या हातात ८० टक्क्याहून अधिक जागतिक धान्य बाजार केंद्रीत आहे. तीन ते सहा महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या हातात जागतिक निर्यातीतील ९० टक्के लाकडाचा व्यापार आहे, तर कापूस, तंबाखू, ज्युट, कॉफी, गहु व मका या शेतमालाचा ८५ ते ९० टक्के व्यापार, रबर, केळी व तांदुळाच्याबाबत ७० ते ७५ टक्के व साखरेच्या बाबत ६० टक्के व्यापार मुठभर कंपन्यांच्या हातात केंद्रीत आहे. चहा, कॉफी, ज्युट, केळी साखर आदी उत्पादने प्रामुख्याने विकसनशिल देशात पैदा होतात. तरी त्यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर पकड आहे बहुराष्ट्रीय कंपन्यांची. परिणामी स्पर्धात्मक पद्धतीने किमती ठरत नसून मक्तेदारी कंपन्यांच्या षडयंत्री कारवायांवर त्या अवलंबून असतात. गेल्या दहा वर्षात शेतमालाच्या किमती कृत्रिमरित्या उतरवायला त्यांच्या कारवायाच

Scanned by CamScanner

कारणीभुत आहेत. त्यामुळे शासकिय अनुदाने बंद झाली तर निखळ स्पर्धा होईल हा दावा अवास्तव आहे. शिवाय देशोदेशातील शेतीची उत्पादकता व उत्पादनखर्च हा त्या त्या देशातल्या उत्पादक घटकांच्या आकारमानावर एकुण विकासाची व यांत्रिकीकरणाची पातळी व शासकीय प्रोत्साहन यावर अवलंबुन असतो. अमेरिकेत ३ टक्के कामकरी शेतीत आहेत. शेतीचे आकारमान फार मोठे आहे. शेती उत्पादन यांत्रिकीकरण व संगणकीकरणाद्वारे चालते व शासन मोठे अर्थसहाय देते. उलट भारतात ६० टक्के कामगी री शेतीवर अवलंबून आहेत. ५० टक्के शेतकऱ्यांजवळ १ हेक्टरही जमीन नाही. शेती बैल व मानवीश्रमप्रधान आहे. अशी जमीन अस्मानाएवढी तफावत असतांना या दोन देशातल्या शेतमालात स्पर्धाशक्य आहे असे मानणे म्हणजे कुस्तीमध्ये एका मल्लाला लहान मुल तोंड देऊ शकेल असे म्हणण्यासारखे आहे.

**भारतातील समस्या नेमक्या याच धोरणातून निर्माण झालेल्या आहेत. या धोरणाचा गाभा हा असा आहे .**

**बाजारपेठेतून शासनाची माघार**

बहुतेक सर्व नियंत्रणे रद्द . मुक्त आयातीमुळे एतद्देशीय उद्योगांवर कायपरिणाम होतील याचा विचार नाही. आज या देशातील लघु उद्योगात ३१ लाक्ष २१ हजार छोटे कारखाने असून त्यांत एकंदर १ कोटी ७२ लाख माणसं काम करतात. लघु उद्योगातील वार्षिक उत्पन्न ६ लाख कोटी रूपयांचे असून दर वर्षी ५० हजार कोटी रूपयांचा माल निर्यात होतो. लघु उद्योगांना स्पर्धेपासून संरक्षण देण्यात आले. काही प्रमाणात तरी मोठ्या कंपन्यांना या क्षेत्रात येण्यास बंदी करण्यातआली म्हणूनच एवढी मोठी प्रगती झाली. उद्या दूधाची अनिर्बंध आयात सुरू झाली तर दूर उत्पादन हा जोडधंदा असलेल्या लक्षावधी शेतकऱ्यांच्या एकूण उत्पन्नावर त्याचा काय परिणाम होईल याचा विचार होत नाही.

**सार्वजनिक क्षेत्राची मोडतोड**

आपल्या देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर Infrastructure चा भक्कम पाया बांधण्यासाठी **सरकारने कोळसा, पोलाद, रेल्वे, वीज, हवाई वाहतूक, रासायनिक खते या सर्वांचा विकास करण्याची जबाबदारी स्वीकारली नसती तर टाटा, बिर्ला, गोएंका, किर्लोस्कर अशा उद्योगसमूहांना आज दिसतोय तेवढा औद्योगिक विकास करणे फारच कठीण झाले असते. या कारणास्तव खाजगी क्षेत्राने औद्योगिकरणाचा मूलभूत पाया घालून देणाऱ्यासरकारचेसदैव कृतज्ञ राहीले पाहिजे. सरकारने (सार्वजनिक उद्योगांद्वारे) जे काही केले त्यामुळेच तर भारताला जगातील सर्वात मोठ्या १२ औद्योगिक राष्ट्रांत स्थान प्राप्त झाले आहे'' हे आहे श्री नवल टाटा यांचे विधान.**

**पोलादच्या भट्टीपासून आसामच्या जंगलात आणि अरबी समुद्रातून देखील तेल काढण्यात nuclear technolog पासून Computer technolugy पर्यंतचा विकास करण्यातभारताला कुठल्याही बहुराष्ट्रीय कंपनीने मदत केली नाही. ही कामगिरी सार्वजनिक क्षेत्राने केली.**

**राष्ट्रीयकृत बँकानी अत्यल्प व्याजदराने भांडवलाचा पुरवठा केला नसता. सरकारी वीज मंडळानी अतिशय स्वस्त दराने वीज पुरविली नसती व भारतातील शेतकी शास्त्रज्ञांनी तांत्रिक मदत**



Scanned by CamScanner

**केली नसती तर या देशात हरित क्रांती झालीच नसती. धवल क्रांतिदेखील राष्ट्रीयीकृत बँकांचे आर्थिक सहाय्यच कारणीभूत ठरले.**

आता सार्वजनिक उद्योग भारभूत झालेले आहेत असा आभास निर्माण करून सरकारने आधी तोट्यात चाललेले उद्योग फुंकून टाकले व नंतर अर्थसंकल्पातील तूट भरून काढण्याच्या नावाखाली सामाजिक उद्दिष्टे कायम ठेवून नफा कमाविणाऱ्या उद्योगांतील भागभांडवल विकायला सुरूवात केली. मॉर्डन फूड्स, बाल्को, विदेश संचार निगम, एअर इंडिया अशी कितीतरी याची उदाहरणे आहेत.

या ठिकाणी आणखी एक मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. जेव्हा उद्योगाची मालकी बदलते तेव्हा नव्या मालकावर सर्व कायम कामगारांना नोकरीत ठेवण्याचे व आधीचे करारमदार पाळण्याचे बंधन नसते. मालकी हक्काचे हस्तांतरण करताना यासंबंधी खास करार करण्यात आला तरच ते शक्य होईल. या प्रश्नाकडे ट्रेड युनियन संघटनांनी लक्ष दिलेले नाही. सरकारला कसलीच चिंता नाही.

**बँकांची थकित कर्जे - वसूली ऐवजी वासलात**

**सार्वजनिक बँकाची थकित कर्जे व्याजासहित १ लाख कोटी रूपयांवर गेली आहेत. यातील बहुतेक कर्जे बड्या उद्योगपतींनी घेतलेली आहेत.** २०००-२००१ मध्ये या बँकांनी प्रतिकूल परिस्थितीत देखील १३ हजार ७९३ कोटी रूपये नफा केला होता. पण या नफ्यातून थकित कर्जापोटी ९ हजार ४७६ कोटी रूपयांची तरतूद करावी लागल्यामुळे निव्वळ नफा ४ हजार ३१७ कोटी रूपयांचाच राहीला. केन्द्रीय अर्थसंकल्पात या कर्जाच्या वसूलीसाठी कडक कायदा करण्याचे निर्देश नाहीत, उलट ही कर्जे बँकांच्या ताळेबंदातून काढून टाकण्यासाठी बँकांच्याच पैशातून Asset Reconstruction Company काढण्याच्या सरकारचा इरादा आहे. ही कंपनी बँकांची व वित्तीय संस्थांची कर्जे कमीकिंमती (Discount Value) विकत घेईल व वसूल करील. कंपनी खाजगी असेल व कंपनीचा कारभार व यांच्या कक्षे बाहेर असेल. बँकांनी ही कर्जे जनतेच्या ठेवी मधूनच दिलेली आहेत. **म्हणजे खाजगी क्षेत्राला, बड्या उद्योगपतींना जनतेच्यापैशाची कायदेशीर चोरी करण्याचा मार्ग मोकळा करून देण्याचा सरकारचा विचार आहे.**

सध्या वित्तीय भांडवलाने जगभर कमालीचे आक्रमक धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे बँकिंग व्यवसाय अस्थिर होत आले. मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर, थायलंड व जपानमध्ये देखील अनेक बँका बंद पडल्या असून त्यामुळे या देशांतील चलनव्यवस्था, बयाजदर व परदेशी हुंडणावळीचे दर सतत अस्थिर होत आहेत. आपल्या देशात एकीकडे बडे उद्योगपती ग्लोबल डिपॉझिट (किंवा अमेरिकन रिसिट) च्या माध्यमातून परभारे कर्जे घेउन त्याचा वापर स्वदेशी उद्योग ताब्यात घेण्यासाठी करीत आहेत तर दुसरीकडे सार्वजनिक बँकांमधील सरकारचे भाग भांडवल १९९३ च्या सुधारित कायद्यानुसार कमीत कमी ५१ टक्के असावयास पाहिजे ते आणखी कमी करून ३३ टक्क्यांवर आणण्याचे दुरूस्ती विधेयक संसदेच्या स्टॅंडिग कमिटीपुढे आहे. दरम्यान परदेशी भांडवलाने बँकिंग व्यवसायात प्रवेश केला आहे. स्टेट बँकेच्या भागभांडवलात देखील विदेशी भांडवल आहे तर वैश्य बँक या खाजगी बँकेत ब्राझिलचे ३० टक्के भांडवल असून आता त्यांनी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टरशिप बळकावली आहे. खाजगी बँका व विदेशी बँका यांचा Strategic Alliance होत आहे. बँकिंग व्यवसायातील परिस्थिती अतिशय गुंतागुंतीची आहे. तठड चा हल्ला देखील मोठ्या प्रमाणावर याच व्यवसायात

Scanned by CamScanner

झालेला आहे.

**निर्यात**

गॅट करारातील निर्यात खुलीकरणाचा खास फायदा म्हणून दाखवला जातो कपडे विषयक करार. कापड व कपडे हा भारत व अनेक विकसनशील देशांच्या निर्यातीचा मोठा भाग. आजवर या व्यापारावर प्रगत देशांनी अनेक निर्बंध घातले होते आणि त्याला गॅटमध्ये स्थानच दिलेले नव्हते. आता गॅटमध्ये त्याचा समावेश होणार आहे. त्यामुळे भरपूर कापड-कपडे निर्यात करता येईल असे गॅट-समर्थक म्हणतात. प्रत्यक्षात मात्र १९९० मध्ये भारताला जेवढा कोटा प्रगत देशांनी दिला होता तो करारानंतरच्या पहिल्या तीन वर्षात १६%, पुढच्या ४ वर्षात १७%, पुढच्या दोन वर्षात १८%, व ४९% दहाव्या वर्षात गॅटमध्ये समाविष्ट होणार आहेत. म्हणजे नवा फायदा शुन्य कोणी म्हणेल नंतर तरी निर्यात वाढेल ना ? त्याचीही झलक पाहाण्यासारखी आहे. ऑगस्ट १९९३ मध्ये जर्मनीने भारतीय कपड्यांची आयात थांबवली. कारण ? भारतीय कपड्यांमध्ये वापरलेले रंग व रसायने जर्मन जनतेच्या आरोगयास घातक आहेत म्हणे ! जानेवारी १९९४ मध्ये तर अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीने भारताला धमकी दिली की गॅट कराराप्रमाणे भारताने आपली बाजारपेठ अमेरिकी कपड्यांनी खुली केली पाहिजे. नाहीतर स्पेशल ३०१ कायद्याखाली कारवाई करून भारताला काळ्या यादीत टाकू व भारतावर निर्बंध घालू !

गॅट करारात आरोग्यविषयक तरतुदी, तंत्रवैज्ञानिक व गुणवत्ता निकष तसेच दुसऱ्या देशात स्वस्त माल ओतण्याविरूद्ध कारावाई करण्याचे अधिकार आणि एखादा करार पालन न केल्यास करायची दंडात्मक कारवाई यांचा समावेश आहे. या साऱ्याचा वापर प्रगत देश त्यांच्या सोयीने करून आपली निर्यात रोखू शकतात. शिवाय झालीच निर्यात तर जगाच्या मुक्त स्पर्धेत ती स्वस्तात करावी लागणार. रूपयाच्या अवमुल्यनामुळे निर्यात वस्तुरूपात वाढते पण परकीय चलनरूपात तेवढी वाढ होत नाही.

थोडक्यात, आयात व त्यासाठीचा खर्च जेवढा वाढेल तशी निर्यात वाढणार नाही. परिणाम परकीय चालनाची तूट वाढेल. १९८१ पासून आयात-निर्यात व्यापारातील तूट १० पटीने वाढली. आता बहुराष्ट्रीय कंपन्या जेवढे अधिक पैसे परदेशात पाठवतील आणि कर्ज परत फेडीसाठी जेवढी वाढती रक्कम भारताला द्यावी लागेल तेवढी परकीय चलनाची चणचण आणखी वाढेल. अशी तुट वाढली की आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कर्जाकडे धाव ! गेल्या वीस वर्षातच परकीय कर्जाचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १४ टक्क्यांवरून ३० टक्क्यांवर गेले.

सोमालिया, इथिओपियातील दुषकाळ हे खुल्या आर्थिक धोरणांचे फलित आहे. विकसनशील देशांना अशा रीतीने वेठबिगार केले जाते. गॅट कराराने आपला कर्जबाजारीपणा व आपली पिळवणूक वाढत आहे. हा ऋणम् कृत्वा धृतम् पिबेत् म्हणजे कर्ज काढून तूप पिण्याच्या भारतीय सत्ताधाऱ्यांच्या धोरणाचा अर्थ आहे. तूप वरच्या २० टक्यांना परंतु त्याचा बोजा मात्र मात्र ८०% सामान्य जनतेवर - महागाई व बेकारीच्या रूपाने ! या कराराप्रमाणे आता सर्व उत्पादने व व्यापारी सेवा त्यांच्या क्षेत्रातील सरकारी मालकी सोडावी लागणारआहे. तिथे देशी-विदेशी मक्तेदारांचा मोकाटपणे वावर सुरू आहे. भारतीय जनतेने घाम गाळून, बचत गुंतवून आणि सरकारकडे भरून उभे केलेले हे क्षेत्र जागतिकीकरणाच्या धोरणामुळे मुठभर मक्तेदारांच्या



Scanned by CamScanner

घशात घातले जात आहे.

**सेवा क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्या**

टेलिफोन-टेलेक्स आदी दूरसंचार सेवा यामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वागत चालू आहे. देशातील नफ्याचे विमान मार्ग मोदीलुफ्त - ज्यात भारतीय मोदी नावापुरता आणि खरी कंपनी जर्मनीची लुफ्तान्सा अशी अवस्था आहे अशा छापाच्या कंपन्यांकडे सुपूर्द केले जात आहेत आणि नाना हिकमती लढवून एअर इंडिया, इंडियन एअरलाईन्सचे खच्चीकरणकेले जात आहे. बँक आणि विमा क्षेत्रातील अशीच धोरणे येत आहेत. ही क्षेत्रे परकीय बँक-विमा कंपन्यांना खुली केली आहेत. या परकीय बँक-विमा कंपन्यांची कार्यक्षम म्हणून फार मोठी तरफदारी केली जाते. वस्तुस्थिती काय आहे ?

मुंबईतील एक परकीय बँक मोटारीसाठी कर्ज घेतलेल्यांनी कर्जाचे हप्ते वेळेवर दिले नाहीत म्हणून गुंड नेमून मोटारी ताब्यात घेते या देशातील कायदे आणि बँक व्यवसायाच्या सर्व पद्धती धाब्यावर बसवून ! हर्षद मेहतासारखे शेअर व रोखे सट्टे बाजीची सुरूवात १९९० मध्ये परकीय बँकांनी पोरे ! मग भारतीय बँकांनीही तोच आदर्श गिरवला. संयुक्त संसदीय समितीने स्पष्ट केले की या शेअर घोटाळ्यातील ७५ टक्के नादानी बँक ऑफ अमेरिका, सिटी बँक आणि ग्रिंडलेज बँक या चार परदेशी बँकानी केली. या बँका आम्हाला काय शिकवणार तर सट्टेबाजी अधिक कार्यक्षमतेने व अत्याधुनिक पद्धतीने कशी करावी हेच ना? ज्यांनी स्वत:च्या देशात सट्टेबाजी व दिवाळखोरी केली आहे ते आपल्याला कसली कार्यक्षमता शिकवणार ?

बँका-विमा कंपन्यांनाआजारी म्हणूनमारून टाकण्याचे काम हाती घेतले जाईल. परिणाम अर्थातच सामान्यांना यासेवा दुर्लभ होतील. नफा हेच आता एकमेव उद्दिष्ट बनवलेले आहे. शेतकरी, स्वयंव्यावसायिक, अनुसूचित जातीजमाती यांचे अर्थसहाय्य तसेच कमी व्याज दाराने कर्ज बंद होईल. ग्रामीण भागातल्या तोट्यातील ९५०० शाखा बंद करण्याचा सरकारचा विचार चालूच आहे. याचा अनिष्ट परिणाम ग्रामीण विकासावर व ग्रामीण जनतेवर होईल.

अर्थव्यवस्थेच्या विकासात गुंतवणूक विषयक निर्णय ही अत्यंत महत्वाची बाब आहे. त्यामुळे देशातल्या बचतीवर नियंत्रण कोणाचे व कोणी त्याचा वापर करायचा हे निर्णायक महत्त्वाचे आहे. भारतीय जनतेच्या बचतीवर व पैशावर विमा कंपन्यांना व औद्योगिक -व्यापारी कंपन्यांना जगभर सट्टेबाजी व भांडवलाची फिरवाफिरव करून नफा कमवण्यासाठी मिळेल तितका पैसा हवा आहे. भारताचाही त्यांनी त्यासाठी वापर करायचा आहे. वित्त भांडवल अशा रितीने जगावर वर्चस्व स्थापून आहे. आर्थिक सुधारणांच्या नावाखाली राष्ट्रीयीकृत बँकांची हजारो कोटी रूपयांची बुडित कर्जे पुसून टाकली जात आहेत. त्यातला फार मोठा वाटा देशातल्या बड्या उद्योगपतींचा व व्यापाऱ्यांचा आहे. बड्यांसाठी बडी कर्जमाफीची योजना म्हणजे खाजगीकरण असे हे समीकरण आहे.

थोडक्यात गॅट करारातील उदारीकरणाच्या अटींमुळे विमान वाहतूक, दुरसंचार, वीज बँका, विमा या सर्व क्षेत्रात देशी-विदेशी मुठभर मक्तेदारी कंपन्या भरघोस नफ्याची कुरणे पटकावतील व आपले वर्चस्व प्रस्थापित करतील. वास्तविक पाहता या सर्व सेवांचे व सार्वजनिक उद्योगांचे देशाच्या विकासात, प्रशासकीय



Scanned by CamScanner

कामात आणि संरक्षणाच्या दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे. त्यावरचे नियंत्रण सरकारने गमावणे म्हणजे देशाच्या सुरक्षिततेबद्दल बेपर्वाई दाखवणे. भारत सरकार आज नेमके हेच करत आहे. चोराच्या हाती जमादारखानाच्या किल्ल्या देत आहे. या ठिकाणी आणखी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. खाजगीकरण हे जसे सामान्य जनतेच्या व देशाच्या दृष्टीने घातक आहे तसेच ते भारतातल्याखाजगी उद्योग व शेतीच्या दृष्टीनेही हानीकारक आहे.

गेल्या चाळीस वर्षात भारतातील खाजगी उद्योगांचा विकास झाला तो सार्वजनिक क्षेत्राच्या आधाराने, स्वस्त जमीन, स्वस्त वीजपाणी व वाहतुकीच्या सोयी, खनिजे-धातू व कोळसा स्वस्तात स्वस्त पतपुरवठा, औषधांच्या पावडरी व रसायने स्वस्तात आणि सरकारची भलीमोठी कंत्राटे या आधारे लहान मोठ्या उद्योगांचा आणि बगायतदारांचा विकास झाला. या सर्व संरचनात्मक सोयी-सुविधा व सेवा, कच्चा माल हे सारे आता महाग होत जाईल. तसे शेतकरी, व्यावसायिक, लघुउद्योग आणि भांडवलदार हे कशाच्या आधारे स्वत:चा विकास करणार ? असमान स्पर्धेमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्या व मक्तेदारांना तोंड कसे देणार ?

**श्रमिक भुमीका**

देशी-विदेशी भांडवलाला मनमानेल तसा व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. सरकारी निर्बंध, कामगारविषयक कायद्याची बंधने आणि सामाजिक जबाबदाऱ्या असे काही असता कामा नये असा त्यांचा आग्रह आहे. स्वत:चे नफे वाढवण्यासाठी नवी क्षेत्रे, नव्या कंपन्या, आजवरचे सार्वजनिक क्षेत्र, शेती असे सर्व ताब्यात हवे तर आहे पण त्यावेळी स्वतात व कमी खर्चात कामगार हवे आहेत. वाटेल त्यावेळी कामगारांना कर्मचाऱ्यांना काढण्याचे स्वातंत्र्य हवे आहे. व्यापारी स्वातंत्र्य (?) हवे आहे.

गॅट करार-नव्या आर्थिक धोरणाच्या परिणामी आपल्या देशात किती बेकारी वाढेल ? आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेचा अंदाज आहे ८० लाख, गांधी लेबर इन्सिटट्युटच्या अभ्यासकांचा अंदाज आहे ९१ लाख तर कामगार संघटनांचा अंदाज आहे सव्वा कोटी ! बँक, विमा क्षेत्रातील २ लाख, रेल्वेचे ४ लाख, हातमाग ४० लाख, छोटे उद्योग ३६ लाख, खाजगी मोठ्या कंपन्या ५ लाख, सार्वजनिक क्षेत्रातील १० लाख, याशिवाय मच्छीमार, मिठागरातील कामगार आणि शेतीतील उध्वस्त होणारे शेतकरी अशी यादी लांबतच जाईल. सोडचिठ्ठीचे धोरण (एक्झिट पॉलिसी), स्वेच्छानिवृत्ती किंवा गोल्डन हॅण्डशेक, कडक कामगार कायदे, स्त्री कामगारांचे हक्क काढून त्यांना निवृत्ती घ्यायला लावण्याचे डावपेच हे सारे याचाच भाग आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील १७ टक्के किंवा २.२७ लाख कामगारांनी मार्च १९९८ पर्यंत स्वेच्छानिवृत्ती घेतली व ती संख्या वाढतच आहे. कोळशाच्या खाणी बंद केल्याने २००० कामगारांनी नोकरी गमावली. येत्याकाळात नव्या कंपन्या व नवे उद्योग आले तरी ते भांडवलप्रधान असतील, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारे, संगणक, स्वयंचलित यंत्रे याआधारे जेवढी नवी रोजगारनिर्मिती होईल त्याच्या ५-१० पट प्रमाणात बेरोजगारी निर्माण केली जाईल.

**संघटीत कामगार-कर्मचाऱ्यांना असंघटित क्षेत्रात आज ढकलले जात आहे. तेच आणखी वेगाने आता घडेल. असंघटित कामगार म्हणजे ना संरक्षण ना सेवा-सुविधा. भांडवलदारांचा खर्च तेवढाच कमी. खुद्द उत्पादनाचा खर्च देखील कामगारांवर ढकलता येतो. उदा. शेडऐवजी घरोघरी**



Scanned by CamScanner

काम दिले की जागेचे भाडे, वीज-पाणी सारेच वाचते. एकीकडे अगदी मोजके भरपूर पगार घेणारे कामगार व दुसरीकडे बहुसंख्य असंघटित असे स्तरीकरण अधिकच वाढेल. त्याचा सामाजिक जीवनावर व चळवळीवर अनिष्ट परिणाम होईल. दुसरे, कामाचे मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण केले जात आहे. रेल्वे, वीजमंडळ, एस.टी. संरक्षण उद्योग इ. प्रत्येक क्षेत्रात कंत्राटीकरण वाढत आहे. या पद्धतीमुळे कामगारांची अधिक पिळवणूक करणे सहज शक्य होते. तिसरे म्हणजे निवृत्ती मध्ये स्त्री-कामगार-कर्मचाऱ्यांना अडचणी निर्माण करून वा कोंडीत पकडून निवृत्त करणे तुलनेने सोपे जाते. पुरूषप्रधान दृष्टिकोनाचा फायदा घेऊन बायका बेकार असल्या तर बिघडले कोठे असे सहज म्हणता येते. याचा वापर करून स्त्रियांची उद्योगांतून व सेवांतून मोठ्या प्रमाणावर हकालपट्टी करण्याचे प्रयत्न जारी आहेत. पण याचा परिणाम स्त्रियांचे परावलंबित्व वाढण्यात आणि स्त्रीपुरूष समतेच्या वाटचालीत खीळ बसण्यात होईल. चौथा सर्वात महत्वाचा दुष्परिणाम होईल तो दलित-आदिवासींवर. खाजगीकरणामुळे सामाजिकदृष्ट्या मागासलेल्यांना राखीव जागा ठेवण्याची शक्यता संपुष्टात येईल. नवे रोजगारच निर्माण न झाल्याने नव्या राखीव जागा ठेवण्याची शक्यता संपुष्टात येईल. सरकारी क्षेत्रात तर भरतीच बंद झाली आहे. मग नव्याराखीव जागाकिती निर्माण होणार ?

अत्यंत तुटपुंज्या रोजगारांसाठी होणाऱ्या तीव्र स्पर्धेत बळी तो कान पिळीचा न्याय लागू होईल आणि आर्थिक-सामाजिकदृष्ट्या प्रस्थापित जाती व वर्गच नव्या संधी बळकावतील. आर्थिक विकासाच्यासंधीच नाकारल्या गेलेल्यांना मग सामाजिक समतेच्या शक्यता आणखी दुरावणार. अशा प्रचंड बेकारीच्या परिणामी लॅटिन अमेरिकन देशातील जवळजवळ ५० टक्के तरूण बेकायदेशीर व गुन्हेगारी व्यवहारात गुंतलेले आहेत. सामाजिक जीवनाचे गुन्हेगारीकरण, असुरक्षितता, वाढती सट्टेबाजी व व्यसनाधीनता यांची भर, गल्लीबोळातल्या लॉटरीपासून तेवीस दिवसात पैसे दुप्पट करा ते हर्षद मेहता प्रकरण, यातून जे नैराश्य व मानसिक तणाव वाढत जातील, याचे काय करणार ?

**शिक्षण**

कोणत्याही देशाच्या समाजिक व आर्थिक विकासासाठी शिक्षण हे पायाभूत आहे आणि त्यादृष्टीनेच प्राथमिक शिक्षण (१४ वर्षापर्यंत) हे सार्वत्रिक व सक्तीने करण्याची जबाबदारी शासनाने (कलम ४५ भारतीय घटना) घेतलेली होती. ती सोडून शासनाने शिक्षणाचेही व्यापारीकरण चालू केले आहे. गॅट करारातील गॅट्रस खाली शिक्षणाचे व्यापारीकरण येते. भारत अजून त्यामध्ये सामील नाही, तरीही केंद्र सरकारने परकीय संस्थांना भारतात समान पातळीवर प्रवेश देण्यास आरंभ केला आहे. संगणक साक्षरता व तंत्रशिक्षणावरचा भर वाढता आहे. खाजगी शिक्षण संस्थांमध्ये व्यापारी दराने हजारांच्या घरातील शुल्क आकारले जात असल्याने श्रीमंत व सामान्य यातील शैक्षणिक दरी वाढत आहे. तर शासन शिक्षणासाठी निधी पुरवण्याची जबाबदारी झटकून कंत्राटी शिक्षक भरती करू लागले आहे. शास्त्रीय संशोधन, कृषी संशोधन याचे अनुदान बंद करून या संस्थाही व्यापारी नफ्यासाठी चालवण्याकरता बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या सेवेत हजर होत आहेत. नैसर्गिक साधन संपत्ती विकासाला पायाभूत आहे. त्यासाठी पुढील पावले टाकली पाहिजे.

Scanned by CamScanner

विकासाला पायाभूत आहे. त्यासाठी पुढील पावले टाकली पाहिजेत.

१ ) **पाणलोट** - क्षेत्रविकास व हरितीकरण योजना राबवून गावात पडणारे पाणी जागीच मुरवून पाण्याची उपलब्धता व जमिनीचा पोत विचारात घेऊन जंगल-कुरणे, फळबागा, विविध पिके व पशुपालन यांचा परस्पर पोषक पद्धतीने आराखडा आखून गावातील प्रत्येक श्रमिकाला उत्पादनातील न्याय्य वाटा मिळेल असे संयोजन केले पाहीजे. विविध पिके, फळे, मत्स्य व पशुउत्पादने, जंगल-माल याचे वाढते उत्पादन व त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग आदीद्वारा वर्षभर व वाढता रोजगार गावात उपलब्ध होऊन श्रमिकांचे उत्पन्न व राहणीमान वाढवणे शक्य होईल.

२) **नैसर्गिक विविधता** टिकवण्यासाठी गावाजवळच्या रानावनांचे रक्षण आणि आसमंतातील नदी-नाल्याच्या काठाने, पडजमिनीत गावाच्या परिसरातील झाडे-झुडपे यांचे बी व खुंट याचे रोपण करून नैसर्गिक संपत्तीचे जतन व वाढ करणे अगत्याचे आहे. नैसर्गिक जंगलात, ताणांच्या, झाडा-झुडुपांच्या हजारो जाती आढळतात हा जीवनसूत्रांचा अनमोल ठेवा असून नव्या प्रजातींच्या विकासासाठी त्या पायाभूत आहेत. भारतातील पारंपारीक पिके व निसर्ग-संपत्तीचे जतन ही फार महत्त्वाची बाब आहे. आजच पिकांच्या अनेक प्रजाती नष्ट झाल्या आहेत. त्या केवळ जनुकपेढीत गोळा करून भागत नाही. त्यांच्या नैसर्गिक परिसरात त्या टिकवणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टिने अशा प्रजातींची पद्धतशीर माहीती गोळा केली पाहीजे व त्यांचे जतन करण्यासाठी खेडेपातळीवर शेतकरी सहकारी गटांना ही जबाबदारी देऊन कृषी विद्यापीठामार्फत मार्गदर्शन व मदत केली पाहीजे.

भारतीय शेतकऱ्याने भारतातील नैसर्गिक विविधतेच्या जोरावर शेतीविज्ञान, तंत्रविज्ञान प्रगत करून धान्ये, तेलबिया, तंतूपिके, फळे, भाज्या यांच्या हजारो जाती विकसित केल्या. मुक्त देवाण घेवाणीमुळेच हे शक्य झाले. भारतीय शेतकरी व शेताचा विकास आणि अन्नधान्याची स्वयंपूर्णता यादृष्टीने बदलत्या परिस्थितीला तोंड देत योग्य ती निवड करणे ही पैदासी विषयीची प्रवाही प्रक्रियाच चालू राहाणे अगत्याचे आहे. भारतातील वनस्पती प्रजाती व अन्य जैविक संपत्ती अशा जीव-रूपांवर पेटंट हक्क देता कामा नये. संशोधन करतांना शेतकऱ्यांच्या गरजा व कुवत विचारात घेऊनच संशोधन पुढे गेले पाहिजे. शासकीय संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे, महाविद्यालये यांनी शतकऱ्यांशी संवाद साधून आधुनिक तंत्रज्ञानाचा समुचित वापर विकसित करावा. नविन तंत्रविज्ञानाचा स्वीकार करताना ते शेतकऱ्याला परवडेल का, उत्पादन बुडण्याचा धोका किती आहे, त्याने शेतकऱ्याला निश्चित फायदा किती होईल आणि पर्यावरणावर प्रतिकुल परिणाम संभवत नाहीत ना या सर्वांची शास्त्रीय छाननी झाली पाहिजे. हे कृषी विद्यापीठांमार्फत शक्य आहे. खाजगी कंपन्या शेतकऱ्याचे हित व पर्यावरण याबाबत बेफिकीर असल्याने खाजगी कंपन्यांवर कडक नियंत्रणे व जरूर तेथे बंदी आवश्यक आहे.

३) चांगले उत्पन्न देणारी खात्रीशीर बियाणे शेतकऱ्यांना वेळेवर मिळाली पाहिजेत. ती माफक दरात पण मिळाली पाहिजेत. त्यासाठी खाजगी कंपन्यांवर विसंबून रहायची वेळ यायला नको. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या तर जाळ्यात अडकायला नकोच. तेव्हा गावो-गावी शेतकरी मंडळे स्थापन करून पद्धतशीरपणे दर्जेदार बियाण्याची पैदास करून तसेच पारंपारीक जाती सांभाळून शेती आपल्या हातात ठेवणे गरजेचे आहे. जनुकात फेरबदल केलेल्या **बियाणांच्या पर्यावरणीय परिणामांचे शास्त्रशुद्ध अभ्यास झालेले नाहीत. असे अभ्यास पुरे**

..........................

Scanned by CamScanner

**होऊन ही बियाणे बिनधोक आहेत हे सिद्ध झाल्याविना भारतामध्ये अशा बियाणांची आयात, उत्पादन वितरण यांवर बंदी असली पाहिजे. कडक व चोख नियंत्रण व्यवस्था हवी.**

४) उष्ण कटिबंधातल्या शेतीप्रधान देशातल्या वनस्पती संपत्तीच्या रक्षणाच्या दृष्टीने अनुरूप धोरणे व यंत्रणा उभारण्यासाठी इतर देशांबरोबर विचारविनीमय सुरू केला पाहिजे. विकसनशील देशांची अन्नाधान्यातील स्वयंपूर्णता व सुरक्षितता राखण्याच्या अधिकारांबाबत प्रत्येक देशाची स्वायत्तता पूर्णत: अबाधित राहिली पाहिजे. जागतिक व्यापार संघटना अगर कोणत्याही देशबाह्य संघटनेने त्याबाबत हस्तक्षेप करता नये.

### उद्योग क्षेत्रातील पर्याय

आधुनिक जगात वाहतूक, दळणवळण, वीजनिर्मिती शास्त्रीय संशोधन, नागरी सेवा आदी क्षेत्रांसाठी आधुनिक तंत्राची गरज आहे. याला पायाभूत इंधनतेल आणि खाण उद्योग, धातुउद्योग, यंत्रोद्योग हे आधुनिक उद्योग आणि त्याला पुरक वित्तव्यवहार आणि परराष्ट्र व्यापार हे सर्व सार्वजनिक नियंत्रणाखाली असणे अगत्याचे आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तंत्रज्ञ, कामगार, कर्मचारी यांच्या सहभागाने आणि विविध उत्पादने आणि सेवा वापरणाऱ्या ग्राहकांच्या सल्ला मसलतीने उत्पादनाबाबतचे निर्णय, तंत्र आणि व्यवस्थापन व्यवस्था आखली पाहिजे. आधुनिक विज्ञानाच्या आधारे औद्योगीक तंत्रामध्ये इच्छित दिशेने बदल करणे शक्य आहे. नव्या तंत्राचा विकास करताना मानवी सर्वनशीलतेला वाव देणारे, जडकाम, कंटाळवाणे, काम कमी करणारे, पुनरूतपादनक्षम नसलेल्या मर्यादित निसर्गसंपत्तीचा (तेल, खनिज) किमान वापर करणारे, पुनरूत्पादनक्षम कच्चा माल आणि ऊर्जा स्त्रोत यांच्या वापरावर (वनस्पतीजन्य संपत्ती, पाणी, वारा, सूर्य) भर देणारे प्रदुषण आणि कचरा किमान राखणारे, श्रमिकांच्या सामूहीक नेतृत्वाखाली चालले असे असण्यावर भर देणे जरूरीचे आहे.

उत्पादन तंत्राप्रमाणे व्यवस्थापना बाबतचे निर्णय महत्वाचे आहेत. श्रेणीबद्ध नोकरशाही व्यवस्थापनाचे उद्योग, सेवा, शिक्षण, आरोग्य प्रशासन यासर्वच क्षेत्रातून उच्चाटन होणे अगत्याचे आहे. देशव्यापी सेवा आणि जड उद्योग सोडल्यास अन्य व्यवहारात सहकार हा संघटनाचा पाया योग्य ठरेल. शेतकरी, कारागीर मच्छीमार, बांधकाम कामगार आदी विविध लहान उत्पादक श्रमिकांच्या सहकारी संस्था आणि ग्राहक सहकारी संस्था परस्पर पोषक भातृभावी संबंधानी जोडणे अगत्याचे आहे.

### विकेंद्रीकरण

पर्यायी विकासनीतीत उत्पादनतंत्र व व्यवस्थापनात आमुलाग्र बदल करणे महत्वाचे तसेच वितरण व्यवस्थेतही आमुलाग्र बदल करणे महत्वाचे आहे. केंद्रीभूत उत्पादन पद्धतीत कच्चा माल मोठ्या अंतरावरून वाहून नेणे, तो साठवून तयार माल दुरवरच्या केंद्रात पोचवणे त्यासाठी वित्तव्यवस्था, मध्यस्त, दलाल यांची मोठी साखळी, माल खपवण्यासाठी जाहिरातबाजी, यामुळे बांडगुळी सेवा आणि व्यवसाय यांची मोठी साखळी तयार होते. वाहतूक आणि साठवणूक आदिसाठी नाहक ऊर्जा खर्ची पडते आणि मालाची मोठी उधळमाधळ होते. तसेच भांडवली केंद्रीकरणाच्या प्रक्रियेत शेतकरी जमिनीवरून उठवला जाऊन पोट भरण्यासाठी शहराकडे फेकला जातो. महानगरे अमर्याद वाढत जाऊन घरे व नागरी सुविधा पुरवणे अधिकाधिक खर्चिक बनते.



Scanned by CamScanner

विशेषत: जमिनीची साठेबाजी आणि सट्टेबाजी यामुळे श्रमिक जनता झोपडपट्टी, पदपथावर ढकलली जाते. शहरातील रोजगाराची वानवा असल्याने काळे धंदे आणि गुन्हेगारीत तरूण फेकले जातात. सत्ता, काळा पैसा आणि गुन्हेगारी यांची साखळी जनजीवना भोवती आवळली जाते शेती ही विकास केंद्रीत असल्यामुळे केंद्रीत नागरीकरणाला आळा बसेल, विकेंद्रीत लोकवस्ती आणि उत्पादन यामुळे सर्व जनतेला ताजे, सकस, रसायनाने दूषित न केलेले अन्न, समुचित निवारा, स्वच्छ हवा आणि पाणी असे आरोग्यदायी आणि प्रसन्न जीवन मिळू शकेल.

लोककेंद्री विकासासाठी आवश्यक गुंतवणुक निधी आणि साधनसामुग्री भारतात पुरेशी आहे. परंतु आज सट्टेबाजी, सर्टटेबाजी, सोन्याचे साठे, चैनचंगळीच्या वस्तु, काळे व्यवहार यात संपत्ती मोठ्या प्रमाणात अडकली आहे. लोककेंद्री विकासनीतीत शेअरबाजार, सट्टा, जमिनीची सट्टेबाजी याला थारा असणार नाही. समुचित कर, सार्वजनिक बचत योजना, सरकारी पतपेढ्या याद्वारे विविध उत्पादक घटक आणि पूरक सेवासुविधा यासाठी निधी उपलब्ध करता येईल. रेल्वे. रस्ते ऊर्जा पुरवठा आदी सुविधा वाढवतांना त्याबाबतचे अग्रक्रम, दर आदी ठरवतांना पारदर्शकता राहावी या दृष्टीने त्यायोजना जनतेला खुल्या ठेवल्या जाऊन वस्तुनिष्ठ पद्धतीने योजनांची छाननी करण्याची तरतुद करून सार्वजनिक क्षेत्रातील निर्णयप्रक्रिया जबाबदार बनवता येईल. अशा स्वयंनिर्भर विकास नीतीचा स्वीकार करावा आणि गॅट कराराच्या गुलामगिरीच्या पाशातून मुक्त व्हावे यासाठी भारतात व जागतिक पातळीवर जनआंदोलन संघटित होत आहेत.

✦✦✦

Scanned by CamScanner

# जागतीकीकरणात लोककल्याणाचे स्थान

प्रा. राजाभाऊ दूरगकर,
नवप्रतिमा कनिष्ठ महाविद्यालय,
मिरची बाजार, सक्करदरा, नागपूर

**प्रस्तावना**

जागतीकीकरण व लोककल्याण ह्या दोन्ही व्याख्या व त्याचा अभ्यास अर्थशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यासल्यास, जागतिकीकरण ही एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वच संदर्भात उपयोगात आणली जाणारी आर्थिक, व्यापारीक, देवाण घेवाणातील संतुलन व परस्पर व्यापाराबाबतचे धोरण ठरवून देणारी, एक समायोजीत व समामेलीत प्रक्रीया होय. कल्याणाचा अर्थ स्मिथ पासून तर मार्शलपर्यंतच्या काळात केवळ उपयोगीतेच्या गणनात्मक पद्धतीचा विचार करून उपयोगिता, संतोषाधिक्य, समाधानाची पातळी, इथपर्यन्त कल्याणाचा दृष्टिकोण स्पष्ट झालेला दिसून येतो. कारण नेमके कल्याण म्हणजे काय ? याचा व्यापक पद्धतीने विचार करण्याची सुरूवात प्रा. पिगू व नंतरच्या काळात झालेली दिसून येते. शेवटी कल्याणाच्या बाबतीत त्याची एकूण स्थिती ही उपभोक्त्याच्या किंवा ग्राहकाच्या मनोनिष्ट संकल्पनेवर आधारलेली असते. शिवाय प्रत्येकाला येणार अनुभव हा त्या व्यक्तीसापेक्ष वेगवेगळा असतो प्रत्येकाचे किंवा एकऐकाचे हित किंवा उद्देश समाधानाच्या पातळया ठरविण्यासाठी सारख्याच राहातील असे म्हणता येत नाही आणि म्हणून अशा ठरविण्यात येणाऱ्या कसोट्यापासून कल्याणाची व्यापकता स्पष्ट करणे देखील कसोटीचे ठरते. याच आधारावर सायटोवस्कीने कल्याणच्या कसोटया ठरविल्या आहे.

**अ) जागतीकीकरण एक प्रक्रिया**

जागतिकीकरणाची प्रक्रीया आंतरराष्ट्रीय स्तरावर १९८० च्यानंतरच्या दशकात व्हायला प्रारंभ झाला - थ्रेचर रिंगन काळात याची विशेष सुरूवात झालेली दिसून येते व याचे वारे सर्वच दूरवर पसरण्यात मदत झाली. विकसीत व विकसनशील राष्ट्रातील व्यापार क्षेत्रातील संतुलन, देण्याघेण्याचा आढावा, काही वस्तू वरील आयात निर्यात करातील रचनेतील बदल, विकसनशील देशांना दिले जाणारे अनुदान, भांडवलाची गतीशिलता व परकीय संख्याकडून गूंतवणूकीच्या स्वरूपातील वापर (MNCs) व्याजाचे दर, आंतरराष्ट्रीय पातळीवर समान व्हावे यासाठीचे प्रयत्न, विकसनशील देशांना देण्याघेण्याच्या आढाव्यातील परताव्यातून अधिक भार येऊ नये यासाठी स्वतंत्र धोरण व खुली स्पर्धा याबाबतीत केल्या गेलेले जागतिकरणाचे विश्लेषण ठरेल. भारतातही ही प्रक्रीया १९९१ च्या काळात लागू करण्यात आली. मिश्र अर्थव्यवस्थेतून विकास व सामान्यांचे हित म्हणजेच कल्याण होय हे विकसीत व्हावे यासाठी यामधून प्रयत्न करण्यात येणार होते व सामान्याचे हित म्हणजे कल्याण म्हणून १९९१ पर्यन्तच्या म्हणजे आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळापर्यन्त पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्र याद्वारे देशातील वासतविक विकासाचा दर (Real growth rate) प्राप्त करण्याचे निश्चित केल्या गेले होते. परंतु खाजगी व सार्वजनीक क्षेत्रातील धोरण, विकासाच्या संदर्भात सामान्य व्यक्तींना न्याय देणारा आहे का याचा विचार करूनच सार्वजनिक क्षेत्रातील



Scanned by CamScanner

गूंतवणूक, व्यवस्थापण व मालकीहक्क सरकारने आपल्याकडे ठेवून घेतला होता. कारण सार्वजनिक क्षेत्रातील उद्योजकता ही सरकारच्या मालकीची राहणारी असेल तर त्यातून आर्थिक शोषणाची स्थिती निर्माण होणार नाही व सर्वच स्तरावर देशातील नागरीक म्हणजे उपभोक्ता किंवा ग्राहक हा लाभ प्राप्त करून घेण्याच्या दृष्टिने सरकारी योजनेतील केंद्रबिंदू म्हणून राहील ज्याचा व्यक्तीगत, सामाजिक कल्याणातील भर हा विषय असेल याचाच अर्थ जागतीकीकरणाच्या पूर्वी लोककल्याण घडून येत नव्हते असे नाही तर लोककल्याण घडवून आणण्याची प्रक्रिया ही योजनेच्या माध्यमातून स्विकारल्या गेली होती उदा- उपभोक्त्याचे आर्थिक कल्याण व्हावे शोषण होऊ नये व त्याच्या समाधानात वाढ व्हावी याकरिता सरकारने ठरवून दिलेले प्रशासकीय मूल्य (Administrative price) किंवा कृषी मालाच्या सरकारने निर्धारीत केलेल्या किंमती, अनुदाने, सामाजिक सोयी, उदा-शिक्षण, आरोग्य यांचा सामीजक कल्याणात विचार करता येईल. जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत प्रामुख्याने सरकारची भूमिका कशी राहील यावर त्याचे केवळ मूल्यमापन अवलंबून नसेल तर खाजगी क्षेत्रातील स्वायतता हा या संदर्भात महत्वाचा विचार करावयाला लावणार एक मोठा हिस्सा होय. केवळ खाजगीकरणातूनच हा प्रश्न संपूर्णपणे सुटेल असे म्हणता येणार नाही तर त्याकरिता विदेशी भांडवलाचा प्रवाह देशातंर्गत येऊन सर्वच क्षेत्रात त्याद्वारे बदल होत आहे. अर्थातच त्यांच्याद्वारे केल्या गेलेली गुंतवणूक ही मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे देशी उद्योग ह्या स्पर्धेत टिकून राहणार नसेल तर भविष्यकाळात निर्माण होणारी संपत्ती ही देशातील सामाजिक संपत्ती (Social Assets) होऊ शकेल काय ? कारण केवळ गुंतवणूक करून राष्ट्रीय उत्पनात भर टाकणारी ही जरी प्रक्रीया असली तरी त्या प्रक्रीयेतून निर्माण नविन उत्पन्नाची पातळी ही सर्वच स्तरातील लोकांना उपयुक्त व लाभप्रद राहीलच असे म्हणता येणार नाही कारण केवळ संपत्तीत किंवा उत्पन्नात वाढ होऊन चालत नाही तर उत्पन्नाचे वितरण व वितरणातील क्षमता व गती याचा विचार करणे आवश्यक ठरते यामध्ये दोष असेल तर जागतिकीकरणातून केवळ विशिष्ट लोकांच्या उत्पन्नात वाढ होईल व भांडवलीकरणाच्या प्रक्रीयेला पुन्हा उत्तेजन मिळेल असे जर होत असेल तर जागतिकीकरणाची प्रक्रिया व त्याचे नियम थढज द्वारा पुनविचार करून काही मर्यादिपर्यंत त्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. अशाप्रकारचा जागतीकरणाचा कल लोककल्याणात बदल घडून आणण्याची किंवा लोककल्याणात वाढ घडून आणण्यासाठी योग्य आहे असे म्हणता येणार नाही. म्हणून या सर्वच प्रक्रीयेवर म्हणजेच WTO द्वारे नियंत्रण ठेवणे अति महत्वाचे ठरेल कारण ती कायदेशीर संस्था आहे. या संदर्भात भारताच्या खाजगी क्षेत्रातील काही व्यवस्था तपासल्यास असे दिसून येते की भारतामध्ये कार्यरत असणारी णछख-डखतएठ ची कखछऊगडढअछ-डखतएठ डढऊ या कंपनीमध्ये अनेक भारतीय कंपन्यांचे संविलयन झालेल आहेत. अशा प्रकारचे होणारे संविलयन देशी भांडवल कमी करेल का ? किंवा भविष्यकाळात भांडवल निर्मितीची प्रक्रीया अशा क्षेत्रातून कमी होणारी असेल व जर ही प्रक्रीया सतत चालू राहणारी असेल तर देशांतर्गत देशी पुंजी निर्मितीचा प्रश्न व गुंतवणूकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण होतील व त्यातून व्यक्तीगत रोजगार व राष्ट्रीय रोजगाराची पातळी कमी होईल तर अशा प्रक्रियेतून व्यक्तीगत कल्याण किंवा सामाजिक कल्याण देखील प्राप्त करणे शक्य होणार नाही.

**ब) कल्याणाची व्यापकता**

**१) बॉवर -** महत्तम सामाजिक समाधानाच्या मापदंडाच्या आधारावर अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे विश्लेषण म्हणजे कल्याणकारी अर्थशास्त्र होय.

Scanned by CamScanner

**२) पिगूची संकल्पना** - आर्थिक कल्याण व सामान्य कल्याणाचा असा भाग आहे की ज्यास मुद्रेच्या मापदंडाने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या मोजले जाऊ शकते.

वरील व्याख्येचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, आर्थिक कल्याण याचा अर्थ एखाद्या व्यक्तीचे असे समाधान की जे त्यावर विनियम योग्य आर्थिक वस्तू तसेच सेवेच्या उपभोगापासून प्राप्त होते.

**पॅरेटोची मांडणी** - पैरेटो यांनी आपली कल्याणाची पद्धती मांडताना उपयोगीतेच्या क्रमवाचक (ordinal) पद्धतीचा वापर केलेला दिसून येतो. व्यक्ती व्यक्तीगत कल्याणाची तूलना करणे शक्य होत नाही. सामाजिक कल्याणात वाढ झाली आहे असे तेव्हांच म्हणतायेईल की जर इतराच्या परिस्थितीत कोणताही बदल न करता एका व्यक्तींच्या स्थितीत सुधारणा (किंवा बिघाड) केली जाते. म्हणजेच एखाद्या सामाजिक बदलामुळे जर काही व्यक्तींच्या स्थितीत सुधारणा होत असेल आणि काही व्यक्तीच्या स्थितीत बिघाड होत असेल तर सामाजिक कलयाणात काय बदल होतो या दृष्टिनी निर्णय पॅरेटोच्या सामाजिक कल्याणाच्या कल्पनेच्या आधारवर सांगणे अशक्य आहे. पण प्रत्यक्षात व्यवहारात अशाच घटना घडत असतात म्हणून पॅरेटोची कल्पना अधिक योग्य आहे असे म्हणता येत नाही.

**प्रो. बर्गसन** - समाज कल्याण फलनाची कल्पना मांडताना नैतिक निर्णयाच्या आवश्यकतेवर भर दिली आहे. त्याच्या मतानूसार नैतिक निर्णय राजसत्तेद्वारे तयार केलेले असणे आवश्यक आहे आणि या बाह्य निर्णयाच्या आधारावर अर्थशास्त्रज्ञांद्वारे समाज कल्याण महत्तम होण्यासाठी आर्थिक नितीचे निर्धारण केले जाते. समाज कल्याणात भर टाकणारी आर्थिक निती असणे आवश्यक होय.

**या संदर्भात - जागतीकीकरण व लोक कल्याण** - याचा परामर्श होणे आवश्यक आहे वरील व्याख्येवरून हे स्पष्ट होते की, समाज कल्याण हा कोणत्याही राजसत्तेचा प्रमुख हेतू असणे आवश्यक होय याचाच अर्थ समाज कल्याणातील वास्तविकता, समाज म्हणजे सर्वस्तरावतरील मनुष्य समाजाची असलेली एकूण संख्या होय. यातील प्रत्येकाचे व ऐकऐकाचे कल्याण म्हणजे सामाजिक कल्याणातील बदलाची पुढील दिशा राहील. कारण सामाजिक कल्याण्याच्या विवेचनास वस्तुगत विवेचनाचे स्वरूप देणे अडचणीचे आहे. व्यक्तीगत कल्याण हे व्यक्तीच्या निवडीद्वारे व्यक्त केल्या जाऊ शकते.

**प्रा पिगू यांची सामाजिक व खाजगी शुद्ध उत्पत्तीतील असमानतेची कल्पना** - पिगू यांनी सामाजिक कल्याण महत्तम करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्न महत्तम केले पाहीजे. राष्ट्रातील उत्पादक घटकाचे वाटप युक्ततम (Optimum) करतांना प्राप्त होणारी उत्पती महत्तम असते. त्याचप्रमाणे उत्पादीत वस्तूचा उपयोग हा योग्य होत असेल तरच सामाजिक कल्याण महत्तम असते. सामाजिक कल्याणाची महत्तम स्थिती स्पष्ट करण्यासाठी पिगू यांनी खाजगी सीमांत शुद्ध उत्पत्ती आणि सामाजिक सीमांत शुद्ध उत्पत्ती स्पष्ट केली आहे. या दोन्ही सिमांत शुद्ध उत्पत्ती जेव्हा एकमेकांबरोबर असतात तेव्हांच समाजाचे कल्याण महत्तम असते त्यामुळे या दोन्ही सीमांत शुद्ध उत्पत्तीचा वापर केला गेलेला आहे.

खाजगी सीमांत शुद्ध उत्पत्ती याचा अर्थ असे अशंदान की जे विकण्याजोगे असते आणि विकून आलेली रक्कम त्या विशिष्ट गुंतवणूक एककास जबाबदार असणाऱ्या व्यक्तीच्या मिळकतीत मिळविली जाते.



Scanned by CamScanner

सामाजिक कल्याण महत्तम करण्यासाठी या दोन्ही सीमांत शुद्ध उत्पत्ती एकमेकाबरोबर असणे आवश्यक आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारात अनेकदा काही आर्थिक क्रियाचा परिणाम असा होतो की, त्या व्यवहाराच्या बाबतीत सामाजिक व खाजगी सीमांत उत्पत्तीत तफावत आढळून येते या दोन्ही शुद्ध उत्पतीमध्ये असलेल्या तफावतीच्या परिणामामुळे सामाजिक कल्याण महत्तम करणे शक्य होत नाही.

या दोन्ही वर स्पष्ट केल्या गेलेल्या बाबीचे स्पष्टीकरण जागतिकीकरणाच्या संदर्भात एखाद्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टिने तपासून किंवा त्याचे एकूण मूल्यमापण करून सामाजिक कल्याणातील बदल कोणत्या दिशेने होत आहे हे तपासणे या संदर्भात उचीत होईल.

**जागतिकीकरण व सामाजिक कल्याण :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुख्यत: अर्थव्यवस्थेवरील सर्व निर्बंध काढून टाकल्या जातात किंवा ही निर्बंधे टप्याटप्याने सैल केली जातात. भारताचे उदा. घ्यावयाचे झाल्यास भारतात टप्याटप्याने सर्व बंधने काढून टाकण्यात येत आहे(END OF LICENCE PERMIT RAJ). परवाना पद्धतीचे धोरण समाप्त होत आहे. निर्गूतवणूकीचे धोरण जरी थांबले असले तरी ते बंद झाले नाही. जकात शुल्क दरात दिवसेंदिवस कपात, अनुदानातील कपातीची बोलणी, श्रमीक संघटना व त्यांची स्थिती, करारी पद्धतीने नौकर वर्गाची नियुक्ती, भविष्य काळात रेल्वे, पोस्ट कार्यालय व आवश्यकता भासल्यास संरक्षण क्षेत्राचे देखील होणारे खाजगीकरण किंवा सार्वजनिक क्षेत्रातील निर्गूतवणूक यांच्या अंतर्गत होणारे अंतर्गत व बाह्यगत बदल घडून आणण्यात वर स्पष्ट केल्याप्रमाणे वापरल्या गेलेल्या आर्थिक नितीतून (Economic Policy) हे बदल घडून येणार असेल तर आर्थिक नितीचा योग्य उपयोग होत आहे असे म्हणता येणार नाही कारण अशा नितीद्वारे संपत्तीचे केंद्रीकरण होऊन सामान्यांचे हित साधले जाईल असे म्हणता येत नाही.

भारताने जागतिकीकरणाचा आरंभ केला तेव्हापासून तर आजपर्यंन्तच्या काळात आर्थिक नितीतील बदल ही सामाजिक कल्याणात वाढ घडून आणेल अशीच स्वीकारलेली आहे असे आपणास स्पष्ट करावे लागेल. कारण ह्या आर्थिक नितीतील बदलाचा योगय उपयोग अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रातील निर्यात व्यापार अधिक असल्यामुळे त्या क्षेत्रात रोजगार निर्माण क्षमता व त्यात होणारे सतत बदल खाजगी सिमांत शुद्ध उत्पत्तीत भर टाकणारे आहे व त्याचे सहाय्यक उत्पादन करणाऱ्या उद्योग व्यावसायिकांना देखील त्याचा लाभ झाल्यामुळे रोजगारीच्या दरात बदल झालेला दिसून येतो ज्यामुळे उत्पन्नातील बदल व उत्पन्न लवचिकतेतील बदल ही बाब व्यक्तीगत कल्याण व सामाजिक कल्याणात बदल घडून आणणारी ठरत आहे.

यासंदर्भात संपूर्ण बदलत्या आर्थिक नितीचा किंवा धोरणाचा सर्व समाज जीवनावर कोणता परिणाम होत आहे किंवा समाजजीवनातल बदल सर्व स्तरातून व समोरच्या दिशेने होत आहे का ? (Forword Direction) हे तपासून पाहणे अतिशय महत्वाचे होय कारण समाजातील जडण घडण पक्रियेत नविन धोरणाचा परिणाम ही बाब अनुकूल किंवा प्रतिकूल त्या दोन्ही दिशेने होत असते आणि म्हणून भारतीय व्यवस्थेत जागतिकीकरणाची प्रक्रिया आरंभ केल्या गेली तेव्हापासून आतापर्यन्त अर्थव्यवस्थेत अनेक अनुभव आले. कधी एकूण उत्पादनात वाढ तर कधी घट, कृषी उत्पादनातील नकारात्मक बदल, औद्योगिक उत्पादनात डिसे. २००४, अखेरपर्यंत १०.११% झालेली वाढ निर्माणी क्षेत्रातील ११.१०% झालेला बदल ह्यातून राष्ट्रीय



Scanned by CamScanner

उत्पादनात बदल होईल ज्याचा परिणाम रोजगारातील वाढ होऊन लोकांच्या उत्पन्नातील बदल अधिक क्रयशक्ती करण्याकडे होणार असेल तर त्यातून उपभोक्त्याचे आर्थिक कल्याण साधले जाणे शक्य आहे म्हणजेच काही प्रक्रियेत जागतिकीकरणातून लोककल्याण व त्यातील बदल स्पष्ट करता येतो. याचा अर्थ असा लावता येईल की वर्तमान स्थितीतील आर्थिक प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या लाभाची क्षमता सर्व स्तरातून वितरीत केल्या जात असेल व त्याचा लाभ सर्व सामाजिक पातळीत समान स्वरूपात होत असेल तर बदललेल्या आर्थिक नितीचा परिणाम आर्थिक कल्याणात वाढ करणार आहे असे म्हणता येईल परंतु अशा प्रकारची वाढ घडून आणणारी स्थिती केवळ एखादी दूसरी कसोटी असेल तर संपूर्ण सामाजिक कल्याणात वाढ होईलच असे म्हणता येणार नाही. प्रा. पिगूने ज्या दोन कसोट्या दिल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने कसोटी क्रमांक -१ - कल्याणात वाढ घडून आणण्यासाठी प्रामुख्याने राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ किंवा बदल श्रीमंतीत वाढ घडून आणणार असेल तर जितक्या प्रमाणात त्यात वाढ झालेली आहे तितक्याच प्रमाणात त्या उत्पन्नाचा वितरणातून गरिबी किंवा देशातील निर्धनता कमी करण्यसाठी त्याचा वापर झाल्यास या दुसऱ्या सांगीतलेल्या कसोटीचा वापर प्रामुख्याने समाज कल्याणात वाढ घडून आणणार असेल. उदा. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ केवळ श्रीमंत वर्गाकडे २०% या दराने जमा होत असेल तर २०% झालेली वाढ गरीबीत किंवा निर्धन व्यवस्था यामध्ये त्याचे वितरण झाल्यास समाजातील संपतीच्या वितरणात समानता साधता येऊ शकेल एकून समाधानाच्या पातळीत बदल झाल्यास सामाजिक कल्याणात वाढ होणे त्यातून शक्य होईल. अशाप्रकारे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत लोककल्याण तपासून पाहात असतांना त्याचे मानक (Standard) निश्चित करणे आवश्यक आहे. तेव्हांच लोककल्याणातील वाढ किंवा घट किंवा जागतीकीकरणाचे केवळ दोष किंवा गुण याचा वेगवेगळ्या वापरलेल्या मानकातून अभ्यास केल्यास त्यातील बदल तपासणे शक्य होतील.

यासंदर्भात निर्गुंतवणूक धोरण, (सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचे खाजगी क्षेत्रात रूपांतर) श्रमधोरण (Labour policy) आयात निर्यात धोरण, व्याजाचे दर, रोजगार निर्माण संख्या व रोजगार कायदा व्यवस्था या मधील बदल ज्यामुळे श्रमीक संघटना व खुले श्रमीक धोरण (Use and throw polic) शिक्षणा सारख्या व्यवस्थेतील बदल व विदेशी विद्यापीठांचे आगमन (उच्च शिक्षणाचे जागतीकरण) या सर्व प्रक्रियेतूनच मूलभूत: व्यवस्था व त्यातील बदल व त्याचे परिणाम एकूणच सकारात्मक दिशेने बदल घडून येतील किंवा येणार नाही हे आजच सांगता येणार नाही म्हणजेच जागतिकिकरणातील पुढील दिशा व त्यातूननिर्माण होणारे कल्याण हे केवळ सरकारी धोरणा शिवाय राहणारे असेल व त्याकरिता स्वतंत्र आर्थिक निती (Economic Polic) चा वापर केवळ वैयक्तीक स्तरातून किंवा सामाजिक संस्था, ज्या सेवा देणाऱ्या आहेत किंवा सामाजिक स्तरातून ज्याची कार्य दिशा कल्याणात्मक विकास व कल्याणकारी बदल होण्यास प्रवृत्त करणाऱ्या आहेत तर अशा स्थितीतून निर्माण होणारे कल्याण हे स्वतंत्र आर्थिक नितीचाच परिणाम असेल. परंतु सरकारी धोरणाशिवाय व सरकारी नियंत्रणा शिवाय हे बदल घडून आणणे शक्य होईल का ? याचाही विचार तेवढाच महत्वाचा आहे.

जागतिकीकरणातील अर्थव्यवस्थेचे खुले धोरण, व बाजारप्रणित अर्थव्यवस्था व त्यातून बाजारपेठेतील संतुलन जे प्रामुख्याने मागणी पुरवठा या दोन घटकावर अवलंबून असते असे बाजारप्रणालीत संतुलन प्रामुख्याने मागणीतील विश्लेषण ज्यामध्ये उपभोक्ता, किंवा ग्राहक क्रय, करण्याकरिता बाजारातील स्वतंत्र किंवा उपभोक्ताधिष्ठित बाजारपेठ यातून (Consumer choices) त्याला स्वतंत्र असेल म्हणजे

Scanned by CamScanner

बाजाराधिष्ठित प्रणालीतून उपभोगवादातील सातत्य राहणारे असेल व त्याकरीता उत्पादनाची संसाधने देखील त्याच प्रमाणे उत्पादन प्रक्रियेतून उत्पादनाचे घटक म्हणून वापरल्या जाणारे साहित्य उत्पादनातील आधुनिकता अंतर्गत मितव्ययता व बाह्यगत मितव्ययता ज्या अधिकाधीक प्रमाणात लाभ प्राप्त करून देणाऱ्या ठरत असतील तर उत्पादन प्रक्रियेत कार्यरत असणाऱ्या उत्पादनाच्या घटकाला त्यातून रोजगार प्राप्त होईल व खुल्या स्पर्धेचे अस्तित्व असल्यामुळे त्याचा लाभ किंवा फायदा ग्राहकाला होईल व अशा स्थितीत खुल्या स्पर्धेतून कल्याणाचे अस्तिव देखील निर्माणकरता येऊ शकेल असे स्पष्ट दिसून येईल.

वर्तमान स्थिती जागतीकिकरणाची प्रक्रिया ही प्रामुख्याने जवळपास सर्वच देशातील अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा एक भाग ठरत आहे. त्याच आर्थिक धोरणातून खुल्याबाजाराचे धोरण जे प्रामुख्याने अर्थ शास्त्राचे मूलत: धोरण होते त्याकडेच पुन्हा आपण वळलेले आहो असे दिसून येत आहे. कारण एखाद्य विशिष्ट कारणासाठी अर्थव्यवस्थेत सरकारी धोरणाद्वारे बदल घडून आणणे व अर्थव्यवस्थेत संपूर्णत: बाजारव्यवस्था सरकारच्या धोरणाचा परिणाम असणे ह्या दोन्ही बाबी परस्पर भिन्न आहे. अलिकडील काळात जागतिक मंदिचा प्रवाह सुरू झाला त्याकरिता जागतिकीकरणाची प्रक्रीया उत्तरदायी आहे असे अनेकांचे म्हणणे होते परंतु हा परिणाम एखाद्या वेळेस (Regular effect of Trade cycle) दीर्घकालीन व्यापार चक्राच्या स्वरूपात निर्माण झाले असेल. कदाचीत जगातील एकूण उत्पादनात घट हा त्याचाही परिणाम असू शकतो ज्यामुळे सामान्यांची क्रयशक्ती कमी होऊन उत्पन्नातील लवचिकता धनात्मक किंवा पुढील दिशेने न बदल्यामुळे जागतिकीकरणात आर्थिक कल्याण होत नाही असे चित्र निर्माण होण्यास मदत झाली Business is not the business of the Govt. असे जे म्हटले जाते ते कदाचीत ह्या अर्थाने असेल.

## सारांश :

जागतिकीकरणात लोककल्याणाचे स्थान काय असेल याचे संपूर्ण स्पष्टीकरण आजच देणे शक्य होणार नाही. परंतु जागतिकीकरणातून जे अर्थव्यवस्थेतील बदल खुलेधोरण व खाजगीकरण ह्यातून जर स्पर्धा वाढणारी असेल व कसोट्यामध्ये भर टाकणारे असेल तरच वैयक्तिक कल्याणात भविष्यकाळात भर पडेल असे म्हणावे लागेल ज्यातून सामाजिक कल्याण देखील साधने शक्य होईल व निर्माण होत असलेली खुल्या **स्पर्धेची स्थिती कि ज्यामध्ये, कठीण परिश्रम, अधिक उत्पादकता, योग्य कार्यक्षमता, कामातील सात्यतता, प्रामाणिकपणा व सचोटी याचा विकास सर्वच स्तरावर निर्माण करणे शक्य झाल्यास सामान्यांना स्पर्धेतून कल्याणाकडे जाता येणे शक्य होईल** अन्यथा जागतिकीकरणात किंवा खुल्या धोरणात कल्याण व त्याची परिभाषा अधिक काळ पुढे नेता येणार नाही.

**REFERNCES -**


1) ADVANCED ECONOMIC THEORY - P. N. CHOPRA

2) WELFARE ECONOMICS - PIGOU

३) उच्चतर आथिकि सिद्धांत - प्रा. के. ई. पाटील


+++

Scanned by CamScanner

# जागतीकीकरणात लोककल्याणाचे स्थान

प्रा. सौ. संध्या सुधाकर काळबांडे
श्री. बिंझाणी नगर महाविद्यालय ,नागपूर

---

**प्रास्ताविक**

जागतीकीकरण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारातील बंधने दूर करून व्यापार खुला करणे होय. राष्ट्रवाद बाजुला सारून राष्ट्राराष्ट्रांमधील उद्योग, व्यापार, शेती, दळणवळण, गुंतवणूक इ. क्षेत्रामध्ये खुलेपणा आणला जातो. यामध्ये जागतिक पातळीवर वस्तु व सेवांचा व्य ापार खुला करणे आणि तंत्रज्ञान, यंत्र, वस्तूसेवा यांच्या किंमती सारख्या असणे यांचा जागतीकीकरणामध्ये समावेश होतो. जागतीकी करणासाठी खाजगीकरण व उदारीकरण या दोन गोष्टींची आवश्यकता असते. थोडक्यात खाजगीकरण, उदारीकरण आणि शेवटची अवस्था म्हणजे जागतीकीकरण असा क्रम लागतो.

**जागतीकीकरणाची संज्ञा**

जागतीकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवलप्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्र ज्ञान ह्यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता ह्यांच्या सहाय्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबित्व होय. बॅं. वि. दा. सावरकर यांनी सुद्धा या संकल्पनेचे महत्व मान्य करून ते स्पष्ट केले आहे. एकंदरीत भारतीय समाजव्यवस्थेच्या अध:पतनाची कारणमिमांसा करताना सावरकरांनी 'सात स्वदेशी वेड्यांचे वर्णन' केलेले आहे. यामध्ये जातीधर्म हे जसे अध:पतनासाठी कारणीभूत ठरतात त्याचप्रमाणे भारतीयांची विशिष्ट मानसिकता सुद्धा कारणीभूत आहे. समुद्र ओलांडल्याने आपण जातीभ्रष्ट होतो ही तर एक वेडी भारतीय मानसिकता आहे, असे सावरकरांना वाटत होते. याचा दुष्परिणाम असा की आपण भारतीय विदेशी ज्ञान आणि कौशल्य यापासुन वंचित राहिलो. परिणामी भारताच्या आर्थिक विकासाला खिळ बसली. अशास स्वरूपाची जाणीव भारतीयांप्रमाणे जागतीक पातळीवर सुद्धा झाली. आणि याचाच परिणाम म्हणून २०व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये जागतीकीकरण जन्माला आहे.

भारताने सुद्धा जागतीकीकरणाची ही संल्पना उशिरा का होईना मान्य केली आहे. जागतीकीकरणाच्या संदर्भात १९५० नंतर जगाचे अर्थशास्त्र एकात्मीक होत गेलेले दिसते. २०व्शा शतकाच्या शेवटच्या २५ वर्षात मात्र जागतीकीकरणाची प्रक्रिया जोराने होत गेली. यामध्ये एकप्रकारे जागतीक बाजारपेठा एकत्र आल्या. जागतीकीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय वित्तव्यवस्था याबाबी प्रभावित झाल्या. जगातील बराच उत्पादित माल आता जागतिक व्यापारात येवू लागला आहे. आंतरदेशीय स्तरावर गुंतवणूकीमध्ये वाढ झाली आहे आणि आंतरराष्ट्रीय वित्त् व्यापार फार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतीक बँक या संस्थाचे प्रश्न उत्तरोत्तर वाढतांनाच दिसत आहे. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आर्थिक मदत देताना आणि कर्ज देतांना या वातावरणामध्येच बहुराष्ट्रीय कंपन्यांची वाढ होवू लागली.

Scanned by CamScanner

जागतीकीकरण हा ज्या आधुनिक पश्चिमी सभ्यतेचा अद्ययावत अविष्कार आहे ती आधुनिक पश्चिमी सभ्यात हेच खरे तर आपल्या पुढील आव्हान आहे. जागतिकीकरण हे महासंट आहे की ती एक भारताला आर्थिक महासत्ता बनविण्याची उपलब्ध झालेली सुवर्णसंधी आहे, यावरून देशात एकमत नाही हे आपण जाणतो. नियोजनबद्ध आर्थिक विकासाच्या मार्गाने वाटचाल करीत असता शासकिय नियम, निर्बंध, सवलती, अर्थसहाय्य नियंत्रण यांचा आधार घेवून अर्थवयवहारावर सरकारी प्रभुत्व प्रस्थापित केले गेले. परकिय मदत, कर्ज यांची सहजी उपलब्धता याकाळात होती. संरक्षक तटबद्याच्याआड अर्थव्यवस्था दिर्घकाळ राहिल्याने, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत आपणास उतरावे लागले नाही वेगवेगळ्या कारणांमुळे आर्थिक व्यवहारांमध्ये कामचुकारपणा, ऐढीपणा, भ्रष्टाचार, बेशिस्त यांचा सुळसुळाट होत गेला आणि अनेकानेक संघटित स्वार्थी हितसंबंधांनी अर्थव्यवस्था उत्तरोत्तर दुबळी बनत गेली. नोकरशाहीचे स्वार्थी हितसंबंध व तिचा भ्रष्ट व्यवहार यांना आवल घालणे, तिला शिस्त लावणे अशक्यप्राय झाल्याचा अनुभव आपण वारंवार घेत असतो. अर्थव्यवस्थेची कार्यक्षमता, उत्पादकात, स्पर्धेत टिकण्या इतपत चोखपणा, गुणवत्ता, शिस्त याच्यात वाए करण्यासाठी जागतीकरणाचा बाह्य दबाव हा आवश्यकच होता व इष्टही आहे ही भूमीका घेता येण्यासारखी आहे.

जागतीकीकरण ही आपणा सर्वांच्या कल्पनेतला लोकशाही निष्ठ व समाजवादी नवसमाज निर्माणकरणे अशक्यच करून टाकणारी घडामोड आहे. आणि म्हणून ती उलटविलीच पाहिजे असे आपले मत आहे. नवसमाज निर्मिती करण्याचा लोकांचा दृढ संकल्प असला तयासाठी आवश्यक व योगय तो त्याग करण्याची. परिश्रम करण्याची बुद्धी वेचण्याची लोकांची तयारी असेल तर जागतीकीकरणाच्या झंझावातावर मात करून नवसमाजनिर्मितीच्यादिशेने वाटचाल नेहमीच शक्य कोटीतील राहु शकते.

## विकसित व विकसनशील राष्ट्रात जागतीकीकरणाचा प्रभाव

२०व्या शतकाच्याअखेरीस आंतरराष्ट्रीय शक्तिच्या समतोलात रशियातील पडझडीमुळे बदल होवून हा समतो साम्राज्य शाहीच्या बाजुने केलेला आहे. आजच्याकाळातील मध्यवर्ती सामाजिक अंतविरोध हा साम्राज्यवाद विरूद्ध समाज सत्तावाद याच्यातील अंतविरोध बनला आहे. त्यामुळे आजच्या नवसाम्राज्यवादी जागतीक आक्रमणामुळे साम्राज्यवादी देश आणि तिसऱ्या जगातील देश याच्यामधील अंतर्विरोध झपाट्याने तीव्र होत असून तो आता जागतीकीकरणाच्या रूपाने पुढे येत आहे. जुना पद्धतीच्या वसाहतवादाच्या अंतानंतर साम्राज्यशाही नववसाहतवादी रणनिती पुढे रेटीत आहे. विज्ञान-तंद्वज्ञानातील प्रचंड प्रगती व त्यांच्या जोडीला माहिती तंत्रज्ञानाचा झालेला विस्तार यामुळे वित्तीय भांडवलाचा संचय वाढला. यामुळे साम्राज्यवादी राष्ट्रांना आणि त्याच्या प्रभावाखालील बहुराष्ट्रीय कंपन्याना नव्या बाजारपेठेची रज भासु लागली. त्यासाठी व्यापार करामदारांच्या माध्यमातून या शक्ति तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या आर्थिक, राजकिय, सांस्कृतिक नाड्या आपल्या हातात ठेवू पाहात आहे. जागतिकीकरणाच्या गोंडस नावाखाली जागतीक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना व बहुराष्ट्रीय कंपन्या या अस्त्रांच्या द्वारे आर्थिक वसाहतवाद लादण्याचे पद्धतशीर प्रयत्न करीत आहेत. भारतासारखे तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे राज्यकर्ते या नवसाम्राज्यावाद्यांपुढे पायघड्या पसरून त्यांच्या स्वागताला सिद्ध झाले आहे. जे या जागतीकीकरणाला विरोध करतील त्यांचे आर्थिक निर्बंध व लष्करी सामर्थ्याचा धोका दाखवून मुस्कटदाबी करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

तिसऱ्या जगातील राष्ट्रांवर कठोर अटी लादुन केवळ नफ्यासाठी अमेरीकन साम्राज्यवाद्यांच्या पुढाकाराने जं जागंतीकीकरणाचे धोरण सुरू झाले त्याला आता १०-२० वर्षे झाली आहे. व त्यांचे दृश्य परिणाम आता दिसून येवू लागले आहे. या व्यवस्थेचे कितीही गोडवे गाईले जात असले तरी त्या व्यवस्थेचा गाभा '

शोषण आणि विषमता' हाच आसल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका पाहाणी पथकाच्या अहवाला वरून स्पष्ट होतो. जागतीकीकरणाच्या प्रक्रियेत सर्व अर्थव्यवस्था सर्वदेश एकमेकासारखे होत आहेत असा सिद्धांत मांडला जात असला तरी प्रत्यक्षात जागतीकीकरणाची धोरणे प्रचलित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतीक बँक व जागतीक व्यापार संघटना ह्या संघटनांचे कार्यक्रम विकसित देशांनाच फायदा पोहचविणारे आहे. क्यूबा येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्यानावाखाली एकाधिकार पद्धतीने उत्पादन शक्तिचे, विक्रीमूल्याचे व नफ्याचे केन्द्रीकरण सुरू आहे. जगाती एकुण सुमारे ९०% उत्पादनाचा व नफ्याचा हिस्सा सात औद्योगिक श्रीमंत देशांमध्ये केन्द्रित आहे. एकट्या अमेरिकेच्याय मोठ्या कंपन्यामध्ये जगाच्या आर्थिक व्यवहारातील सुमारे ५० टक्के नफा केन्द्रित आहे.कंपन्यांनी इतर कंपन्याना विकत घेणे त्यात संमलित होणे ही लाट अमेरिकेपासून जगात सर्वत्र फेलावली आहे. जागतिकीकरणाच्या आक्रमक अंमलबजावणीच्या या दशकात मेक्सिकोची अर्थव्यवस्था कोसळली. दक्षिणपूर्व आशिया आणिएशियन वाघ समजले जाणाऱ्या जपानमध्ये अभूतपूर्व संकट निर्माण झाले. खुल्टत अर्थव्यवस्थेची बळी अर्जेटिनाही ठरला आहे. पेन्शनरला त्यांच्या हक्कांची पेन्शन देण्यात तेथील शासनाला अपयश आले असल्याचे वृत्त झळकले होते. बड्या भांडवली कंपन्या राजकारण्यांना भ्रष्ट करतात हे एनरॉनच्या निमित्याने खुद्य महाराष्ट्राने अनुभवले आहे. अर्जेटिनानेही हा अनुभव घेतला आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक या संस्थाच्या शिफारशीवरून १९४८ साली गॅट करार अस्तित्वात आला. १९९१ साली गॅटचे सरसंचालक आर्थर उंकेल यांनी एक मसुदा तयार केला त्यालाही अमेरिकेने बळ वापरून सर्व राष्ट्रांनी मान्यता मिळविली. १ जानेवारी १९९५ रोजी जागतीक व्यापार संघटना अस्तित्वात आली. मुक्त व्यापाराला पुर्ण मुभा द्यावी वस्तू, सेवा भांडवल यांच्या आयात निर्यातीवरकोणतेही बंधन सदस्य राष्ट्रांनी घालु नयेत असा करार आहे. विकसनशील व अविकसीत राष्ट्रांच्या दृष्टीने हा करार म्हणजे गुलामगिरीची सनदच आहे.

**जागतिकीकरणाला विरोध का ?**

मागील दहावर्षात भारतातच नव्हेतर जगातील सर्वच विकासनशील व विकसीत राष्ट्रांना या धोरणाचे दुष्परिणाम जाणवायला लागले आहेत. जागतीकीकरण विकासाचे नसुन शोषणाचे आहे याचा दाहक अनुभव जगभरच्याश्रमिक जनतेला झाला आहे. म्हणून या भांडवली नवसाम्राज्यवादी जागतीकीकरणाच्या विरोधात जगाच्याकानाकोपऱ्यातून विरोधाचे सूर उमदायला लागले आहेत. त्याचबरोबर जागतीक बँक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतीक व्यापार संघटना यांच्या दबावाला बळी पडुन ज्या देशातील सरकारे देशघातकी धोरणे पुढे रेटीत आहेत त्यांच्या विरोधात ही प्रचंड असंतोष धूमसत आहे. यातून शोषक वर्गसमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे. हा विरोध दडपून टाकण्यासाठी व आंदोलनाची धार बोथट करण्यासाठी जातीयवाद, धर्मवाद, दहशतवादात फुट पाडण्यासाठी वापर करीत आहे. परंतु जातीधर्माच्या राजकारणपेक्षा सामाजिक व आर्थिक

Scanned by CamScanner

विकासाचे व न्यायाचे राजकारण आज महत्वाचे असून त्यादिशेने लोक आंदोलने उभी करती आहे.

**जागतिकीकरणाची अपरिहार्यता**

जागतीकीकरणातून संपूर्ण जगाची आर्थिक उन्नती करणे हे नव्या युगाचे उद्दिष्ट आहे. १९९१ मध्ये भारत सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण व जागतीकीकरण करण्याकरीता आर्थिक सुधारणांची एक श्रृंखलाच सुरू केली. या आर्थिक सुधारणांचा कल हा बाजार अर्थव्यवस्था व देशाच्या जागतीकीकरणाकडे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतीक अर्थव्यवस्थेशी एकात्मीकरण व्हावे या उद्देशाने आर्थिक सुधारणांची ही नीती अवलंविण्यात आली. भारताला विकासाच्या दृष्टिने आर्थिक व सामाजीक क्षेत्रात बरीच मजल गाठावयाची आहे. अन्न, वस्त्र, निवारा, उद्योग, शिक्षण, आरोग्य व आधारभूत संरचना अशा विविध क्षेत्रात गुंतवणूकीची गरज आहे.

**कल्याणाची व्याख्या**

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात चांगले काय, वाईट काय, कल्याणवादीचे धोरण कोणते इत्यादिबाबत अर्थशास्त्रात निर्णय घेणे कठिण आहे आणि म्हणूनच समाजाच्या आर्थिक कल्याणाबाबत प्रो. पिगु यांनी कल्याणाची व्याख्या करतांना असे म्हटले की 'उपभोक्त्याने दिलेल्या किंमतीद्वारेच उपयोगितेचे मापन होते' म्हणून जे आर्थिक व्यवहार पैशाद्वारे मोजल्या जाते त्याचाच आर्थिक कल्याणात विचार करता येतो.

वस्तूपासुन मिळणारी उपयोगिता ही संख्यावाचक आकड्यामध्ये मोजता येत असल्यामुळे उपभोगात येणाऱ्या सर्व वस्तूपासून मिळालेल्या उपयोगितांची बेरीज करता येते. त्यामुळे सर्व व्यक्तिंना मिळालेल्या एकुणउपयोगितांची बेरीज करून संपूर्ण समाजाचे आर्थिक कल्याण आपल्याला कळु शकले असे पिगुंचे म्हणणे आहे. अशाप्रकारे वैयक्ति उपयोगितेची बेरीज किंवा संकलन म्हणजे समाजाचे आर्थिक कल्याण होय.

**पॅरेटो** - ह्यांचे वैशिष्ट म्हणजे त्यांनी कोणत्याही आदर्शाशिवाय सामाजिक कल्याण महत्तम कसे करता येईल हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. **बर्गसन** - लोकशाहीमध्ये बहुसंख्य लोकांनाजे चांगले वाटते ते कल्याण वाढविणारे आहे असे समजावे असे त्यांचे मत आहे. कल्याण महत्तम करण्यासाठी विशिष्ट काळात जे तत्व मान्यता पावते त्याला सामाजीक मूल्य मानले पाहिजे अशी मूल्ये आर्थिक स्थितीत आपल्याला मिळत नाही म्हणून तरी अर्थशास्त्राच्या बाहेरील मूल्ये सिद्धांतात आणून त्यांच्या आधारे सामाजीक कल्याण महत्तम करणारी समाजरचना सूचवावी लागते.

अशाप्रकारे बर्गसन, सॅम्युलसन, लिटन व इतर काही अर्थशास्त्रज्ञांचे स्पष्ट मत आहे की 'मूल्यगत निर्णयाचा आधार घेतल्याशिवा कल्याणकारी अर्थशास्त्रात कोणतेही तत्व मांडता येत नाही.'

जागतीकीकरणाला जागतीक पातळीवर पर्याय दोन अंगानी द्यावा लागणार आहे. चिरस्थायी विकासाची पर्यायी कल्पना व नीति अंगीकारून आणि आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात मूलतः वेगळ्या जीवन दृष्टीच्या आधारे पर्यायी समाजव्यवस्थेची कल्पना कयन, मार्क्सच्यामानव विषयक तात्वीक मांडणी मधून आणि भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या ऐतीहासीक समाजशास्त्रीय विश्लेषणामधून काही मूलभूत गोष्टी आपल्या हाताशी लागतात. जागतीकीकरणाचा दुसरा निघृण आघात महणजे पर्यावरण कारण सुखोपभोग वाढविण्यासाठी जगभऱ्याची संसाधने ताब्यात घेण्यासाठी मोठी चढाओढ आहे. या चढाओढीत



Scanned by CamScanner

तळागाळाच्याजनसमूहांची जीवनधार असलेल्यानैसर्गिक संसाधनांवरील पकड सुटते आहे. उदा. पिण्याचे पाणी सामान्य लोकांच्याजीवनाचे आधार काढुन घेणारी आणि मोठ्या प्रदेशांवरील निर्सगसृष्टीला उजाड करून टाकणारी प्रक्रिया विकासाच्या नावे भारतात वेगवान होत असल्याचे दिसू येत आहे. माणसांच्या आटोक्या बाहेर असलेली भीषण नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती मोठ्या साठी, महापूर, चक्रीवादळे, युद्ध, समाजाची नैतिक व्यवस्था धोक्यात आणतात व्यक्तिगत व सामाजिक दोन्ही पाहळयांवर मानव जीवनाचा पाया सत्-असत् विवेक, चांगुलपणा, सौहार्द व सहकार्य हाच असतो. दैनंदिन व्यवहारांमधून यामूल्यांचे उच्चाटन झाले की समाजाची धारणा करणारी नैतिक व्यवस्था ढासाळते.

शंभर कोटीच्या भारतामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेची ही उधळलेली दौड माणसांचे रोजगार, त्यांचे पोटपाणी, त्यांची साध्ये सुख समाधान यांच्या बाबतीत धुमाकुळ घालीत आहे. त्यामुळे सामाजीक व नैतिक व्यवस्था ढासळली आहे. या सर्व कारणांमुळे भारतात एक अत्यंत स्फोटक वाढणारी बेकारी आणि स्वीकारलेला औद्योगीकरणाचा प्रकार हे सर्व घटक एकत्र येवून पर्यायवरणावर प्रतिकुल परिणाम घडवित आहे आणि भारताच्याच नव्हे तर जगाच्या भविष्यापुढे संकटाची स्थिती निर्माण करीत आहे.

नवीन अर्थव्यवस्था आणण्यासाठी संशोधनाला जशी नवी दिशा देण्याची गरज आहे तशीच शिक्षणालाही शिक्षण व्यवस्था आपण पूर्णपणे लगेच बदलवू शकत नाही. आजची शिक्षण व्यवस्था अशी आहे की गावातील लोक आपला देश सोडून युरोप अमेरीका गाठु पाहता. हा 'ब्रेन ड्रेन' आपल्या उद्दिष्टांच्या दृष्टिने निश्चितच स्पृहणीय नाही. कारण जेव्हा आपण नव्या पर्यायी अर्थव्यवस्थेचा विचार करतो तेव्हा त्याबरोबरच आपल्याला आपल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने शिक्षण आणि संशोधन यांच्या पुनर्रचनेचाही विचार करावा लागेल.

## सारांश

जागतीकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण हे आजच्या लोककल्याण साधण्याचे समर्पक उत्तर नाही. या प्रश्नाकडे वेगळ्याच दृष्टीकोनातून पाहाण्याची आज गरज आहे. नव्या अर्थनीतीच्या निर्मात्यांचे या प्रश्नांचे आकलन फारच जुजबी व मर्यादित आहे हे स्पष्ट दिसून येते. पूर्णत: वेगळी अशी पर्यायी अर्थव्यवस्था हेच खरे उत्तर आहे. अशी अर्थव्यवस्था उद्यालायेईल अशी आशा बाळगायला हवी कारण ती जर उदयाला येवू शकली नाही तर संपूर्ण सभ्यताच कोसळून पडेल.

## संदर्भ


१. जागतीकीकरणाचे प्रश्न - डॉ. पी. जी. हजेला, माजी कुलगुरू, अलहाबाद विद्यापीठ

२. खुल्या अर्थव्यवस्थेत स्वदेशीचे स्थान; पद्माकर देशपांडे

३. जागतीकीकरण व सीलांतर - काल व उद्या; दीपक अय्यर

४. सुक्ष्म अर्थशास्त्र ; ग. ना. झामरे

५. जागतीकीकरण आणि भारतीय समाजासमोरील यक्ष प्रश्न - वसंत पळशीकर; दहावे विचारवेध संमेलन २२ डिसे. २००२


✦✦✦

Scanned by CamScanner

# "जागतीकीकरणात लोककल्याणाचे स्थान"

डॉ. डी. एन. पाटणकर
धरमपेठ कॉलेज, नागपूर

**जागतिकीकरणाचा अर्थ :**

जागतिकीकरण म्हणजेच Globalization ची व्याख्या "Integrating the economy of a country with world economy" अशी केली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण होणे म्हणजे भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्था यांचे एकत्रीकरण होणे.

**जागतिकीकरण कसे घडून येते :**

जगातील विविध देशांदरम्यान निर्बंधयुक्त, व्यापार आणि गुंतवणूक हे जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेतील महत्वाचे अंग आहे. सध्या विविध देशांच्या परस्परांमधील व्यापार व गुंतवणूकीच्या व्यवहारावर अनेक प्रकारचे निर्बंध आढळतात. उदा. आयात व निर्यातीवरील कर, आयात व निर्यातीचे वाटे (Quoto) ठरवून देणे, विदेशी विनिमय नियंत्रण, विदेशी गुंतवणूकीवरील निर्बंध इत्यादी. ह्या निर्बंधामुळे दोन देशांमधील होणाऱ्या व्यवहारात अडथळे निर्माण होतात. हे अडथळे दूर केल्यास मुक्त व्यापार अस्तित्वात येतो. निर्बंधमुक्त व्यापार व गुंतवणूक, अस्तित्वात आल्यास विविध देशांमधील वस्तुंच्या किमती, व्याजाचे दर इत्यादीत फारसा फरक राहत नाही. येवढेच नव्हे तर एका देशातील आर्थिक बदलांचा परिणाम इतर देशांवर घडून येतो. उदा. भारतातील व्याज दरात वाढ होऊन ते अमेरीकेतील व्याज दराच्या तुलनेत जास्त झाल्यास अमेरीकेतील पैसा ठेवींच्या रूपात भारतात येऊ लागेल. परिणामी भारतातील मुद्रेचा पुरवठा वाढून व्याजदर कमी होतील व अमेरीकेत ते वाढतील आणि अशाप्रकारे भारतात आणि अमेरीकेतील व्याज दर समान होतील. अशा प्रकारे वेगवेगळ्या देशांच्या अर्थव्यवस्था परस्परांशी जोडल्या जाऊन अर्थव्यवस्थांचे जागतिकीकरण होईल.

**जागतिकीकरणाचे फायदे आणि तोटे**

मुक्त व्यापार आणि गुंतवणूक ह्यांच्या माध्यमातून जागतिकीकरण घडून येत असल्याने मुक्त व्यापारामुळे होणारे फायदे आणि तोटे हेच जागतिकीकरणापासून होणारे फायदे व तोटे असतात. यापैकी काही प्रमुख फायदे आणि तोटे पुढील प्रमाणे

**ग्राहकांना होणारे फायदे**

**वस्तुंच्या किंमतीत घट**

जागतिकीकरणामुळे ग्राहकाला जगात कोठूनही वस्तु खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असल्याने त्याला अनेक वस्तु स्वस्त दराने उपलब्ध होतात.

Scanned by CamScanner

**उपलब्ध वस्तुंच्या विविधतेत वाढ**

मुक्त व्यापारामुळे नवीन प्रकारच्या वस्तु ग्राहकांना उपलबध होतात. उदा. नागपूरात न्युझीलंड व इतर काही देशातच उत्पादन होणारी फळे उपलब्ध होउ लागली आहेत.

**वस्तुंच्या दर्जात सुधारणा**

बाजारात उत्पादकांमधील स्पर्धा अधिक तीव्र होते. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादक वस्तुंच्या दर्जात सुधारणा करण्याचा प्रयत्न करतात आणि ग्राहकांना अधिक चांगल्या दर्जाच्या वस्तू उपलब्ध होतात.

**एकाधिकारी प्रवृत्तीला आळा**

देशी उत्पादक परस्परांच्या संगनमताने बाजारात एकाधिकारयुक्त परिस्थिती निर्माण करुन ग्राहकांचे शोषण करण्याचा धोका असतो. जागतिकीकरणामुळे ही शक्यता कमी होते.

**उत्पादकांना होणारे फायदे**

**बाजारपेठेचा विस्तार**

जागतिकीकरणामुळे उत्पादकांना संपूर्ण जगाची बाजारपेठ उपलब्ध होते. बाजारपेठेच्या विस्तारामुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादनकरून, मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे फायदे मिळविता येतात. यामुळे सरासरी उत्पादन व्यय कमी होऊन अंतिमरित्या तो फायदा ग्राहकांना मिळतो.

**तंत्रज्ञानाची उपलब्धता**

जागतिकीकरणामुळे तंत्रज्ञानाचे हस्तांतरण अधिक सुलभ होते. संयुक्त प्रकल्पाच्या रूपात विदेशी उत्पादकांबरोबर केलेल्या भागीदारीमुळे देशी उत्पादकांना उच्च दर्जाचे तंत्रज्ञान उपलब्ध होऊ शकते.

**संपूर्ण देशाला होणारा लाभ**

**साधन सामुग्रीचा पर्याप्त वापर**

मुक्त व्यापार सुरू झाल्याने प्रत्येक देश तुलनात्मक उत्पादनव्यायतील अनुकुलतेच्या आधारे उत्पादनाचे विशषीकरण करतो. त्यामुळे देशातील साधन सामुग्रीचा पर्याप्त वापर घडून येतो.

**आंतरराष्ट्रीय संबंधात सुधारणा**

जागतिकीकरणाचा हा अतिशय महत्त्वाचा फायदा आहे. जागतिकीकरणामुळे विविध राष्ट्रामधल्या लोकांची परस्परामधील देवाणघेवाण वाढते. यामुळे सामाजिक व राजकीय संबंध सुधारायला मदत होते.

**जागतिकीकरणावर घेतले जाणारे आक्षेप**

**बहुराष्ट्रीय व्यापारी संस्था (Multi National Corporation) चे वर्चस्व :**

अविकसित देशांचा जागतिकीकरणाला सर्वात जास्त विरोध बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भितीपोटी होत असतो. विकसनशील देशातील उत्पादकांना असे वाटते की बहुराष्ट्रीय कंपन्यांना असलेले प्रचंड साधन सामुग्रीचे



Scanned by CamScanner

पाठबळ व आधी स्थापन झाल्यामुळे मिळणारे फायदे यामुळे ते या कंपन्यांच्या स्पर्धेत टिकाव धरू शकणार नाहीत.

**राजकीय हस्तक्षेप**

बहुराष्ट्रीय संस्था राजकीय हस्तक्षेप करतील व त्यामुळे देशाचे स्वातंत्र्य धोक्यात येईल असे अविकसित देशातील जनतेला व विशेषकरून राजकारणी लोकांना भिती वाटते. व्यापार करावयास आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने शेवटी देशावर कब्जा केला ही आठवण भारतीयांच्या मनातून अजूनही पूसली गेली नाही.

**इतर देशातील आर्थिक बदलांचे देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम**

जागतिकीकरणामुळे वेगवेगळ्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था एकमेकाशी गुंफल्या जातात. त्यामुळे मोठ्या अर्थव्यवस्थेतील बदलांचे परिणाम लहान देशांच्या अर्थव्यवस्थांवर होत असतो. उदा. अलीकडेच चीनने आपल्या आर्थिक विकासाचा वेग कमी करण्यासाठी केलेल्या उपायांमुळे भारतासकट अनेक देशांमध्ये पोलाद, सीमेंट ह्यासारख्या काही उद्योगांत मंदी येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे अमेरीकेतील चढ उतारांचा भारतीय शेयर बाजारावर परिणाम दिसून येतो.

**आक्षेपांचे खंडन**

**राजकीय हस्तक्षेपाची भिती अवास्तविक**

साम्राज्यवाद, वसाहतवाद आणि वंशवाद या विरूद्ध द्वितीय महायुद्धानंतर जागतिक जनमत तयार झाले. त्यांचा एक प्रत्यक्ष परिणाम म्हणजे आशिया व आफ्रीका ह्या खंडातील अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले. बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या मर्यादांची जाणीव झाली आणि त्यांचा इतर देशातील हस्तक्षेपही कमी झाला.आजतर अनेक वेळा असे घडते की या बहुराष्ट्रीय कंपन्या आपले हितरक्षण करण्यासाठी, त्यांनी गुंतवणूक केलेल्या देशाप्रती अनुकूल धोरण घ्यायला, आपल्याच देशाच्या सरकारवर दबाव आणतात. उदाहरणार्थ चीनमधे होत असलेल्या मानवाधिकारांचे उल्लंघन संबंधी अमेरीकन सरकारने नरमाईचे धोरण स्वीकारावे ह्यासाठी अमेरीकन बहुराष्ट्रीय कंपन्या क्रियाशील असतात हे सर्व विचारात घेता ईस्ट इंडिया कंपनी सारख्या अनुभवाची पुनरावृत्ती होणे संभव नाही.

**विदेशी उत्पादकांच्या स्पर्धेची भिती अनाठायी**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विज्ञान, तंत्रज्ञान व इतर क्षेत्रात केलेल्या प्रगतीमुळे भारतीय उत्पादक आता पूर्वीपेक्षा बरेच सामर्थ्यवान झाले आहेत. इन्फोसिस, विप्रो या सारख्या भारतीय कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या तोडीचा लौकिक आणि प्रतिष्ठा मिळविल्याचे दिसून येते. येवढेच नव्हे तर भारतासारख्या विकसनशील देशांना होणाऱ्या Out Sourcing मुळे अमेरीकेत बेकारी निर्माण होते अशी ओरड सुरू झाली आहे. त्यामुळे भारतीय उत्पादक विदेशी कंपन्यांच्या स्पर्धेत टिकाव धरू शकणार नाही ही भिती अनाठायी वाटते.

Scanned by CamScanner

### जागतिकीकरणाची अपरिहार्यता

जागतिकीकरणाला विरोध करणाऱ्यांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की भारताला जागतिकीकरण टाळता येणार नाही. भारत जगातील इतर बहुसंख्य देशांप्रमाणे जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य झाला आहे. ह्या संघटनेच्या नियमानुसार प्रत्येक देशाला ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आंतरराष्ट्रीय व्यापार व गुंतवणूक ह्यावरील निर्बंध हटविणे भाग आहे. जागतिकीकरणाला विरोध म्हणून भारताने ह्या संघटनेतून बाहेर पडायचे ठरविले तर भारत आणखीनच जास्त अडचणीत येउ शकतो. ह्या संघटनेचा सदस्य होण्यात एक मोठा फायदा म्हणजे प्रत्येक सदस्य देशाला इतर सर्व सदस्य देशांना Most Favoured Nation (MFN)चा दर्जा देणे बंधनकारक असते. त्यामुळे इंग्लंड अमेरीकेसारख्या प्रगत देशांनी इतर कोणत्याही देशाला दिलेल्या सवलती आपोआपच भारताला प्राप्त होतात. सदस्य नसल्यास ह्या सवलती द्विपक्षीय वाटाघाटी करून मिळवाव्या लागतील. अशा द्विपक्षीय वाटाघाटी मधे भारतावर दबाव येण्याची शक्यता राहील त्याच प्रमाणे जगातील बहुतेक देशांनी ह्या संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले असल्याने भारत संघटनेतून बाहेर पडल्यास जगात एकटा पडण्याची शक्यता आहे. यामुळे भारताला WTO चे सदस्य राहणे, त्यांचे नियम पाळणे व जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत सहभागी होणे अपरिहार्य आहे.

जागतिकीकरणाची ही अपरिहार्यता लक्षात घेता जागतिकीकरण थांबविणे किंवा त्याला विरोध करणे ह्यापेक्षा जागतिकीकरणामुळे भारतासमोर जी आव्हाने उभी झाली आहेत त्यावर आपण मात करू व जागतिकीकरणाचे जास्तीत जास्त फायदे पदरात पाडून घेण्यासाठी प्रयत्न करू अशी इच्छा व्यक्त करून मी आपले विवेचन संपवितो.

✦✦✦

Scanned by CamScanner

# "जागतीकीकरण- उच्च शिक्षण आणि लोककल्याण"

प्रा डॉ.प्राची दिलीप देशपांडे
महिलजा महाविद्यालय
१५२, नंदनवन, नागपूर.

देशातील व सामाजिक महत्तम लोकांचे कल्याण साधण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यापैकी लोककल्याण साधण्याचा एक मार्ग म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच आपल्या वैदिक अध्ययनात 'क्रम' याला प्रथम आणि 'धन' याला अंतिम स्थान होते. वैदिक शिक्षण पद्धतीत शिक्षकाला म्हणजेच गुरूला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. कारण शिक्षक, हा विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता सर्वप्रकारे प्रयत्नशील रहात असे. शिक्षणातून शिष्याला जीवन जगण्याचे ज्ञान प्राप्त होत असे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी देखील अशाच शिक्षण प्रणालीचा विचार केला होता, की ज्या शिक्षणातून तत्त्वज्ञानी राज्यकर्ते निर्माण होतील, प्रत्येकाला कर्तव्याची जाणीव होऊन त्यात समाजहित व लोककल्याण साधले जाईल, आणि या सर्वांमधून एक न्यायाधिष्ठीत आदर्श राज्य उभारले जाईल आणि यासाठी शिक्षण हे राज्यामार्फत सर्व नागरिकांना दिले जावे. म्हणजे महत्तम लोककल्याणाचे उद्दिष्ट साध्य होईल.

भारतियांच्या दृष्टीने तर शिक्षण हे एक मूल्य आहे. 'आत्मदिपोभव' ही शिक्षणासंबंधीची दृष्टी आहे आणि हीच दृष्टी स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद, डॉ. राधाकृष्णन, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्या शिक्षण विषयक विचारातून प्रकट झाली आहे. शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानलालसा, जिवनविषयक मूल्ये निर्माण करणे हा आहे. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तर म्हणतात, "शिक्षणातून आपण एक संस्कृती घडवीत असतो, कारखाना नव्हे". त्यामुळेच भारतीय विचारधारेत 'शिक्षणाचा व्यापार' ही कल्पनाच नाही. शिक्षणाला आपण धंदा म्हणत नाही.

परंतु पाश्चिमात्य देश मात्र बँक, विमा, ट्रान्सपोर्ट, वाहतूक, दळणवळण याप्रमाणेच शिक्षणाला देखील एक व्यवसाय किंवा व्यापारधंदा समजतात. म्हणूनच थढजचा कराराचा मसुदा बनवितांना त्यांनी 'शिक्षण या व्यापार धंद्याची आयात निर्यात सर्व देशातून अनिर्बंध पणे झाली पाहिजे' यावर भर दिला व त्यासंबंधीच्या बंधनात्मक तरतूदी तयार केल्यात. या तरतूदीनुसारच असे ठरविण्यात आले की, जागतिक व्यापार संघटनेच्या करार पत्रकावर सही करणाऱ्या सर्व सदस्य देशांनी २००३ च्याअखेरीपर्यंत शिक्षणाचे उदारीकरण कसे करणार आहेत याच्या अंतीम योजना थढज ला सादर करावयाच्या आहेत. त्यामध्ये इतर देशांच्या बाजारपेठां प्रमाणे भारताची बाजारपेठही शिक्षणाच्या व्यापारधंद्यासाठी कशी निर्बंधमुक्त होईल हे सादर करावयाचे आहे. २००५ सालापासून परकीय विद्यापीठे व शिक्षण संस्था यांच्या पदवी व पदविका अभ्यासक्रमांना भारत सरकारला मंजूरी द्यावी लागणार आहे. त्याबरोबरच आपल्या देशातील अभ्यासक्रमांना परकीय देशातील तशाच अभ्यासक्रमांना समभाग मान्यता व मंजूरी द्यावी लागणार आहे. शिक्षणाच्या या जागतिकीकरणामुळे काही शिक्षणतज्ञांच्या मते, **यापुढे १०वी, १२वी नंतर विद्यार्थ्यांपुढे प्रवेश स्पर्धेचे वातावरण न रहात रोजगारीला प्राधान्य देणारे परकीय विद्यापिठांचे शिक्षण घेण्यास विद्यार्थी अधिक**

Scanned by CamScanner

प्राधान्य देतील. परिणामत: भारतीय विद्यापीठांच्या महाविद्यालयीन यंत्रणेला एक फार मोठा धोका निर्माण होणार आहे.

जागतिक पातळीवर शिक्षण सेवांची निर्यात करणाऱ्या देशात अमेरिकेचा पहिला क्रमांक आहे. यातील अधिकांश निर्यात ही आशियातील राष्ट्रांमध्ये व पॅसीफिक महासागराच्या जवळपास असलेल्या राष्ट्रांमध्ये होते. आणि या व्यापारधंद्यात अमेरिकेला भरपूर फायदा झालेला आहे व त्यातून आज अमेरिकेत चाळीस लाख नोकऱ्या निर्माण झालेल्या आहेत. एकूण सेवा क्षेत्रातील अमेरिकेच्या निर्यातीत शिक्षणाचे योगदान पाचव्या क्रमांकावर आहे आणि म्हणूनच इतर सेवा क्षेत्राप्रमाणे शिक्षणाचेही जागतिकीकरण व्हावे अशी अमेरिकेची आग्रही भूमिका आहे.

शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे हे गोंडस रूप साजरे करण्यासाठी फार मोठा पैसा गुंतवावा लागेल व त्यासाठी कर्ज उभारावे लागेल. आज प्रत्येक भारतीयांवर जवळपास ४००० रूपयांचे कर्ज आहे, या कर्जाची परत फेड करण्यासाठी म्हणून काही अटी लादण्यात आल्यात. त्यामध्ये कल्याणकारी आणि समाजोपयोगी कार्यावरील खर्च कमी करणे व यासाठी सरकारी व अनुदानीत संस्थांचे खाजगीकरण हा मार्गही सुचविला गेला. त्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रातील सर्वच घटकांवर म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापक, शाळेच्या विकास योजना या सर्वांवरच प्रतिकूल दिशेने होतांना दिसतो.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच शिक्षणावरील खर्चा बाबत असा संकल्प करण्यात आला होता की केन्द्र शासनाने आपल्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठी १० टक्क्यांची तरतूद करावी व राज्याच्या अंदाजपत्रकात ती ३० टक्के असावी. परंतु आज मात्र प्रत्यक्षात केन्द्राची तरतूद जेमतेम ३ टक्के तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात २० टक्क्यांच्या आसपास ती रेंगाळते आहे. शिक्षणावरचा खर्च ही दिर्घ मुदतीची भांडवली गुंतवणूक असल्यामुळे याला नेहमी शेवटचा क्रम दिला जातो.

आजच्या जागतिकीकरणाच्या प्रवाहात गुरूंची जागा मोठ्यामोठ्या संस्थांनीकांनी तसेच राज्यकर्त्यांनी घेतलेली आहे. त्यामुळे धनसंपदा प्रथम क्रमाकांवर आणि मानवी मूल्ये मात्र दूर फेकल्या गेली आहेत. शिक्षणाचे खाजगीकरण होण्यासंबंधी काही खाजगी कंपन्यांनी जे शिक्षण विषयक धोरण आखले आहे त्यामध्ये बिर्ला आणि अंबानी यांचाही समावेश आहे. ह्या उद्योग कंपन्यांचा इतर व्यवसायाप्रमाणेच शिक्षणाला देखील आर्थिक समृद्धीचे साधन म्हणून बघण्याचा दृष्टीकोन आहे. त्यामुळे ज्यांच्याकडे जबरदस्त क्षमता आणि पैसा आहे त्यांनाच ह्या उच्च शिक्षणाचा लाभ मिळणार आहे. परिणामत: विचार, मनन, चिंतन, ग्रहण आणि शेवटी परीक्षेच्या निमित्याने अभिव्यक्ती ही शिक्षणाची मूलभूत प्रक्रिया केव्हाच लोप पावली असून शिकवणी वर्ग जे की भरमसाठी फी वसूल करतात त्यांचा आणि रेडीमेड मटेरियल म्हणून गाईड्सचा स्विकार आम्ही केला आहे.

ह्या उद्योग कंपन्या शिक्षणाला सामाजिक मानसिक व सांस्कृतिक धरोहर मानत नसून नफाकेंन्द्री व्यवहारात मुले ही वस्तू (उाािविळीूं) मानली जाणार आहेत आणि यांचे प्रमाण अत्यल्प म्हणजे फक्त ६ टक्के मुले ही सधन व उच्चभ्रू वर्गातील असतील आणि हा सहा टक्के वर्गच भविष्यकाळातील संपत्तीचा निर्माता असेल आणि उरलेलया ९४% लोकांना मात्र प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सरकारने द्यावे कारण पुढे हेच ९४

Scanned by CamScanner

टक्के लोक या बहुराष्ट्रीय कंपन्यांना जागतिक मजूर म्हणून उपयोगाचे ठरतील. या बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांना विकत घेऊन कुठल्याही देशातल्या आपल्या कारखान्यात जूंपू शकतील आणि त्याद्वारे उत्पादनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर करू शकतील आणि अशाप्रकारे शिक्षण व्यवस्थेचा आधार घेऊन जागतिक बाजारपेठेत या बहुराष्ट्रीय कंपन्या आपले वर्चस्व स्थापन करण्यात यशस्वी होतील.

भारत हा असा देश आहे की, ज्याची बौद्धिक संपदा अतिशय संपन्न आहे. म्हणून जागतिकीरणाच्या प्रक्रियेत उच्च शिक्षणातही विकसीत राष्ट्र विविध पद्धतीने वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहे. बाजार व्यवस्थेसोबत उच्च शिक्षणही खुले झाले आहे त्यामुळे विद्यापीठ निर्मितीचे पेव फुटले आहे. वस्तुंच्या खरेदी विक्रीतून आर्थिक गुंतवणूक जशी महत्त्वाची समजल्या जाते तशी शिक्षणाच्या माध्यमातून बौद्धिक क्षमतेशी संबंधित ज्ञान निर्मिती, संपदेचे रूप घेऊ लागली आहे.

एकंदरितच उच्च शिक्षणातील जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत धन संपदेला अधिक महत्त्व दिल्याने लोककल्याण कितपत साध्य होईल याबाबतीत फार मोठी साशंकता आहे. तरी अशाही परिस्थितीत सांस्कृतिक दृष्ट्या भारत हा एकसंघ रहावा असे वाटत असल्यास नकारात्मक दृष्टीकोन झटकून सकारात्मक दृष्टीकोन स्विकारावयास हवा व तो नेटाने राबविण्याची सिद्धता करावयास हवी.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शिक्षणाच्या आयातीबरोबरच त्याची निर्यात देखील तितकीच महत्त्वाची आहे. ह्या माध्यमातून आपण आपल्या परकीय चलन साठ्यात भर घालू शकतो. ज्याप्रमाणे अनेक परदेशातील विद्यापीठे आपल्या देशात येऊ पहात आहेत अशावेळस आपल्या देशातील विद्यापिठेही परदेशात स्थापन करणे गरजेचे होत आहे. या माध्यमातून आपल्या येथील बौद्धिक संपदा, प्रारूपे, साधने, विचार प्रवर्तक लेखन इत्यादींना आपण देशात आणि देशाबाहेर उपयोगीकरीता पाठवू शकतो. आणि असे प्रयत्न आपल्या देशात सुरू झालेले आहेत. भारतातील सी.बी.एस.सीच्या ६६००शाखा जगातील १७ देशात गेल्या कित्येक वर्षापासून कार्यरत आहेत आणि दिवसें दिवस त्यांची मागणी वाढत आहे. उच्च शिक्षणाच्या बाबतीतही आम्ही जागतिक प्रसाराचे कार्य केव्हाच सुरू केले आहे. इंदिरा गांधी नॅशनल ओपन यूनिव्हर्सिटीने केवळ भारतातच नाही तर अनेक देशांमध्ये आपले जाळे पसरविले आहे.

पण आता प्रश्न असा आहे की, जागतिकीकरणाच्या स्पर्धेत उतरल्याबरोबर सर्वत्र गुणवत्ता पूर्ण शिक्षणाची चर्चा महत्त्वाची ठरते. गुणवत्ता टिकवून ठेवतांनाच दुसरीकडे आकर्षकता व मूल्ये ही देखील तितकीच महत्त्वाची आहेत. अशावेळेस समाजाचे सहकार्य, समाजाप्रती बांधिलकी, देशतील व्यक्तींमध्ये असली पाहिजे. त्यासाठी देशाचे विद्यार्थी सक्षम असणे ही फार मोठी जमेची बाजू होईल आणि त्यातून आर्थिक समृद्धता, सामाजिक ऐक्य, मूल्यसंवर्धन अशा कितीतरी गोष्टी साध्य होऊन लोकल्याणात भर घालता येऊ शकते.

Scanned by CamScanner

# "जागतीकीकरण- उच्च शिक्षण आणि लोककल्याण"

प्रा. अशोक मंदे
सी.पी.ॲण्ड बेरार महाविद्यालय,
तुळशीबाग, महाल, नागपूर

सध्याच्या स्थितीत जगात सर्वत्र जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण याची चर्चा आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणातील समीकरणे बदलत गेली. शेकडो वर्षे साम्राज्यवाद्यांच्या विळख्यात खितपत पडलेले देश एकामागून एक स्वतंत्र होत गेली व देशात लोकशाही अस्तीत्वात येवू लागली. जागतिक राजकारणामुळे ब्रिटनचे महत्त्व कमी होत गेले आणि अमेरीका व रशिया यांच्या रूपाने दोन नवीन सत्ता केंद्रे तयार झाली. राजकारणाची दिशा ठरविणार या अर्थ कारणाने हळूहळू हा प्रवाह क्षीण झाला. रशियाची शकले पडली पुर्व युरोपिय साम्यवादीदेश कोलमडून पडले आणि संपूर्ण जगात अमेरीका ही एकमेव शक्ती म्हणून शिल्लक राहीली. अशा या राजकारणातील नवा प्रवाह म्हणजेच जागतिकीकरण होय. ह्याच प्रवाहाला अतिशय गती मिळत गेली आणि खुल्या अर्थव्यवस्थेच्या स्त्रोतातुन त्या प्रवाहाचा उगम झाला. आज स्थितीला जागतिकीकरणाची प्रक्रिया संपूर्ण जगभर चालू आहे. तसेच या प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने ती वेगाने कार्यरत आहे. यामुळे देशांचा राजकीय व सामाजिक सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात या देशांचे स्वातंत्र्य व स्वायत्तता टिकून राहील की नाही याचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. इंग्रजीतील Globalization शब्दाचे मराठीत रूपांतर होवून तो शब्द भुमंडलीकरण, जागतिकीकरण किंवा वैश्वीकरण झाला आहे. परंतु जागतिकीकरण हा शब्द स्वत:च संभ्रम निर्माण करणारा आहे. या शब्दाद्वारे असा भास होतो की संपूर्ण जगाला एक नियमात किंवा सुत्रात बसविणे. परंतु वर्तमान कालीन परिस्थितीचा आढावा घेतल्यास असे दिसते की, गरीब व श्रीमंत, विकसीत व अल्पविकसीत राष्ट्रे यांतील अंतर दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिकीकरणात केवळ उत्तर अमेरिका व युरोपातील काही मोजक्या देशांचा फायदा होत आहे व जगातील बाकी अल्पविकसीत देश जागतिकीकरण या तथाकथित स्पर्धेत होरपळून निघत आहे.

जगातील व्यापार संघटनेच्या १५ एप्रिल १९९४ च्या करारावर सही करून भारत सरकारने सुद्धा संपूर्ण देशाचे सार्वभौमत्व विदेशाकडे गहाण टाकलेले आहे. ३० एप्रिल २००० रोजी केंद्र सरकारतर्फे घोषित करण्यात आलेल्या आयात निर्यात धोरणामुळे सामान्य जनतेला, श्रमिक वर्गाला, शेतकरी तसेच भारतातील लघु उद्योग व कुटीर उद्योग यांचेवर काही काळानंतर भीषण दुष्परिणाम दिसुन येणार आहेत. नवीन धोरणामुळे भारतीय शेतकऱ्यांना शेती करणे अतिशय कठीण जाणार असुन श्रमिकांना बेकारीच्या खाईत लोटले जाणार आहे. नवीन आयात देशातील लघु, कुटीर, कृषी उद्योग नष्ट होवून सामाजिक असंतुलन निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे. अशा प्रकारचे कटकारस्थान जागतिक बहुराष्ट्रीय कंपन्या अमेरिकेच्या सहकार्याने करीत असल्याचे स्पष्ट होते. आज जगातील मोठमोठ्या संस्था, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, जागतिक बँक या देखील या विकसीत देशाच्या दबावाखाली येवून सुरूवातीला विविध प्रकारच्या अटी लादतात आणि त्यानंतरच

Scanned by CamScanner

कर्ज देणे किंवा आर्थिक मदत देणे स्वीकार्य करतात. देशात उत्पादीत होणाऱ्या कच्च्या मालाचा उपयोग करून पक्का माल तयार केला जातो. पण याचा उत्पादन व्यय फार जास्त असतो. बहुराष्ट्रीय कंपन्या या कमी उत्पादन व्ययात सुबक आणि उत्कृष्ट दर्जाचा माल ह्या अविकसीत किंवा विकसनशील देशातील लोकांना पुरवितात. यामुळे अशा देशांची अर्थव्यवस्था कोलमडून पडून धोक्यात येते. जागतिकीकरणामुळे सर्व वस्तुंचा आयात-निर्यात व्यापार मुक्त झाल्यामुळे ही एक प्रकारची गुलागिरी आपल्याला स्विकारावी लागेल ही शंका आपल्याला नाकारून चालत नाही. संयुक्त राष्ट्र संघाच्या औद्योगीक विकास संघटनेच्या मताप्रमाणे विकसनशील देशांनी उत्पादकतेच्या जागतिक पातळीपर्यंत पोहोचायला पाहिजे व जागतिकीकरणाच्या आर्थिक वातावरणात यशस्वीरीत्या स्पर्धेला तोंड द्यायला पाहिजे परंतु अर्थव्यवस्थेसमोर ज्या अनेक अडचणी असतात त्या अडचणी मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण सोडवू शकत नाही असे विचार नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थतज्ञ डॉ. अमर्त्य सेन यांनीपटवून दिले आहे. आज भारतातदेखील या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत ठिकठिकाणी प्रतिकुल अथवा परिस्थितीला तोंड देवून विकासाचा मार्ग काढावा लागत आहे.

भारतासारख्या देशात जवळपास अर्धी लोकसंख्या महिलांची आहे. परंतु जागतिकीकरणामुळे महिलांवर जिवघेणा हल्ला होत आहे. जागतिकीकरणातुन संस्कृतीचे विडंबन होत असुन महिलांचे वस्तुकरण होत आहे. अश्लिलता वाढत आहे. यातुनच महिलासंबंधी अपराधात वाढ होत आहे. साम्राज्यवादी देशातून येणारी जागतिकीकरणाची संस्कृती महिलांना अप्रतिष्ठित करीत आहे. गेल्या ५० वर्षात भारतातील समाज व्यवस्थेत मुलभूत परिवर्तन झालेले आहे. परंतु या परिवर्तनामुळे महिलांवरील बोझा अनेक दृष्टीने वाढलेला आहे. भारताची अर्थव्यवस्था तीव्र मंदीच्या लाटेने ग्रासली आहे. सामान्य जनतेची क्रयशक्ती खालावली आहे. हे या मंदीचे मुख्य कारण आहे. त्याचा जागतिकीकरण, उदारीकरणाशी सरळ संबंध आहे. भारतात दरवर्षाला रोजगार शोधू पाहणाऱ्या नवतरूणांची संख्या शेकडा १.३३ ने वाढत आहे. तर रोजगार निर्मिती मात्र १.०४ ने वाढली आहे. त्यामुळे बेरोजगारीमध्ये दरवर्षी लाखोची भर पडत चालली आहे. सध्या स्थितीत एकट्या भारतात शहरी व ग्रामीण भाग मिळून बेरोजगारी १५ कोटीच्या वर गेलेली आहे. तयमुळे जनतेची क्रयशक्ती कमी होत आहे. हे जागतिकीकरणामुळे घडत आहे.

जागतिकीकरणामुळे नवीन उद्योग सुरू होतील व रोजगार वाढतील अशी अपेक्षा होती पण गेल्या १० वर्षात रोजगार व गरीबीची नवीन समस्या निर्माण झाली आहे. जे लोक गरीब होते त्यांच्यापैकी फारच थोडे दारिद्रयरेषेच्या वर गेलेत परंतु बरेचशे लहान उद्योग आजारी पडल्यमुळे बरेच कामगार बेरोजगार होवून त्यांच्यात दारिद्रयावस्था निर्माण झाली. शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य किंमत न मिळाल्यामुळे शेतकरीसुद्धा दारिद्रयरेषेच्या खाली ओढल्या गेले. तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती वाढल्यामुहे सुद्धा गरिबांची संख्या द्रुतगतीने वाढत चालली आहे. परंतु जागतिकीकरणामुळे अनेक देशात जलद गतीने विकास साध्य करण्याच्या हेतून कर्मचारी कपात, खर्चाला लगाम, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण यामुळे अनेक देशात मोठ्या प्रमाणावर बेकारी, गरीबी, दरडोई उत्पन्नात घट, आर्थिक विषमता निर्माण झालेली दिसून येते.

भारतीय उद्योगावर जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणे निधी व बहुराष्ट्रीय कंपन्या यांनी लादलेल्या जाचक अटी, गॅट करार, पेटंट कायदा, सी.टी.बी.टी. करार, मुक्त आयात निर्यात धोरण, विदेशी

Scanned by CamScanner

गुंतवणूकीस प्रोत्साहन यामुळे अनेक उद्योगांचे खाजगीकरण आणि ग्रामीण भागातील पायाभूत उद्योगावर सुद्धा विपरीत परिणाम दिसायला लागलेलेआहे. याचा परिणाम भारतीय उद्योग क्षेत्राची मोठ्या प्रमाणावर पिछेहाट होईल. अशाच प्रकारे जागतिकीकरणामुळे जागतिक गरिबीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची भीती निर्माण झाली आहे.

जागतिकीकरणाच्या परिणामाला तोंड देण्यासाठी सरकारने कठोर धोरणांचा अवलंब करणे आवश्यक आहे. तसेच वित्तीय तुट आटोक्यात ठेवण्यसाठी सरकारला खर्चावर कठोर नियंत्रण ठेवावे लागेल. जागतिकीकरणाची प्रक्रीया सुरवातीला चांगली वाटत असली तरी भविष्यात नव्हे तर नजीकच्या काळातच विकसनशील देशांना गंभीर परिणमांना सामोरे जावे लागेल. तसेच जागतिकीकरणाला विरोध असला तरी सत्य स्विकारून उपाययोजना करावी. जागतिकीकरणाच्या दुष्परिणामाची जबाबदारी एकट्या शासन संस्थेवर ढकलून चालणार नाही. याला जागतिक राजकारण, अर्थकारण, शेतकरी व सरकार हे सर्वच घटक कारणीभुत आहेत. अशा प्रकारच्या धोरणाचा स्विकार करण्यापूर्वी देशातील जनता, विरोधीपक्ष सर्वांनाच विश्वासात घेतले पाहिजे. अशा धोरणासंबंधीची सविस्तर माहिती देशातील लोकांसमोर मांडली पाहिजे व त्याबद्दल लोकांची मते जाणून घेतली पाहिजे त्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाची खरी गरज आहे. उद्योग, शेती, सेवा वगैरे सर्व क्षेत्रात आपण कमकुवत आहोत हे प्रामाणिकपणे मान्य करून उपाय योजावेत. जुनी यंत्र सामग्री, अपुरी देशभाल, आधुनिकीकरणाचा अभाव, तंत्रज्ञानाचा अभाव, कामगारांची न परवडणारी संख्या, संशोधन व विकासावर नगण्य खर्च इत्यादी कारणामुळे हा कमकुवतपणा आला आहे. विदेशी व बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या तिव्र स्पर्धेला तोंड देण्याकरता आपले आर्थिक क्षेत्र सक्षम होणे आवश्यक आहे. वरील कमकुवतपणामुळे आपली उत्पादकता आणि क्षमता अत्यंत कमी पातळीवर गेली आहे या करीता देशांनी कायद्यात बदल करून घेतले पाहिजेत असे निर्णय घेवून आपली क्षमता वाढली तरजागतिकीकरणाची समस्या सोडविता येईल व देशांच्या प्रगतीत भर पडेल. त्यामुळे विकास शक्य होईल.

◆◆◆

Scanned by CamScanner

# WELFARE IN GLOBALISATION

**Dr. Hudda, H.A.**
Vasantrao Naik Govt. Instt. of Arts & Social Sciences, Nagpur

## About Globalization

Globalization refers to multiplicity of linkages and interconnections between the states and societies, which make up the present world system. It describes the process by which events, decisions, and activities on the part of world have significant consequences so far as individuals and communities from distant parts of the globe are concerned. Globalization denotes adjustment of national economy. It is conversion of a national market into international one, which facilitates international mobility to factors of production or commodities, thereby getting the best benefit of production. It is the integration of national economy with that of global economy. The concept of globalization is based on the market size. Hypothesis over the past two decades growing cross border linkages have exerted powerful influences on the direction of the world economy. Globalization leads to structure transformation of firms and nations and also creates new relationship, since global financial integration is the end of geography.

Hence, the globalization of economic activities along with flexible production system is changing the fact of capitalism for the good of small and medium sized firms that are likely to play an important role in alliance capitalism. Most of them will still be part of networks dominated by big firms.

### Welfare analysis

Welfare economics or normative economics is the branch of economics relating to the evaluation of social desirability of alternative policies. It attempts to formulate propositions with the help of which we can have a choice of criterion, for better or worse of alternative economic policies open to community. It is that part of the subject of economics, which lays down prescriptions for the policy maker in terms of which we can judge the impact of various alternatives polices on economic welfare of the community. It takes the norms of value judgement of the society and then lays down criteria on the basis of which economic policies can be formulated with a view to maximizing social welfare.

Definition by A.C. pigoug : Economic welfare, a function of the satisfaction, derived from the use of exchangeable goods and services almost coincident with real national income of the community.

Scanned by CamScanner

*Narrations :* Pigoue had pointed out that welfare is essential a state of mind and as such it is not possible to segregate one state of mind from another and call the first 'general' at the second economic welfare.

**Robertson's views**

According to Robertson, the concept of welfare embraces many states of mind, some of which are sensual, and others spiritual. It may be interesting to sort them out into different classes. Pigoue admitted that some economic causes affect economic welfare and general welfare differently. He pointed out that on average qualitative conclusions about effects on economic welfare apply also to the effects on general welfare. Utilitarian concepts proof of which has been given by Pigoue were criticised, firstly for being utilised subjectively and secondly, as better of since individual's welfare is linked.

**Paretian welfare concept**

According to Pareto, utility is neither cardinally measurable nor interpersonal comparison possible. He asserted that utility is ordinally measurable. Pareto therefore, gave the idea, since welfare is not measurable or quantifiable in terms of utility. Welfare needs to be increased, if a policy measure, at least, makes one person better than leading anybody else to worse. This means that in the Paretian welfare analysis, it is possible to know whether welfare has increased or decreased.

**Bentham**

The Benthamites postulate that aggregate welfare is simply the arithmetic sum of individual welfare that evades the problem of interpersonal comparison of utility by selecting a case in which such comparisons raise no difficulty.

**Edgeworth**

Edgeworth discarded the concept of equal capacities for want of satisfaction, but then defended the rule of equimarginal sacrifice in taxation on the assumption of uniform income utility functions.

**Wicksell**

Wicksell criticised Jevon's and Water's generalisation of the optimum exchange conditions on the grounds that optimum conditions of production and exchange depend on the initial factor endowments in the economy. Wicksell faced the problem of interpersonal comparison of utility.

**Kaldor-Hicks Sciatovasky's approach**

They corroborated their opinion in two different ways, viz., to build new criteria of welfare by introducing the concept of a compensating payment on the value-free foundation of ambiguous policy changes. The compensating payment helps the desirability of economic changes, which benefit some and harm others; and all this

Scanned by CamScanner

without bringing in value judgement or interpersonal comparison. Scitovasky attempts to separate efficiency from equity by defining an improvement in welfare as one for every possible distribution of income before the change makes every one better of even if compensation payments are actually paid.

### Value judgement and welfare

The main purpose of welfare economics is to establish some satisfactory criteria of finding out whether welfare has increased or decreased and on that basis to judge the desirability or otherwise of economic policy measures. Pigovian utilitarian welfare economist assumed that the welfare of the individual is linked with the units of commodities enjoyed by him and since utility is cardinally measurable, a simple addition of the utility functions of all individuals will give the social welfare function. This simplified process could be worked only on the assumptions of cardinal measurement of utility and the possibility of interpersonal comparisons of utility.

### Pigovian criteria of welfare

*Maximise real National Income :* National income could be maximised only by an optimal distribution of national resources, transferring them from less productive channels to more productive ones till no reorganisation of national production would raise real national output.

*Equalise income distribution :* This criterion depends upon the law of diminishing marginal utility of money. Pigoue explained it as equal capacity of satisfaction. The rich possess more income than the poor do and therefore the marginal utility of income to the rich is less than that of the poor. Poor man has the same capacity for satisfaction from income as a rich man has so transfer of real income from rich to the poor will necessarily increase social welfare.

### Walrasian views

Recent welfare economics :• A half century ago, Pareto and J.S. Mill distinguished between the immutable of production and the law of distribution, the size of the cake can be diversed from questions about its slices. Pareto analysed particular economic policies as if it was possible to discuss the effects on allocative efficiency given to the distribution of income and second to round off the analysis by adding a value judgement about the associated changes in income distribution. The value of Pareto's definition of social welfare was to make the decision crystal between efficiency and equity. Pareto continued to believe the significant pronouncement about economic policy that could be laid down solely on the basis of efficiency consideration. Nevertheless, the true function of welfare economics is to invade the discipline of applied ethics rather than to avoid it. In any working social order, there is bound to be a good deal of consensus on social ends. Economic policies, however, always lead towards ends that are themselves imperfectly grasped. Moreover, ends may be conflicting. The purpose of welfare economics should be to influ-

Scanned by CamScanner

ence the social consensus by making explicit and objectives of different policies and by demonstrating the consistency or inconsistency of particular means-ends relationship. The recent works of some economists-Arrow, Black, Downs, Quchanan and Tullock- are on public choice and the calculus of consent. New welfare economic proposition about efficiency is somehow value-free, while propositions about equity are necessarily value laden. The concept of Pareto-optimal allocation of resources- depends upon the hypothesis that (i) every individual is the best judge of his own welfare, (ii) social welfare is defined only in terms of the welfare of individual is not comparable in operational terms. In short, there is no such a thing as value-free welfare economics.

**Welfare in globalisation**

Welfare and globalisation are two different definitions related to their own independent features. Globalistion is a process of building a trade network amongst nations, which are absolutely governed by World Trade Organisation and welfare is the economic analysis related to utility and satisfaction of the consumer. In this process the market mechanism is controlled and business trade and activities governed. Demand and supply forces are automatically adjusted in the competitive economy, therefore general equilibrium is seen in the market. This is the scenario of the capitalist economy, where the nature of economy equalises with full competition and the least infrastructure of the government. The distribution of income amongst the factors in factorial market according to their efficiency and marginal productivity is to be reckoned with. Therefore the welfare of people considerably depends upon the market and market operations. If Pigounian and Paretian conditions of welfare are applied to the free market economy, it is noticed that the welfare and the purpose of market function, in a routine way, lead to free and liberal market. Therefore in free or liberal market, welfare as a partial function of market depends upon the state authority (it is needed). In market friendly atmosphere, it is the corresponding responsibility of both to look after the welfare of people in general.

_Social welfare :_ Welfare economists since decades have defined and measured social welfare in terms of utility or satisfaction of individuals. Each alternative allocation of resources involving alternative distribution of benefits may have favourable or unfavourable or mixed effects on the people. Thus allocation is most efficient or optimum. Some welfare economists think it in terms of Pareto optimally, which says, if an allocation is such that any change in its pattern can move one person or a number of persons up on the scale of preferences without reducing the welfare of any other member of the society, there is a scope for moving towards Pareto optimum, pareto optimal situation can be obtained in an economy by various possible allocation of resources. In other words there can be multiple points of the economic welfare frontier, which are Pareto optimum. Each point has a different distribution of economic welfare. What point of optimum is preferable could be decided only by value judgement regarding the distribution aspect.



Scanned by CamScanner




As the diagram depicts AB present the contour of all possible Pareto optimal situations and WW represent the welfare function with a particular forum of value judgement behind it. Q represents the position, where welfare is maximised. So the value judgement can be meaningfully conceived only in the context of the objective condition of a particular country and not in the context of the world.

*State -Vs- Market in India :* In India State -Vs- market in the context of social welfare with its attendant value judgement is quite common and any time several values collapse and clash with one another. Perception of a society and its choice in social sciences are determined by the environment The change in international situation influêncing our environment and the value system is no doubt in a state of flux. Yet one supreme goal overriding all value judgements is being cherished in this country as well as civilised societies. According to Mahatma Gandhi, "True economies stands for a social justice that promotes the good of all equally including the nearest and indispensable for decent life." There is no doubt that economic growth does matter for releasing this but if it does this it is only because of some associated benefits that are realised in the process of economic growth. In Marx's words- It is replacing the domination of circumstances and chance over individuals by the domination of individuals over chance and circumstances. In other words, the process of economic development has to be judged in terms of individual entitlement or capabilities created.

**Economic reform**

The programme of economic reforms is said to be forgotten towards achieving greater efficiency in using resources. This has three basic requirements, competition, system of reward and punishment related to quality and quantity of efforts and allocation of resources according to market determined relative price, which would be modified, when the social interest demands corrections. This would, require an essential competitive economy largely based on private enterprises, but modified to suit their requirements. This modification for the sake of reduction of unemploy-

Scanned by CamScanner

ment, control on natural resources and international enterprises in the interest of long-term national and global interest.

*Structural adjustment and stabilisation programme :* In India stabilisation and structural adjustment programmes are needed to maximise social welfare through appropriate growth. The problems of stabilisation are caused by excess absorption over income and this is the result of structural constraints, which prevent output from adjusting to demand or structure of production to change flexibly in response to the change in the pattern of demand. The response of private sector to the change in the pattern of demand is a key factor.

**Epilogue**

The reality of the wave of liberalisation and market forces is that it has started engulfing the world. It could not be checked, but it has to be directed towards maximisation of benefits of one's own economy. The state has to retain its central command over the organisation of production and distribution. The command, however, has to be exercised to create a congenial condition for working of both the weak and the strong establishing appropriate complementaring between small and big producers and private sectors in a way that it will operate as people friendly as possible. In the changing circumstances for ensuing growth maximising social welfare and securing social justice, the rate of the state has to be pragmatic, flexible and inspiring. Incentives for competitiveness have to be provided and resources to be channelised in the social desirable directions. Thus, there is no question of minimising the role of the state. But there is a need to reorient the state's role and change the area of direct operation. State's role in building up of infrastructure and development of social services need to be strengthened. State has to be market friendly, because market friendly atmosphere maintains the economic and social welfare of common people through the favourable policy of the state.

Welfare in globalisation is possible, if everybody sacrifices equally and giving the equal response to the state policy and support maintain the market friendly environment in the country.

**References**

1. Indian Economy after 50 years of Independence- Debendra K. Das.
2. Advanced Economy Theory- P.N. Chopra
3. Economic Theory in Retrospect- Mark Blaug
4. Globalisation and Liberalisation -G.S. Batra
5. Globalisation Technology and Trade - Singer

Scanned by CamScanner

# ब.

# सेवाकराच्या अंतर्गत येणाऱ्या सेवाक्षेत्रातील रोजगार निर्माण क्षमता

## सहभाग

- प्रा. सुनिल एस. डहाके
- प्रा. सूर्यभान जंगलुजी आंबीलडुके
- डॉ. माधुरी प्र. लेले
- प्रा. बी. बी. कालपांडे



Scanned by CamScanner

# सेवाकराच्या अंतर्गत येणाऱ्या सेवा क्षेत्रातील रोजगार निर्माण क्षमता

प्रा. सुनिल एस. डहाके
कला वाणिज्य महाविद्यालय,
मौदा. जि. नागपूर.

**प्रास्ताविक**

**भा**रताची अर्थव्यवस्था ही झपाट्याने बंद आणि संरक्षित अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे जात आहे. आता भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेची बरोबरी करू लागली आहे. ''मुक्त अर्थव्यवस्था(Free Economy)''''शिथिलीकरण''(Liberalisation),''खाजगीकरण''(Privatisation) आणि ''जागतिकीकरण'' (Globalisation) यामुळे भारतात विविध संघटनांची कार्ये सुरू झाली आहेत. यात ''सेवा क्षेत्राचा'' देखील समावेश होतो. अर्थव्यवस्थेत आणि बाजारपेठेत निर्माण झालेल्या तीव्र स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आणि त्यातील आव्हाने स्वीकारण्यासाठी वस्तुंच्या दर्जात आणि गुणवतेत वाढ करण्यासाठी, वस्तुंच्या किंमती किफायतशीर ठेवण्यासाठी आणि संघटनेला आधुनिक स्वरूप प्रदान करण्यासाठी सेवा क्षेत्राचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

संपूर्ण जगात होत असणारी सेवा क्षेत्रातील वाढ ही देशाच्या विकास दरात वाढ घडवून आणण्यासाठी कारणीभूत ठरली आहे. तसेच सेवा क्षेत्राच्या वाढीमुळे रोजगाराच्या निर्मितीलादेखील चालना मिळाली आहे. सध्याच्या विकास दरात भारतात सेवा क्षेत्राचा सहभाग हा ४१% आहे. इ. स. १९९८-९९ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालात नमुद केल्यानुसार भारतात सेवा क्षेत्राचा अत्यंत झपाट्याने विकास होत आहे. इतर क्षेत्रांच्या विकासापेक्षा सेवा क्षेत्राचा विकास अधिक प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेती क्षेत्र मागे पडुन औद्योगिक क्षेत्राचा विकास दर देखील कमी झाला आहे. इस. १९९०-९१ मध्ये सेवा क्षेत्राचा गृहोपयोगी उत्पादनातील हिस्सा ४१.३% एवढा होता. त्यात वाढ होऊन इ.स. १९९८-९९ मध्ये तो ५१.२% एवढा झाला आहे. त्यापैकी प्रामुख्याने व्यापार संदेशवहन, वाहतूक, बँक आणि विमा या सेवा क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे.

**सेवा क्षेत्राचा विस्तार**

देशातील सेवा उद्योगात झपाट्याने वाढ घडुन येत आहे. अनेक उद्योग विविध प्रकारच्या सेवा क्षेत्रात पदार्पण करीत आहेत. देशाच्या विकासात सेवा क्षेत्राचा फार मोठा वाटा आहे. उद्योग, व्यापार गृहोपयोगी वस्तू, दैनंदिन गरजा इत्यादी अनेक क्षेत्रात विविध प्रकारच्या सेवा उद्योगांची आवश्यकता असते. सद्यस्थितीत असे एकही क्षेत्र नाही जेथे सेवा उद्योगांचे विपणन होत नाही त्यामुळे सेवा क्षेत्राची व्याप्ती ही सर्व समावेश अशी आहे. जनतेच्या जीवनमानातील होणारे बदल हे सेवा क्षेत्राचा वेगाने विस्तार होण्यामागील एक प्रमुख कारण आहे. अनेक नवनवीन माहिती आणि तंत्रज्ञानाची जनतेला जस जशी ओळख होत आहे. तस तसे त्यांचे जीवनमान आणि राहणीमान बदलत चालले आहे. अनेक अत्याधुनिक तंत्राने युक्त सामुग्री जनतेला



Scanned by CamScanner

वापरण्यासाठी उपलब्ध झाली आहे. या सर्व तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी जनता सेवा क्षेत्राचा आधार घेत आहे. ग्राहकांच्या खर्चापैकी अर्ध्यापेक्षा जास्त खर्च हा आजकाल सेवांवर होत असतो.

ग्राहकांच्या बदलत्या गरजा, त्यांचे बदलते स्वरूप, त्यांची बदलती जीवन पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वाढता उपयोग, तंत्रज्ञानात होणारी नवनवीन संशोधने यामुळे आजची बाजारपेठ ही 'ग्राहक सेवा विपणी' (Customer Service Market) झाली आहे. या तंत्रज्ञानाच्या उपयोगामुळे 'श्रमाची कार्यक्षमता' (Efficiency of Labour) देखील वाढली आहे. व्यवसायांच्या संधीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्यामुळे रोजगाराच्या कक्षा देखील रूंदावल्या आहेत.

सेवा क्षेत्रात होणारी ही वाढ अत्यंत झपाट्याने होत आहे. त्यावरून सेवा क्षेत्राची प्रचंड व्याप्ती लक्षात येते.

**सेवा क्षेत्राची व्याप्ती**

**१. वैयक्तिक सेवा क्षेत्र**

सद्यस्थितीत देशातील जनतेच्या राहणीमानात मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. नवनवीन जीवनशैली आणि सुधारीत राहणीमानांचा अवलंब आपल्या जीवनात करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती धडपड करीत आहे. या पार्श्वभुमीवर सद्यस्थितीत अनेक प्रकारच्या वैयक्तिक सेवा मोठ्या प्रमाणावर प्रदान केल्या जातात. अनेक घरगुती उपयोगाच्या आणि मानवी जीवन सुखी करणाऱ्या सेवा प्रदान करणाऱ्या संस्था विविध प्रकारच्या सेवांचे विपणन करीत आहेत. उदा. घरांना रंगरंगोटी करणे, घराची साफसफाई करणे, विजेची उपकरणे लावुन देणे, विविध प्रकारच्या घरगुती सेवा पुरविणे यात सकाळी दूध आणण्यापासून तर वर्तमान पत्रे, किराणा, भाजी इतर आवश्यक वस्तू यासर्वांचा समावेश होतो. यासर्व सेवा पुरविणाऱ्या संस्था विपणीमध्ये कार्यरत आहेत. मोठ्या शहरांमधुन तर या सेवा वापरणे एवढे नित्याचे झाले आहे की या 'सेवांचा' आपण उपयोग करतो किंवा या 'सेवा' आहेत असे देखील आता कोणाला वाटत नाही. तसेच प्रत्येक व्यक्ती स्वत:देखील अनेक सेवांचाउपयोग करून घेत असते. उदा. आजकाल स्त्रीया नोकरीसाठी बाहेर पडतात. त्यामुळे त्यांना आपले राहणीमान आपल्या व्यवसायासाठी सुसुंगत असावे असे वाटते. बाहेरीत जगात आपले निश्चित स्थान निर्माण करण्यासाठी त्यांना आधुनिक राहणीमान आणि नटनिटकेपणा आत्मसात करावा लागतो. त्यासाठी त्या सौंदर्यतज्ञांचा सल्ला घेतात. त्यामुळेच आजकाल अनेक ठिकाणी ब्युटी पार्लरचा व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर चालत आहे. केश कर्तनालये, ब्युटी पार्लर, व्यायाम आणि आरोगयदायी सेवा, हेल्थक्लब, योगासन मंडळे, हास्यक्लब या सर्वांचा यात समावेश होतो.

**(२) सुविधा प्रदान करणारे सेवा क्षेत्र**

जेव्हा एखादी वस्तू खरेदी केल्यामुळे किंवा उपयोग केल्यामुळे ग्राहकाला काही सुविधा प्रदान केल्या जातात तेव्हां त्या सेवांना किंवा सुविधांना 'सुविधा प्रदान करणाऱ्या सेवा' असे म्हणतात. स्वत:चे जीवन सुखी आणि सुरळीत करण्यासाठीच ग्राहक हे सामान्यपणे वस्तुंची खरेदी करीत असतात. त्यामुळे त्या वस्तुंच्या माध्यमातुन त्यांना सुविधा प्राप्त होतात. उदा. वॉशींग मशीन, मिक्सर, फुडप्रोसेसर, फ्रिज, पंखे इत्यादी. या सर्व वस्तुंच्या उपयोगामुळे ग्राहकाला अनेक प्रकारच्या सुविधा प्राप्त होत असतात. या सुविधा प्रदान करणाऱ्या वस्तुंनाच 'सुविधा प्रदान करणाऱ्या सेवा' असे म्हणतात.

Scanned by CamScanner

### (३) व्यावसायिक सेवा क्षेत्र

व्यवसायासाठी पुरविण्यात येणाऱ्या सेवांना 'व्यावसायिक सेवा क्षेत्र' असे म्हणतात. सद्यस्थितीत व्यापार व्यवसायात आमुलाग्र बदल घडुन आले आहेत. वस्तूंची विक्री घडवून आणण्यासाठी या विविध व्यावसायिक सेवांचा उपयोग करणे प्रत्येकच व्यवसायाला अपरिहार्य झाले आहे. यात वाहतुक सेवा, व्यवस्थापन सल्लागार सेवा, कायदा विषयक सेवा इत्यादी अनेक प्रकारच्या सेवांचा यात समावेश होतो. जनतेच्या बदलत्या आवडी-निवडी आणि राहणीमान यामुळे या सेवांचा उपयोग करणे आवश्यक असते.

### (४) ग्राहक सेवा क्षेत्र

ज्यांचा उपयोग ग्राहक करतात आणि आपल्या सुख-समाधानाची पातळी वाढवितात तसेच मानसिक समाधान प्राप्त करतात अशा सर्व सेवांचा 'ग्राहक सेवा क्षेत्रात' समावेश होतो. या सेवांचा उपयोग करून ग्राहकाला प्रत्यक्षात काहीच दृश्य स्वरूपाची वसतू प्राप्त होत नाही. परंतु त्यात एक प्रकारचे समाधान मात्र नक्कीच मिळते. त्यात हॉटेल्स, सिनेमागृहे, ग्राहक वाहतूक सेवा, प्रसाधनगृहे, आरोग्य आणि वैद्यकिय सेवा, मानसोपचार इत्यादी अनेक सेवांचा यात समावेश होतो.

अशा प्रकारे देशामध्ये सेवा क्षेत्राची व्याप्ती आणि विस्तार झपाट्याने वाढत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा फार मोठा भाग या सेवा क्षेत्राने व्यापला आहे आणि दिवसेंदिवस त्यात भरच पडत आहे. या सेवा क्षेत्रांच्या वाढीबरोबरच सरकारच्या उत्पन्नात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या सेवांच्या प्रदानातून प्राप्त केलेल्या उत्पन्नावर सर्व सेवा संस्थांना आयकर तसेच व्यवसायकर द्यावा लागतो. देशाच्या सेवा क्षेत्राच्या व्याप्ती आणि विस्ताराबरोबरच सरकारच्या उत्पन्नात देखील झपाट्याने वाढ झाली आहे हे पुढील सारणीवरून लक्षात येते.

**सेवा क्षेत्रातील वाढ आणि प्राप्त सरकारी उत्पन्न**

| वर्ष | सेवांची संख्या | करदात्यांची संख्या | प्राप्ती (कोटी रूपयात) |
|---|---|---|---|
| १९९४-९५ | ३ | ३,९४३ | ४१०.६१ |
| १९९५-९६ | ३ | ४,८६५ | ८४०.१० |
| १९९६-९७ | ६ | १३,९८२ | १,०२२.०१ |
| १९९७-९८ | १८ | ४५,९९१ | १,५५१.९७ |
| १९९८-९९ | ३० | ९०.४५६ | १,३८७.०९ |

### भारतीय सेवा क्षेत्राचे बदलते स्वरूप

भारताच्या सेवा क्षेत्रात झपाट्याने वाढ घडून येत आहे. पुढील आकृतीत सेवा क्षेत्र, कृषी क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यांची स्थिती दर्शविली आहे.

**भारताच्या उद्योगाची स्थिती**






Scanned by CamScanner

वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे शेती क्षेत्राचे वर्चस्व हळू हळू कमी होत असून सेवा क्षेत्राचे वर्चस्व भारताच्या अर्थव्यवस्थेत सतत वाएत आहे. भारताच्या सेवा क्षेत्रांच्या विकासाचा दर ही पुढील प्रमाणे वाढत आहे.

**भारतातील सेवा क्षेत्रांचा विकास दर**




भारताच्या उद्योग क्षेत्रात सुरूवातीच्या काळात म्हणजे इ.स. १९५०-५१ मध्ये २८.५% सेवा क्षेत्राचा सहभाग होता. इ.स. १९९०-९१ मध्ये ४१% झाला आणि इ.स. २०००-२००१ मध्ये हा सहभाग ५१% होता.

## सेवा क्षेत्र व बेकारी निर्मुलन

देशात वाढत्या सेवा क्षेत्राचा बेकार युवकांना स्वयंरोजगार निर्माण करण्याकरीता मोठ्या प्रमाणात उपयोग होवु शकतो. यमध्ये विशेषत: हॉटेल सेवा, रेस्टॉरेंट सेवा, कॅटरींग सेवा, घरपोच सेवा (Home delivery services), कुरीयर सेवा, आरोग्य आणि दवाखाने सेवा, गोदाम सेवा, धुलाई आणि सफाई सेवा, वृद्धाश्रम सेवा, गोदाम सेवा इ. सेवांचा समावेश होतो. ग्रामीण भागात सध्या सरकारने जिल्हा परिषद व पंचायत समिती अंतर्गत 'बचत गट योजना' चालु केली आहे. यात विशेषत: दारिद्र्य रेषेखालील युवक व युवतींना अनुदान देवुन सहभागी केले जाते. त्यात वरील सेवांचा समावेश करून सेवा उद्योगास प्रोत्साहन दिले जाते. अशाप्रकारे ग्रामीण भागातील युवकांची बेकारी दुर होण्यास मदत होईल.

सेवा क्षेत्राचा वाढता विस्तार लक्षात घेता सेवा क्षेत्राचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. सेवा क्षेत्राला सरकारने काही प्रमाणात अनुदान देवुन बेकार युवकांना स्वयंरोजगाराकडे वळविण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास बेकारी निर्मुलन होण्यास बरीच मदत होईल. अन्य विविध उद्योग ब्युटी पार्लर, कॅटरिंग, लेडीज सलुन व जाहिरात शहरांकडुन ग्रामीण भागत सुद्धा असे व्यवसाय सुरु झालेले आहेत व एकूणच हे सर्व व्यवसाय ग्रामीण अर्थव्यवस्था कार्यक्षम करण्याकरिता मदत करीत आहेत.

**संदर्भ – औद्योगिक आणि सेवा विपणन प्राचार्य डॉ. बोधनकर व डॉ. मेधा कानेटकर**

✦✦✦

Scanned by CamScanner

# सेवाकराच्या अंतर्गत येणाऱ्या सेवाक्षेत्रातील रोजगार निर्माण क्षमता

प्रा. सूर्यभान जंगलूजी आंबिलडुके,
कला वाणिज्य महाविद्यालय, मौदा,
जि. नागपूर.

## प्रास्ताविक

सध्या भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी बरोबरी करू लागली आहे. मुक्त अर्थव्यवस्था, शिथीलीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यामुळे भारतात विविध संघटनांची कार्ये सुरू झाली आहेत. त्यात प्रामुख्याने सेवाक्षेत्राचा देखील समावेश होतो. सेवाक्षेत्रात सद्यपरिस्थितीत वेगाने वाढ होत आहे. या सेवाक्षेत्राच्या वाढीमुळे आपल्या देशात मोठ्या प्रमाणांत रोजगार निर्मितीला चालना मिळाली आहे. सेवाक्षेत्राचा विकास करून आपल्या देशाचा विकास आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करता येते, व या सर्व सेवांवर सेवाकर लावून सरकारी उत्पन्नात वाढ करता येते. विशेषत: ज्या सेवा व्यावसायिक दृष्टीकोनातून केल्या जातात त्यांच्यावर सेवाकर लावणे अत्यंत आवश्यक आहे. या सेवाकरातून जे उत्पन्न मिळेल ते नवीन सेवांचा विकास करण्यासाठी योजनाबद्ध विकास प्रक्रीयेच्या माध्यमातून उपयोगात आणले तर त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावता येईल, त्यांचे राहणीमान सुधरवता येईल, लोकांना जास्तीत जास्त समाधान देता येईल.

## सेवा आणि सेवाक्षेत्र

''उत्पादित वस्तुंची विक्री करण्यासाठी, त्यात वाढ करण्यासाठी देशातील व्यापार व्यवसाय आणि उद्योग सुरुळीत चालू ठेवण्यासाठी विविध सामाजिक राजकीय आणि आर्थिक घडामोडी योग्य पद्धतीने घडवून आणण्यासाठी देशातील जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी, देशाचा विकासदर वाढविण्यासाठी सोई आणि समाधान प्रदान करण्याऱ्या ज्या दृष्य आणि अदृष्य बाबी निर्माण केल्या जातात त्या सर्वांना सेवा असे म्हणतात.''

या सेवा संकल्पनेवरुन सेवाक्षेत्राची व्याप्ती आपल्या लक्षात येते. सध्याच्या विकास दरात भारतात सेवाक्षेत्राचा सहभाग हा ४१% आहे. इ.स. १९९८-९९ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणे भारतात सेवाक्षेत्राचा अत्यंत झपाट्याने विकास होत आहे. इतर क्षेत्राच्या विकासापेक्षा सेवाक्षेत्राचाविकास अधिक प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेतीक्षेत्र मागे पडून औद्योगिक क्षेत्राचा विकासदर देखील कमी झाला आहे. त्यापैकी प्रामुख्याने व्यापार, संदेशवहन, वाहतुक, बँक आणि विमा या सेवाक्षेत्राचा मोठ्याप्रमाणावर विकास झाला आहे. भारतात उद्योग क्षेत्रात सुरवातीच्याकाळात म्हणजे इ.स. १९५०-५१ मध्ये २८.५% सेवाक्षेत्राचा सहभाग होता. इ.स. १९९०-९१ मध्ये ४१% झाला आणि इ.स. २०००-२००१ मधे सहभाग ५१% होता यावरून देशातील सेवाउद्योगात झपाट्याने वाढ घडून येत आहे हे स्पष्ट होते. आज अनेक उद्योग अनेक प्रकारच्या सेवाक्षेत्रात पदार्पण करीत आहेत. उद्योग, व्यापार गृहपयोगी वस्तु, दैनंदिन गरजा इत्यादी अनेक क्षेत्रात विविध प्रकारच्या सेवा उद्योगांची आवश्यकता असते. त्यामुळे सेवाक्षेत्राची व्याप्ती सर्वसमावेशक

Scanned by CamScanner

अशा आहे. जनतेच्या जीवनमानात होणार बदल हे सेवाक्षेत्राच्या वेगाने विसतार होण्यामागील एक प्रमुख कारण आहे. अनेक नवनविन माहिती आणि तंत्रज्ञानाची जनतेला जशी ओळख होत आहे तसतसे त्यांचे जीवनमान आणि राहणीमान बदलत चालले आहे. ग्राहकांच्या एकूण खर्चापैकी अर्ध्यापेक्षा जास्त खर्च हा सेवांवर होत असतो. एखाद्या वस्तुच्या निर्मीतीवर जेवढा खर्च होत नाही त्यापेक्षा जास्त खर्च त्यावस्तुसाठी पुरविण्यात आलेल्या सेवांवर होतो यावरून सेवाक्षेत्राची व्याप्ती आणि विस्तार हा **वैय्यक्तिक सेवाक्षेत्र, सुविधा प्रदान करणारे सेवाक्षेत्र, व्यावसायिक सेवाक्षेत्र आणि ग्राहक सेवा** क्षेत्रापर्यंत दिसून येतो.

**सेवाक्षेत्रातील रोजगाराच्या नविन संधी आणि स्वयंरोजगार**

सध्यास्थितीत भारताची लोकसंख्या १०३ कोटीच्या वर आहे. देशातील जनतेच्या राहणीमानात मोठ्याप्रमाणांवर बदल होत आहे. नवनवीन जीवनशैली आणि सुधारित राहणीमानाचा अवलंब आपल्याजीवनात करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती धडपड करीत असते. बाहेरील जगात आपले निश्चित स्थान निर्माण करण्यासाठी त्यांनाआधुनिक राहणीमान आणि नीटनेटकेपणा आत्मसात करावा लागतो आणि त्यासाठी प्रत्येक व्यक्तीला पुढील सेवांची मदत प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे घ्यावी लागते. जसे रेल्वे सेवा, हवाई सेवा, रस्ते वाहतूक सेवा, पाणी पुरवठासेवा, बीजपुरवठा सेवा, संदेशवहन सेवा, अधिकोषण सेवा, विमा सेवा,उधारीच्या सेवा, भाडे सेवा, सल्लामसलत सेवा, जाहिरात सेवा, संरक्षण सेवा, पोलिस सेवा, प्रसारण सेवा, शिक्षण सेवा, वैद्यकीय सेवा, बांधकाम सेवा, व्हिडीओ सेवा, पार्टी सेवा, डिस्को सेवा, क्लब सेवा, हॉटेल सेवा, कॅटरींग सेवा, घरपोच वस्तू सेवा, प्रवास सेवा, कुरीअर सेवा, वृद्धाश्रम सेवा, दुरूस्ती सेवा, घरगुती सेवा, ब्युटीपार्लर सेवा, सलून सेवा इ. या सर्व सेवाक्षेत्रात स्वयंरोजगार व रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत.

सरकारने वरील सेवांचा विचार करून सर्वसामान्य जनतेला या सेवांचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल अशा योजनाबद्ध कार्यक्रमांची आखणी करावयास पाहिजे ज्यामुळे सेवाक्षेत्र विकसित होईल आणि सरकारला सेवाकराच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणावर महसूल प्राप्त करता येईल. देशात सेवा क्षेत्राची व्याप्ती वाढत असून विस्तार झपाट्याने होत आहे. याबरोबरच सरकारच्या महसुलात देखील वाढ झालेली आहे. इ.स. १९९४-९५ मध्ये सेवांची संख्या ३ होती तर करदात्यांची संख्या ३९४३ होती आणि यापासून सरकारला ४१०.६१ कोटी रुपयांचे महसूल प्राप्त झाले होते. यात वाढ होऊन १९९५-९६ मध्ये ८४०.१० कोटी रुपये, १९९६-९७ मधे १०२२.०१ कोटी रुपये,१९९७-९८ मध्ये १५५१.९७ कोटी रु. महसूल प्राप्त झाला होता १९९८-९९ च्या आकडेवारीनुसार सेवांची संख्या वाढून ३० वर गेली आणि करदात्यांची संख्या ९०४५६ वर गेली आहे आणि यांच्यापासून सरकारला १३८७.०९ कोटी रुपये महसूल प्राप्त झाला आहे. यावरुन हे स्पष्ट होते की दिवसेंदिवस सेवाक्षेत्रात वाढ होत असून सरकारी उत्पन्न वाढविणारे आणि स्वयंरोजगार पुरविणारे क्षेत्र म्हणून सेवाक्षेत्राकडे सर्वांचे लक्ष वेधल्या गेले आहे. देशाच्या जलद आर्थिक विकासाकरीता या क्षेत्राचा विकास कसा होईल याकडे सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे. केवळ कराद्वारे महसूल प्राप्त करुन देणारे क्षेत्र म्हणून सरकारने याकडे बघावयास नको. यादृष्टीने योजनाबद्ध कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

✦✦✦



Scanned by CamScanner

# सेवाकराच्या अंतर्गत येणाऱ्या सेवाक्षेत्रातील रोजगार निर्माण क्षमता

डॉ. माधुरी प्र. लेले
श्री.बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

देशाच्या आर्थिक विकासाकरिता आपण जी अर्थव्यवस्था स्वीकारली आहे त्याची तीन क्षेत्रात विभागणी केली जाते, प्राथमिक क्षेत्र द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्र, प्राथमिक क्षेत्र म्हणजे कृषी आणि संलग्न व्यवसाय, द्वितीय क्षेत्रात औद्योगिक विकासाचा समावेश होतो तर तृतीय क्षेत्रात सेवांची निर्मिती व विक्री यांचा समावेश होतो. या तीनही क्षेत्रातून होणाऱ्या एकुण उत्पादनाला देशांतर्गत स्थुल उत्पादन असे म्हणतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशाच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आणि १९५१ पासून पंचवार्षिक योजनांना सुरूवात झाली. नियोजनाच्या बऱ्याच मोठ्या काळात स्थुल उत्पादनापैकी सुमारे ७५% हिस्सा प्राथमिक क्षेत्राचा २०% हिस्सा औद्योगिक क्षेत्राचा तर केवळ ५% हिस्सा सेवा क्षेत्राचा होता. १९८० पासून हळूहळू प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा कमी कमी होत गेला. आजच्या परिस्थितीत प्राथमिक क्षेत्र ३५% औद्योगिक क्षेत्र १५% आणि सेवा क्षेत्र ५०% असे चित्र आहे. यावरुनच सेवा क्षेत्राचे योगदान केवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढले हे स्पष्ट होते.

सेवाक्षेत्राचा विकास झाला, अनेक नवीन सेवांचा उदय देखील झाला (उदा. आऊट सोर्सिंग) परंतू त्यापासून राष्ट्राच्या तिजोरीला मिळणारे करस्वरूपी महसूल मात्र नगण्यच राहिले. या कराविषयी एक अभ्यास एम. गोविंदराव यांनी केला आहे. त्यावरून हे स्पष्ट केले आहे की सेवा क्षेत्रापासून मिळणारा महसूल स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १% तर एकूण करांच्या ६.६% इतकाच आहे.

ही स्थिती सरकारी महसुलीच्या दृष्टीने तर उचित नाहीच पण देशाच्या कर प्रणालीवर देखील आघात करणारी आहे. कारण करप्रणालीची सुदृढता न्याय्यता आणि उत्पादकता यावर याचा विपरित परिणाम होतो.

**सेवाकर म्हणजे काय ?**

एखादी सेवा वापरल्याबद्दल व्यक्तीला मोबदला द्यावा लागतो. त्या व्यतिरिक्त सेवेच्या वापराबद्दल द्यावा लागणार कर म्हणजे सेवा कर होय. वस्तू या मूर्त किंवा दृश्य स्वरूपाच्या असतात. त्यामुळे वस्तूंच्या वापरावर किंवा उपभोगावर द्यावा लागणारा कर सर्वपरिचित आहे. परंतू सेवा अमूर्त आहे अदृश्य आहे. त्यामुळे सेवा कराची आकारणी आणि वसुली याबाबत संभ्रम होता. त्यामुळे अतिशय मोजक्याच सेवांकर कर लावल्या जात होता.उदा. वीज

**सेवाकराची व्याप्ती**

१९९४-९५ या वर्षापासून खऱ्या अर्थाने व गंभीरपणे सेवाकराची आकारणी सुरू झाली. १९९४-९५ च्या अर्थसंकल्पात सर्वप्रथम अर्थमंत्री (तत्कालीन) डॉ. मनमोहन सिंग यांनी सेवाकराचा प्रस्ताव मांडतांना दोन प्रमुख मुद्दे मांडले - (१) सेवाक्षेत्राचा विस्तार झाला असून राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ४०% झाला आहे.

Scanned by CamScanner

(२) त्यामुळे त्याचा योग्य महसुल देशाला मिळाला पाहिजे.

कर सुधारणा समितीने अप्रत्यक्ष करांचा पाया विस्तृत करण्यासाठी सेवाकर आकारणीची शिफारस केली होती. १९९४-९५ मध्ये टेलिफोन, बिगर जीवन विमा, आणि शेअर दलाल यांच्यावर सेवाकर आकारला त्यानंतर १९९७-९८ मध्ये अधिक सहा सेवा, १९९८-९९ मध्ये पुढील अकरा सेवा, २००१-२००२ मध्ये एकदम १५ सेवांचा समावेश सेवाकरांमध्ये केला आणि सेवाकराखाली आलेल्या सेवांची संख्या ३७ झाली. २००२-०३ मध्ये १० सेवांची वृद्धी होऊन एकूण ४६ सेवा सेवांकराखाली आलेल्या आहेत.

**सेवा कर महसुल**

सेवाकराची आकारणी १९९४-९५ पासून होऊ लागली व हळुहळु हा महसुल वाढु लागला. त्यावर्षी ४०७ कोटी रूपये गोळा झाले. नंतरच्या पाच वर्षात महसुलात पाचपट वाढ झाली. १९९८-९९ मध्ये १९५० कोटी रूपये महसुलाचा अंदाज होता. यानंतरच्या तीन वर्षात सुमारे तिपटीने वाढ झाली. २००२-०३ च्या अर्थसंल्पात या करापासून ६०२६ कोटी रू. गोळा होतील असा अंदाजपत्रकातील आढावा आहे. यापुढे महसुल वाढविण्यासाठी अधिकाधिक सेवा या सेवाकराच्या अंतर्गत आणल्याजातील यात शंकाच नाही.

**सेवाकराचे समर्थन**

सेवाकराचे समर्थन देऊन तो आकारण्याची आणि विस्तारण्याची नितांत आवश्यकता आहे हे स्पष्ट करता येते. प्रथम म्हणजे सेवाक्षेत्राची उत्पन्न व रोजगार क्षमता सतत वाढत आहे. देशांतर्गत स्थुल उत्पादनात ५०% उत्पादन या क्षेत्रातून निर्माण होते. त्यामुळे देशाच्या तिजोरीलाही या क्षेत्राने हातभार लावला पाहिजे. दुसरे असे की करांचा पाया व्यापक करून कर महसुल वाढविण्याच्या दृष्टीने सेवा कर आकारणे जरूरीच आहे. तिसरे म्हणजे सध्याच्या मंदिच्या परिस्थितीत उत्पादन शुल्कापासूनचा महसुल कमी होतो त्याची भरपाई सेवा करामुळे होऊ शकते. चौथे कारण असे की देशाच्या औद्योगिक विकासासाठी, प्रादेशिक समतोलासाठी, उत्पादन शुल्कात विविध सवलती द्याव्या लागत असल्यामुळे महसुल कमी होत आहे. त्यादृष्टीने सेवा कर आवश्यक आहे. सर्वात शेवटचे कारण म्हणजे जागतिक व्यापार संघटनेच्या अटींनुसार आणि उदारिकरणाच्या धोरणाच्या संदर्भात आपल्याला आयांतींवरील कर कमी करणे आवश्यक आहे. परिणामी जकातीपासूनचा (customs) महसुल कमी होत आहे. यानुकसानाची काही प्रमाणात भरपाई करण्यासाठी सेवाकराची आकारणी आवश्यक आहे.

**सेवाक्षेत्रातील रोजगार संधी**

वरील विवेचनावरून सेवाक्षेत्राचा आवाका आपल्या लक्षात येईल. त्यावरून अर्थातच या क्षेत्रात रोजगाराच्या किती प्रचंड संधी उपलब्ध आहेत हे ही आपोआपच समजून येते. सध्या ७१ सेवा या सेवाकरांच्या अंतर्गत समाविष्ट आहेत. यातील काही सेवांची नावे पाहिली तर व्याप्ती सहज लक्षात येते.

यासारख्या अनेक सेवा पुरविणाऱ्या एजन्सीज चालविण्याचे कार्य बेरोजगार युवकांना अनेक संधी उपलब्ध करून देऊ शकतात. गरज आहे ती सरकारी नोकरीच्या मागे न लागता वरील पैकी कोणत्याही एका क्षेत्रात परिपूर्ण ज्ञान, मंत्र आणि मेहनीतीच्याआधारे आपले स्थान प्राप्त करणे. जागतिकीरकणाच्या युगात या क्षेत्रातही प्रचंड आणि खुली स्पर्धा आहे हे मात्र ध्यानात ठेवले पाहिजे.

.......

Scanned by CamScanner

(१) टेलिफोन
(२) बिगर जीवन विमा
(३) शेअर्स खरेदी विक्री
(४) ट्रॅव्हल एजंट्स, टूर ऑपरेटर्स
(५) कन्सल्टिंग इंजिनिअर्स.
(६) क्लिअरिंग आणि फारवर्डिंग एजंट्स
(७) आऊट डोअर केटरर्स, पेंडॉल कॉन्ट्रक्टर्स, प्लेसमेंट एजन्सीस
(८) साऊंड रेकार्डींग सर्विसेस
(९) विशिष्ट बँकीग आणि फायनॉनिस्यल सर्व्हिसेस,
(१०) वाहन सर्व्हिसींग सेंटर्स
(११) ऑनलाइन इन्फॉर्मेशन
(१२) टेलेक्स फॅक्स टेलिग्राफ्स सर्व्हिसेस
(१३) ब्युटी पॉर्लर्स
(१४) जाहिरात संस्था,
(१५) फोटोग्राफिक
(१६) ब्रॉडकास्टिंग
(१७) इन्व्हेस्ट मॅनेजमेंट
(१८) स्टोरेज अँड वेअर हाऊसिंग
(१९) कार्गो हँडलिंग
(२०) हेल्थ क्लब
(२१) फॅशन डिझायनर्स
(२२) ड्राय क्लिनर्स
(२३) केबल ऑपरेटर्स
(२४) कार्पोरेट बॉडीज.

सेवा क्षेत्रात उपलब्ध असलेलया रोजगार संधी दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाणार आहे. प्राथमिक क्षेत्र म्हणजे कृषी व त्यावर आधारीत उद्योगांमध्ये देखील सेवा क्षेत्राची मदत होऊ शकते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे नाशिकचा ''द्राक्ष'' उत्पादन महासंघ होय. द्राक्ष निर्मिती या प्राथमिक क्षेत्राला उत्तम पॅकेजिंग, वेअर हाऊसिंग, जाहिरात, प्रतवारी आणि बँडनेम(महाग्रेप्स) या सेवांच्यामदतीने आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली याच धर्तीवर आता कोकणात ''महामँगो'' या बँडनेम वर हापुस आंब्याची विक्री करण्यासाठी प्रयत्न होत आहेत.

प्राथमिक औद्योगिक किंवा सेवा कोणतेही क्षेत्र असले तरी यशाचे मापन करण्याची एकच स्केल आहे. ती म्हणजे विक्रीत वाढ आणि नफ्यात वाढ यासाठी राष्ट्रीय बाजारपेठे सोबतच जागतिक बाजारपेठ काबीज करणे गरजेचे आहे. सेवा क्षेत्रात रोजगाराच्या संधी अमाप आहेत. आपण त्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य आत्मसात करण्यांची गरज आहे.

## संदर्भ

(१) Taxing Service - Issues & Strategy M. Govind Rao- EPW Oct 2001
(२) अर्थसंवाद त्रैमासिक - एप्रिल जून २००२



Scanned by CamScanner

# EMPLOYMENT OPPORTUNITIES UNDER THE SERVICE TAX SCHEME

**B.B. KALPANDE**
G.S. College of Commerce &
Economices, Nagpur

## Concept of Service-Tax

Service-Tax is a new concept in India intoroduced from financial year 1994-95. Since it is a new tax, there may be certain confusions and non-clarity on the concept and procedural aspect of Service-Tax is applicable to as many as eithteen types of assesses. This could be explosive. After a long dalay the Government of India has levied Service Tax.

With rationalization of tax rates on goods and trust of imposition of tax on goods and services as recommended was made in 1994 to intorduce tax on services. While commending the finance Bill of 1994 to the Parliament, Dr. Manmohan Singh, the finance Minister has observed.

The term Service Tax means the act of helping or soing work for another or for a community, etc. so it stands for assistance on benefit given to someone, through ordinarily for rendering such service is the renuneration of the person rendering such service.

The service Tax is therefore levied on portion of the remuneration which a person is getting exchange of service rendered.

The finance act, 1994 has brought out the legislation for levy of Service Tax. The ultimate intention is to integrate Service Tax with tax on commodity i.e. value added Tax and popularly called "VAT".

## NEED FOR TAXATION OF SERVICES

In any welfare state, it is the prime resonsibility of the Government of fulfill the increasing development needs of the country and its people, by way of public expenditure of India, being obligatiions of a welfare state within its limited resources. The Governments primary sources of revenue are direct and indirect taxes. Central Excise Duty on the goods manufactured and produced in India and customs duties on imported goods constitute the two major sources of and customes duties on imported goods constitute the two major sources of indirect taxes in India. But revenue receipts from coustoms and excise duties are on the decline due to WTO commitments and rationalization of commodity duties.

The service sector has becomes a major contributor to GDP of India. Service sector contirutes about 50% of GDP in our economy which agriculture accounts for 27% and manufacturing revenue potential with that in mind the present

Scanned by CamScanner

Prime Minister Dr. Manmohan Singh and the ex.- Union Finance Minister, in his Budget speech for the year 1994-95 introduced the concept of service tax and stated that "there is no sound reason for exempting services from taxation. Therefore, I propose to maka a modest effort in this direction by imposing a tax on service of Telephone, non-live Insurance and Stock-brokers. At present, total number of service on which Service Tax is livied has gone upto 58 withdrawal of certain services from the tax net and full exemption to 5 services. The rate of service too been enhanced to 8% (w.e.f. 14.5.2003) from 5% Target of Rs. 8000 Corers service tax collection for financial year 2003 has been set.

One milestone, which service tax, has achived on the eve of the very first day of year 2004, it has become the first "E-Tax" of the country.

**scope of service-Tax:** Central Sale-Tax, Central excise and customs law Besides there are some other indirect taxes, which are brifly discussed here.

Service-Tax : This is a new tax levied in finance at 1994. Service sector contributes over 40% of "GDP" in our economy. A beginning has been made by levying 5% service tax w.e.f. 1st July 1994 on "Taxable Service". These are (a) Brokerage charges by stockbroker or sub-broker registered with (on applied for registration with) SEBI,(b) Cross telephone Bills,(c) Insurance premium in respect of General Insurance (i.e. insurance other life insurance). This tax will be administered by Central Excise Department. Tax is payble monthly Quarterly return has to be furnished. Appeal provisions will be similar to Central Excise.

Other service are as under. : i.e. Courier service, Advertising service, Radio page service, Customs House agents service; Clearing and forwarding agent service Man-power Recruitment agency services; Goods transport operator's service, beauty parlor services etc.

## EMPLOYMENT OPPERTUNITIES UNDER THE SERVICE-TAX SCHEME :

Unemployment is the major problems that out Govt. is facing today. It is not possible to absorb vast number of teeming unemployed in the economy. Increasing number of schools, college and Universities has made the problem disquieting. Our govt. has started many Employment programme and agencies to tackle the problem of unemployment.

The imposition of service tax has created employment opportunities for Educated unemployed such as B.Com, B.Sc. etc They can help the taxpayers in registration, filing service tax returns etc.

Books Reference : Service and indirect taxes - Dr. V.K. Jain,
Tax-Man Edition 2001 and recent Hitwad News Paper



Scanned by CamScanner

# क.

# मूल्यवर्धित कराचा सिद्धांत
## सहभाग

## सहभाग

- डॉ. अरूणा सोनेगांवकर
- प्रा. प्रदिप नवघरे
- प्रा. संजय पी गायकवाड
- डॉ. माधुरी प्र. लेले
- प्रा. दत्तात्रय सोनेगांवकर



Scanned by CamScanner

# मुल्यवर्धित कराचा सिद्धांत

डॉ. अरुणा सोनेगांवकर
व्ही. एम. व्ही. कॉमर्स कॉलेज, नागपूर

**प्रस्तावना**

सन १९९१ हे वर्ष अर्थशास्त्राचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक भारतीयाच्या मनावर एका आगळ्या वेगळ्या वैशिष्ठ्याने ठसा उमटवणारे वर्ष आहे. यावर्षी भारताने जागतिकीकरणाचे धोरण स्विकारले आणि देशाच्या सीमा जगाला मोकळ्या करून देत असतांनाच भारतही उड्डाणावस्थेत असल्याचा इशारा जगाला दिला. यानंरचे दशक आणि २००१ ते २००४ हा कालावधी देशाचा हा निर्णय योग्य होता हेच स्पष्ट करतो. आज भारताला संपूर्ण जग आणि संपूर्ण जगाला भारत आपली बाजारपेठ वाटत आहे. या बाजारपेठेत भारताला आपली कर्तूत्वशक्ती दाखविण्याची संधी चालून आली आहे. तेंव्हा आता मागे वळणे नाही.

१ एप्रिल २००५ हा दिवस, महिना आणि वर्ष यापुढे असेच सर्वांच्या स्मरणात राहणार आहे. कारण यादिवशी भारताच्या आर्थिक नीतीत आमुलाग्र बदल होऊ घातला आहे. १९९१ साली भारताने जे जागतिकीकरणाचे धोरण स्विकारले त्याला यशस्वीरित्या तोंड देण्यासाठी तसेच भारतीय अर्थव्यवस्थेची आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी मूल्यवर्धित कर प्रणालीचा स्विकार भारत करणार आहे. परिणामस्वरूप

**(१) मूल्यवर्धित कर प्रणाली म्हणजे काय ?**

**(२) मूल्यवर्धित कर प्रणाली देश कां स्विकारणार आहे ?**

**(३) या कर प्रणालीमुळे जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवथेवर होणारे दूरगामी व प्रतिकूल परिणाम खरोखरच नाहीसे होतील कां ?**

**(४) भारता सारख्या संघीय वित्त पद्धती असणाऱ्या विकसनशील देशात मूल्यवर्धीत कर प्रणाली शस्वी होईल कां ?**

**(५) मूल्यवर्धित कर प्रणाली यशस्वी होण्याकरिता कोणते उपाय योजले पाहिजेत.**

**हे प्रश्न सर्वसामान्य अभ्यासकाच्या मनात निश्चितपणे खळबळ माजवित आहेत. प्रस्तुत निबंध हा या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा एक प्रयत्न आहे.**

**१. आर्थिक नीतीचा आधार - करपद्धती**

आदर्श कर पद्धती म्हणजे अशी कर पद्धती ज्या पद्धतीत समता आहे, निश्चितता आहे, सर्वांची सोय आहे, सर्वोच्य काटकसर साधण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जी करपद्धती उत्पादकता वाढवते, जी लवचीक

Scanned by CamScanner

आहे, जिच्यात विविधता आहे, जी सोपी आहे, जी अत्यंत उपयुक्त आहे, ज्या पद्धतीत प्रत्येक बाबीचा योग्य समन्वय आहे, जिला लोकांचा विरोध नाही असे असूनही जी मोठे उत्पन्न मिळवून देणारी आहे, ज्या पद्धतीत राजकीय हस्तक्षेपाला वाव नाही जी महत्तम सामाजिक लाभ मिळवून देते, जी करभाराचे न्याय्य वाटप घडवून आणणारी आहे. व्यापक समतोल व विभाजनावर अनुकूल परिणाम घडवून आणण्याची क्षमता ज्या करपद्धतीत आहे. ति आदर्श कर पद्धती होय'' आदर्श कर पद्धतीची ही उपरोक्त व्याख्या, देशातील कर पद्धती त्या देशातील आर्थिक नीतीचा आधार असल्याचे स्पष्ट करते. अर्थात अशी आदर्श कर पद्धती असावी अशी जरी अपेक्षा असली तरी, ती, प्रत्यक्षात त्याप्रमाणे आजतरी कोणत्याही देशात नाही. प्रत्येक कर पद्धतीचे स्वत:चे असे स्वतंत्र फायदे तोटे आहेत. प्रत्येक देशाचे आर्थिक धोरण हे वेगवेगळे आहे. प्रत्येक देशाची प्राथमिकता वेगळी आहे. आर्थिक व सामाजिक परिस्थिती वेगवेगळी आहे. स्वातंत्र्याच्या वेळची भारताची आर्थिक व समाजिक स्थिती आणि आजची आर्थिक व सामाजिक स्थिती यात खूप फरक पडलेला आहे. स्वाभाविकच कर पद्धतीत बदल ही आज काळाची गरज आहे. खालील तक्त्यात आजवरच्या भारतीय कर पद्धतीचा आधार स्पष्ट करण्यात आला आहे.

**भारतीय कर पद्धतीचा आधार व्यक्ती आणि वस्तुंच्या बाबतीत.**

| अ.क्र. | व्यक्तीची संख्या | गट प्रकार (क्षमतेनुसार) | शेकडा कर भार (आयकर) | वस्तुंची संख्या | गट प्रकार (उपयोगितेनुसार) | शेकडा करभार (विक्रीकर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | मजूर | शून्य | ४ | जीवनावश्यक | शुन्य |
| २ | १ | अर्धकुशल | २ | १ | सुखदायव व जीवनावश्यक | २ |
| ३ | १ | कुशल | ३ | १ | सुखदायक | ३ |
| ४ | १ | क.लिपिक | ७ | १ | सुखदायक व प्रतिष्ठा | ७ |
| ५ | १ | वशिष्ठ लिपिक | १२ | १ | प्रतिष्ठा | १२ |
| ६ | १ | पर्यवेक्षक | १८ | १ | प्रतिष्ठा व चैन | १८ |
| ७ | १ | व्यवस्थापक | ५८ | १ | चैनीच्या | ५८ |
| एकूण | १० | एकूण कर | १०० | एकूण १० | एकूण कर | १०० |

स्त्रोत - अनुभव व विविध स्त्रोताद्वारे संकलित आकडेवारीच्या आधारे सादरीकृत

भारताच्या आर्थिक नीतिची रचना करतांना कर आकारणीत आजपर्यंत कर सवलतीच्या रचनेचा मोठा हिस्सा दिसू येतो. उपरोक्त तक्त्यानुसार ही बाब जास्त स्पष्ट होते. आयकरातून ४० टक्के असलेल्या, मजूर गटातील लोकांना पूर्णपणे सूट, १० टक्के असलेल्या अर्धकुशल गटातील लोकांना केवळ २ टक्के, १० टक्के असलेल्या कुशल गटातील लोकांना ३ टक्के आणखी १० टक्के असलेल्या क. लिपिक गटातील लोकांना ७ टक्के याप्रमाणे ७० टक्के लोकांकडून केवळ १२ टक्के कर वसुली केली जाते तर उरलेल्या ३० टक्के व्यक्तींकडून ८८ टक्के कर गोळा करण्यात येतो.

Scanned by CamScanner

या कर पद्धतीत थोडासा बदल करून पूर्णपणे सुट प्राप्त १० टक्के लोकांवर अल्पप्रमाणात कर आकारावा व कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलत द्यावी असा निर्णय घेण्यात आला तर पुढील परिणाम दिसून येईल. अर्धकुशल श्रेणीतील लोकांना २०पैशाचा, कुशल श्रेणीतील लोकांना ३० पैशाचा, कनिष्ठ लिपिक श्रेणीतील लोकांना ७० पैशाचा वरिष्ठ श्रेणीतील लिपिकांना १.२० रूपयाचा पर्यवेक्षकांना १.८० रूपयाचा व व्यवस्थापक श्रेणीतील व्यक्तींना ५.८० टक्के रूपये इतका फायदा होईल.

समाजाची या करपद्धतीतील बदलावर पहिली प्रतिक्रीया हीच राहील की ही कर सवलत श्रीमंताच्या फायद्याची आहे कारण की त्यांची जास्त बचत झाली आहे. आम्हाला केवळ २० पैसे तर श्रीमंतांना ५.८० रू. लाभ झाला आहे. आमचा याला विरोध आहे ही कर सवलत अन्यायाची आहे. वास्तविक पाहता सगळ्यांचाच १० टक्के फायदा झाला आहे पण लक्षात कोण घेतो ? जी गोष्ट आयकराची तीच विक्री कराची हे लक्षात घेता भारतात करप्रणालीत बदल कितपत खळबळ माजवू शकतो याची कल्पना येते. येऊ घातलेली मूल्यवर्धित कर प्रणाली ही त्यामुळेच भारतीय जनमानसात खळबळ माजविणारी ठरली आहे तेंव्हा ती नेमकी कशी आहे याचा प्रथम विचार करू.

## २. मूल्यवर्धित कर प्रणाली

१. मूल्यवर्धित कर हा अप्रत्यक्ष कर आहे. २. हा कर वस्तुच्या मूल्यवर्धनावर आकारला जातो. ३. ज्या टप्प्यात वस्तुच्या मूल्यात वाढ होते त्या टप्प्यावर हा कर बसवला जातो. ४. मूल्यवर्धित कर हा निर्यात व सरकारी सेवा वगळून सर्व प्रकारच्या वस्तु व सेवावरील कर होय. ५. हा कर वस्तुच्या उत्पादनापासून ते किरकोळ विक्रीच्या टप्प्यापर्यंत वाढलेल्या वस्तु व सेवांच्या मूल्यावर बसविला जातो. ६. मूल्यवर्धित कर हा सर्वसाधारण उपभोग कर आहे. ७. उद्योजकाने उत्पादन व विभाजनाच्या प्रत्येक अवस्थेमधे वस्तु व सेवांच्या मूल्यात जी वाढ केलेली असते त्या मूल्यवाढीवर बसवलेला हा कर आहे.

मूल्यवर्धित कर आकारणी याकरीता **पुढील दोन सुत्रांचा वापर केला जातो.**

**१. मूल्यवर्धित कराची एकूण रक्कम = एकूण विक्रीकर - एकूण खरेदीकर**

**२. मूल्यवर्धित कराची आकारणी केलेली वस्तुची किंमत = वस्तुची विक्रीची एकूण किंमत - वस्तुच्या खरेदीची एकूण किंमत**

**मूल्यवर्धित कराचा दर १०% आहे असे गृहित धरून आकडेवारीचे सादरीकरण**

| पद. | कापूस | सूत | कापड | कपडे |
|---|---|---|---|---|
| विक्री किंमत | १०० | २५० | ३५० | ६०० |
| मूल्यवर्धित कर | १० | २५ | ३५ | ६० |
| मूल्य वाढ | ० | १५० | १०० | २५० |
| प्रत्यक्ष कर वसूली | १० | १५ | १० | २५ |

Scanned by CamScanner

६०० रू. किमतीच्या वस्तूवर एकूण कर ६० रूपये घेतला जाईल परंतू तो टप्प्याटप्याने वसूल होईल अनुक्रमे १०,१५,१० व २५ रूपये याप्रमाणे एकूण ६० रू. कापसावर १० रूपये, सुता वर २५ रू. वजा परतावा १० रूपये = १५ रूपये, कापडावर ३५ रूपये वजा परतावा २५ रूपये = १० रूपये, तयार कपड्यावर ६० रूपये वजा परतावा ३५ रूपये = २५ रूपये या प्रमाणे कर वसुली होईल.

**वैशिष्टे**

(१) मुल्यवर्धित कर हा विक्रीकर, उत्पादन कर अथवा उलाढाल कराला पर्यायी कर म्हणून वापरला जातो. (२) मूल्यवर्धित करामुळे करावर कर घेतले जात नाही (३)मूल्यवर्धित करामुळे कराची पुनरावृती टळते. (४) या कराचा दर सर्वत्र सारखा असतो. (५) हा बहूबिंदू कर आहे (Multi Point) (६) हा सर्वसाधारण उपभोगावर घेतला जात असल्यामुळे त्याचा अंतीम बोझा उपभोक्त्यावर पडतो. (७) मूल्यवर्धितकर एकूण व्यवहाराच्या संख्येशी तटस्थ असतो. व्यवहार संख्येवर हा कर आधारित नाही. (८) कराची रचना साधी सोपी व पारदर्शी आहे. (९) देशाच्या निर्यातीला चालना देणारा हा कर आहे. (१०) निर्यात वस्तुंची आंतरराष्ट्रीय बाजारात स्पर्धात्मक वाढीला चालना देणारा हा कर आहे. (११) एका विशिष्ठ मर्यादेपेक्षा कमी व्यवहार असणाऱ्या लहान व्यापारी, उद्योजक व व्यावसायिकांना या करातून सूट दिली जाते.

**मूल्यवर्धि कराचे चार प्रकार आहेत.**

**(१) उत्पादक मूल्यवर्धि कर (२) उपभोग मूल्यवर्धि कर**

**(३) वेतन मूल्यवर्धि कर (४) उत्पन्न मूल्यवर्धि कर**

**१. उत्पादक मूल्यवर्धि कर**

उत्पादन मुल्यवर्धि कराचा पाया देशाच्या स्थुल राष्ट्रीय उत्पन्ना येवढा असतो हा प्रकार देशाच्या **आर्थिक विकासाला पोषक नसल्यामुळे लोकप्रिय नाही.** उत्पादन मूल्यवर्धीत करात आदानांचा पूर्ण परतावा वजा केला जात नाही तर फक्त बिगर भांडवली वस्तुंचे मूल्य वजा केले जाते. भांडवली वस्तुंचा घसारा वजा केला जात नाही. भांडवली वस्तुमुळें वस्तुच्या मूल्यात जी वाढ होते त्यावर कर आकारला जातो.

**२.उपभोग मूल्यवर्धित कर**

उपभोग मूल्यवर्धित कराचा पाया **वेतन+नफा+घसारा-गुंतवणूक** असा गृहित धरला जातो. **स्थुल राष्ट्रीय उत्पादन - गुंतवणूक = करपात्र राशी** असे सुत्र वापरले जाते. म्हणजे हा कर फक्त अर्थव्यवस्थेतील उपभोगावर लावला जातो. सर्व युरोपीय देशात या सुत्राचा वापर करून कर आकारणी केली जाते.

**३. वेतन मूल्यवर्धित कर**

भांडवलापासून व्याज व नफ्याच्या स्वरूपात उत्पन्न मिळते वेतन मूल्यवर्धित कर आकारतांना भांडवलाचा खर्च, नफा व व्याज निव्वळ उत्पन्नातून वजा करून जे उत्पन्न शिल्लक राहते त्यावर कर बसवला जातो. शिल्लक राहिलेले उत्पन्न हे वेतना येवढे असते म्हणून या करप्रकाराला वेतन मूल्यवर्धित कर असे म्हणतात.

Scanned by CamScanner

### ४. उत्पन्न मूल्यवर्धित कर

उत्पन्न मूल्यवर्धित करात एकूण उत्पन्नातून बिगर भांडवली वस्तू (आदाने) खरेदीची पूर्ण किंमत व भांडवलाचा घसारा वजा करण्याची तरतुद असते. पुढील वर्षी किंवा विशिष्ट काळानंतर घसारा वजा करण्यास परवानगी असते. याचे सूत्र पुढील प्रमाणे आहे.

**उत्पन्न मूल्यवर्धित कर = उद्योग संस्थांचे उत्पन्न - वस्तुंची पूर्ण किंमत - भांडवली वस्तुंचा घसारा**

हा कर वस्तुच्या मूल्यातील योग्य वाढ दर्शवितो. भारतात ह्या करपद्धतीचा वापर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाट आहे १ एपिल २००५ ची.

**भारताने मूल्यवर्धित कर प्रणाली कां स्विकारली यामागील कारणे**

१. ही साधी व सोपी पद्धती आहे.

२. कराचे दर हे मूल्यावर आधारित आहे. त्यामुळे मूल्यात जेवढी वाढ होईल तेवढया प्रमाणात कर वाढ होईल. यामुळे करदाते व प्रशासन दोघांनाही सोपी असलेली पद्धत आहे.

३. या करपद्धतीमुळे संपूर्ण देशाच्या कर रचनेत एकसूत्रता येते.

४. मूल्यवर्धित करामुळे एकाच वस्तुवर पुन्हा पुन्हा कर घेतले जात नाही.

५. विक्रीकर, सेवाकर, उत्पादन कर आकारण्याची मूल्यवर्धीकरामुळे आवश्यकता नाही.

६. वस्तुंच्या खरेदीवर भरलेला कराचा परतावा मिळतो त्यामुळे वस्तुंची किंमत कमी राहते व भाववाढ टळते.

७. मूल्यवर्धित कर प्रणालीमुळे कर चुकवेगीरीला आळा घालता येतो.

८. मूल्यवर्धित कराचा पाया व्यापक व रूंद आहे. या कराच्या कक्षेत अनेक व्यक्ती येतात व सर्व वस्तुंवर हा कर लावला जातो.

९. मूल्यवर्धित करामुळे सरकारच्या कर महसूलात मोठ्या प्रमाणांत वाढ होते. सर्व वस्तु व सेवा या कराच्या जाळ्यात येतात.

१०. हा कर अनेक बिंदूकर असलातरी तो एकत्रित घेतला जात नाही त्यामुळे विविध प्रकारची सूट देण्याची आवश्यकता नाही.

११. या करपद्धतीच्या वापरामुळे उत्पादक उत्पादन साधनांची काटकसर करतात. उत्पादन साधने कार्यक्षमतेने वापरली जातात त्यामुळे अनावश्यक खर्च कमी होतो परिणामतः किंमती कमी होतात.

१२. हा कर निर्यात वस्तुंवर बसविला जात नाही. तो आयातीवर बसवला जातो. परिणामतः देशाची निर्यात स्पर्धात्मक होऊन अंतरराष्ट्रीय बाजारात वस्तुंच्या किंमती कमी राहतात.

..............................

Scanned by CamScanner

१३. या करामुळे सर्वांसाठी समान कायदा व समान बाजार व्यवस्था निर्माण होईल.

१४. या करामुळे ग्राहकांना वस्तुवर किती कर घेतला जातो हे माहित होईल व वस्तुंची किंमत देखील किती राहील याची कल्पना येईल.

१५. या करामुळे आंतरराज्य व्यापारातील अडथळे दूर होऊन आंतरराज्यीय व्यापार वाढेल.

१६. या कर पद्धतीमुळे अप्रत्यक्षपणे अर्थव्यवस्थेच्या अद्ययावत व्यवहारांची माहिती तयार होते.

१७. या करप्रणाली मुळे जागतिकीकरणाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे दूरगामी व प्रतिकूल परिणाम या सर्व कारणांमुळे नाहींसे होती. भारतात मूल्यवर्धित कर प्रणालीचा स्विकार नजीकच्या काळात होणार आहे.

**खरोखरच असे होईल कां?**

मूल्यवर्धित कर प्रणाली ही अविकसित देशाकरीता निश्चितच योग्य नाही. कारण याकरीता व्यापारी व उद्योजकांना आपल्या सर्व खरेदी व विक्रीच्या अद्ययावत नोंदी ठेवाव्या लागतात. त्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. प्रशासनाला देखील कर वसुलीकरीता मोठी यंत्रणा उभारावी लागते. कर कायद्याची माहिती देणारे शिक्षण व प्रशिक्षण यावर मोठा खर्च करावा लागतो. या पद्धतीनुसार गरीब असो वा श्रीमंत सगळ्यांना सारखाच कर द्यावा लागतो. ही पद्धत यशस्वी होण्याकरिता करदात्यांकडून मोठ्या सहकार्याची आवश्यकता असते. प्रत्येक करदात्याला स्वतःची करदेयता शोधून काढून त्यानुसार कर भरावा लागतो. उत्पन्न व संपत्तीची विषमता असलेल्या देशात ही कर पद्धती यशस्वी होत नाही असा अनुभव आहे. भारत हा विकसित देशाच्या उंबरठ्यावर आहे परंतू तो फक्त शहरांच्याय बाबतीत. ग्रामीण भारत हा अजूनही अविकसित आहे त्यामुळे शहरातील व्यापार व्यवस्थेकरीता ही कर प्रणाली एकवेळेस लाभदायक राहील मात्र ग्रामीण व्यापार व्यवस्थेला याची निश्चितच झळ पोहचणार आहे. त्यावर कसे नियंत्रण राहील हे अजूनही स्पष्ट झालेले नाही.

भारतात कर रचनेत बदल करणे आवश्यक झाले आहे. हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे. कर रचनेतील छोटासाही बदल भारतीयांच्या पोटात गोळा उठवतो हेही सत्य आहे. तरीही बदलणाऱ्या कर पद्धतीचे स्वागत करण्याशिवाय पर्याय नाही. हा बदल हसत हसत आव्हान म्हणून स्विकारायचा की रडत रडत हे ज्याचे त्याने ठरवायचे आहे मात्र त्यापूर्वी प्रत्येकाने देशाच्या आर्थिक स्थितीबद्दल थोडासा अभ्यास करावा. त्यावर विचार करावा हाच प्रस्तुत निबंधाचा प्रमुख उद्देश आहे. यादृष्टिने पुढील आकडेवारी सादर केली आहे.

१. १९५०-५१ साली भारताचे महसुली उत्पन्न ४०६ **कोटी** रूपये होते व महसुली खर्च हा **३४७ कोटी** रूपयाचा होता. अर्थात **५९ कोटीची** बचत होती. १९८०-८१ पासून महसुली तुट सुरू झाली जी २००३ साली (उत्पन्न २४५१०५ तर खर्च ३४०४८२ कोटी रूपये म्हणजेच) **९५३७७ कोटी** रूपयाची होती. ही तूट २००३-२००४ मधे **११२२९२ कोटी** रूपयापर्यंत



Scanned by CamScanner

वाढली आहे.

२. २००२-२००३ साली कर उत्पन्नाचे देशांतर्गत उत्पन्नाशी असलेले प्रमाण ९.६ टक्के आहे. यात प्रत्यक्ष कराद्वारे ३९ टक्के तर अप्रत्यक्ष कराद्वारे ६० टक्के उत्पन्नाचा समावेश आहे.

३. २०००-०१ च्या अंदाजपत्रकानुसार स्थुल देशांतर्गत उत्पादनाशी कर महसुलाचे प्रमाण १६ टक्के होते.

४. केंद्रसरकारच्या एकूण कर उत्पन्नातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कराचे **गुणोत्तर** २००२-०३ या काळात ३९.६१ असे होते.

५. राज्य सरकारांचे उत्पन्न व खर्च विचारात घेता २००१-०२ या काळात **४८०५०** कोटी रूपयांची तूट दिसून येते.

६. २००१-०२ या वर्षी राज्य सरकारांच्या उत्पन्नातील विक्रीकर व उत्पादन कराचा वाटा अनुक्रमे **६१ टक्के व १३ टक्के** इतका होता.

७. २००३-०४ यावर्षी केंद्र व राज्य सरकारांची राजवित्तीय तूट २,३६,१४६ कोटी रूपये, महसुली तूट १,४८,१८७ कोटी रूपये व प्राथमिक तूट ४०७९९ कोटी रूपये तर सार्वजनिक कर्जाची राशी २५,७१,४६४ कोटी रूपये इतकी आहे.

८. २००२-०३ यावर्षी कर चुकवेगिरीच्या ४९०२ घटनांची नोंद आहे तर जप्त केलेल्या मालमत्तेचे मूल्य ५१५.८७ कोटी रू. आहे.

९. २००२-०३ यावर्षी करचुकवून आणलेल्या वस्तुंच्या एकूण ८०९ घटना घडलेल्या असून जप्त केलेल्या वस्तुंचे मूल्य ४६९ कोटी रू. आहे.

१०. २००१ या वर्षी प्रसिद्ध झालेल्या आकडेवारी नुसार भारताची व्यापारी तूट २,५६,०१८ कोटी रूपये असून विदेशी व्यवहार तोल - ६९४३४ कोटी रूपयाचा आहे.

११. भारतात जीवनावश्यक वस्तु वर **शुन्य टक्के**, दैनंदिन वापरातील जीवनावश्यक वस्तु व औद्योगिक वस्तुवर ४% तर बहुसंख्य वस्तुवर १२.५% व चैनीच्या वस्तुवर २०%, सोने चांदी रत्ने यासारख्या वस्तुवर १% मूल्यवर्धित कराचा दर प्रस्तावित आहे.

१२. बहुसंख्य वस्तुंवर १२.५% दर प्रस्तावित असतांना या वस्तुंवरील कराचा प्रचलित दर मात्र ८% आहे त्यामुळे या वस्तुंवरील करात ५०% पेक्षा जास्त वाढ होणार आहे.

१३. सरकारचा अंदाज असा आहे की सुरवातीच्या काळात काही राज्यांना याचा फायदा तर काही राज्यांना नुकसान होण्याची शक्यता आहे. ज्या राज्यांचे नुकसान होईल त्यांना केंद्रसरकार पहिल्या वर्षी **१०० टक्के**, दुसऱ्या वर्षी **७५ टक्के** व तिसऱ्या वर्षी **५० टक्के** भरपाई देईल.

१४. मूल्यवर्धित कायद्याच्या कलम -६१नुसार ज्या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल ४० लक्ष रूपयापेक्षा जास्त आहे त्यांनी आपल्या जमा खर्चाचे ऑडीट सी.ए. कडून करून घेणे बंधनकारक



Scanned by CamScanner

आहे. अन्यथा एकूणव्यवहाराच्या १० टक्के किंवा १ लाख रूपये यापैकी कमी रकमेवर दंड केला जाईल.

उपरोक्त आकडेवारीचा अभ्यास केल्यास हा निष्कर्ष निघतो की, सरकारी उत्पन्न वाढीकरता कर पद्धतीत बदल आवश्यक होता तो तसा होतो आहे. मूल्यवर्धित कर प्रणालीनुसार यापुढे कर द्यावे लागणार हे निश्चित आहे. ही कर पद्धती सुरवातीच्या काळात कांही राज्यांना लाभदायक तर काही राज्यांना नुकसान कारक राहणार आहे. सुरवातीचे **३ वर्ष** अनुक्रमे **१००%, ७५%** आणि **५०%** भरपाईचे आश्वासन केंद्र सरकारने दिले आहे. नुकसान किती झाले हे राज्य सरकार ठरविणार आहे. परंतू हे ठरविणे येवढे सोपे नाही. याकरीता तज्ञ व्यक्तींची गरज आहे. चहा कॉफी सारख्या दैनंदिन गरजेच्या वस्तु आता महाग होणार आहे. प्रत्येक राज्याचा कराचा दर हा वेगवेगळ्या वस्तुवर वेगवेगळा राहण्याची शक्यता आहे तो तसा रहावयास नको. सर्व राज्यात एकच दर असणे लाभदायक आहे परंतू प्रत्येक राज्याची प्राथमिकता वेगळी आहे. त्यामुळे एकच दर असणे शक्य दिसत नाही. हा कायदा सर्वच राज्यात एकाच वेळी लागू होणे गरजेचे आहे. परंतू तशी ही शक्यता दिसत नाही. कर नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास कडक शिक्षा आहे त्यामुळे व्यापारी वर्ग चिंताग्रस्त आहे. सरकारी अधिकाऱ्यात भ्रष्टाचार वाढीस लागण्याची शक्यता आहे. सुरवातीला जरी सरकारी उत्पन्नात फारशी वाढ झाली नाही तरी नजीकच्या काळात अशी वाढ निश्चितपणे संभवते. शेवटी कोणत्याही योजनेचे यशापयश लोकांवर अवलंबुन आहे. सर्वच प्रामाणिक राहीले तरच अपेक्षित यश मिळू शकते. आज सर्वच अंदाज आहेत त्यामुळे ३ वर्षानंतर आढावा घेऊन कर दरात उचित परिवर्तन घडवून आणू असे ठोस आश्वासन सरकारकडून जनतेला हवे आहे. शेवटी हाही एक प्रयोग आहे. तो यशस्वी होओ ! येवढीच शुभेच्छा देणे आपल्या हाती आहे.

## संदर्भ


१. डॉ. मधूकर शिंदे - ''मूल्यवर्धित कर प्रणाली आणि भारतीय अर्थव्यवस्था''

२. अलक घोष - इंडीयन इकॉनॉमी ऑगस्ट - २००४

३. एच.एल. भाटीया - पब्लिक फायनान्स

४. इकॉनॉमिक टाईम्स - जुन ते ऑगस्ट २००४

५. इकॉनॉमिक सर्व्हे - २००२-२००३

६. महाराष्ट्र राज्याची आर्थिक पाहणी - सांख्यीकीय विभाग

७. ॲडमस्मिथ, बॅस्टल, फिन्डले शिरास, डॉ. बी. पी. त्यागी- पब्लिक फायनान्स.




Scanned by CamScanner

# VAT (Value Added Tax)

**PRADEEP NAVGHARE**
Dept. of Comnmerce & Economics,
Hislop College, Nagpur

## Background

Indirect tax reforms have been an integral part of the liberalisation process since 1991. In the first phase, India has been steadily attempting to move towards a tax structure which is simple, moderate, rational and easy to administer and comply with. At the central level, the move has been to bring down the tariffs - both excise and customs, reduce the number of rates, correct anomalies, get rid of the complexities in the system and on the whole reduce the interface with the government. Reforms at centre level were smooth and brought in mainly through annual budget presentation in the parliament and are applicable through out the country.

In addition to indirect taxes levied by the centre, states are empowered to levy certain indirect taxes and sales tax forms major part of revenue for almost all states. There was wide variation in sales tax rates of the same commodity in different states. In many states both inputs as well as outputs are taxed creating cascading effect. The viable solution found was to shift to destination based VAT i.e. value added tax.

More than 120 countries have adopted VAT as their major form of consumption Tax. India's neighboring countries Bangladesh, China, Nepal, Pakistan and SriLanka are already having value added tax.

There are three methods for computation of VAT viz (i) Addition Method, (ii) Subtraction method and (iii) Tax Credit Method. India has decided to adopt the most common Tax Credit Method which entails set off for tax paid on inputs from the tax collected on sales for each tax period. This method is similar to CENVAT in case of Central Excise.

Industry was expecting unification of all taxes levied within the state on sale/ movement of goods and tax on services under VAT. However this is not happening and VAT is going to replace mainly local sales tax. Therefore cascading effect due to CST, octroi etc. will continue. It would be worthwhile to recollect what has happened and achieved so far to Introduce value added tax in India.

Union Finance Minister convened a conference of all state Chief Ministers



Scanned by CamScanner

on 16th November 1999 and decided on the following course of domestic tax reforms :

(a) Implementation of floor rates of sales tax by all states and union territories and discontinuation of grant of sales tax based incentives from 1st January 2000.

(b) Implementation of VAT from 1st April 2001 which was first extended to 1st April 2002 and again postponed to 1st April 2003.

- Empowered Committee comprising of nine state Finance Ministers was constituted on 17th July 2000 to monitor the decisions taken in Chief Ministers conference.

- Empowered Committee decided to retionalise the future rate structure under VAT to 5 rates i.e. :

NIL for certain goods
1% for gold, silver and precious stones.
4% for certain essential goods and industrial inputs
20% for liquor and some petroleum products, and
a revenue neutral rate (RNR) of 10 to 12.5% for other goods. Subsequent decision taken in February, 2003 is that all states should adopt a uniform RNR rate of 12.5%.

## A brief on VAT (Value Added Tax)

## What is VAT ?

VAT is a multistage tax levied at each stage of the value addintion chain, with a provision to allow input tax credit (ITC) on tax paid at an earlier stage, which can be appropriated against the VAT liability on subsequent sale.

VAT is intended to tax every stage of sale where some value is added to raw materials, but taxpayers will receive credit for tax already paid on procurement stages. Thus, VAT will be without the problem of double taxation as prevalent in the present tax laws.

One of the many reasons underlying the shift to VAT is to do away with the distortions in our existing tax structure that carve up the country into a large number of small markets rather than one big common market. In the present sales tax structure tax is not levied on all the stages of value addition or sales and distribution channel which means the margins of distributors/retailers etal are not subject to sales tax at present.
Thus, the present pricing structure needs to factor only the single-point levy com-



Scanned by CamScanner

ponent of sales tax and the margins of manufacturers and dealers/retailers etc. are worked out accordingly.

Under the VAT regime, due to multi-point levy on the price including value additions at each and every resale, the margins of either the re-seller or the manufacturer would be reduced unless the ultimate price is increased.

**Implementation status : States To Introduce VAT w.e.f. April 1,2003**

The States have reiterated their commitment to introduce Value Added Tax (VAT) from April 1,2003, after the Centre agreed to compensate them for any revenue loss due to the introduction of this new taxation measure by up to 100 percent.

The states, on their part, have decided that all their VAT legislation would have common provisions in respect of all important matters and a simple VAT law will replace the existing plethora of State laws such as those on sales tax, turnover tax, purchase tax, entry tax and the like.

The VAT by the States would have two basic rates of 10 percent and 12.5 percent, which would be revenue natural rates for most items. The two basic rates have been selected so that States, which have lower sales tax rates, could raise it to 10 percent while those levying higher rates of 17-18 percent would have to lower them to 12.5 percent. Overtime, the VAT rates would be merged into one uniform rate. It has also been decided to phase out Central State Tax (CST) within three years with the introduction of VAT as this causes distortions in internal trade and impeded development of a common market.

**Problems with present sales tax system :**

At present the sales tax is levied on the gross value without allowing any credit or setoff for the taxes paid on inputs (i.e. tax is levied on gross value). Consequently, it tends to create the phenomenon of cascading resulting in increased consumer prices by an amount higher than what accrues to the exchequer by way of revenues from it. Also, there is the problem of multiplicity of rates. All the states, provide for plethora of rates. These range from one to 25 percent. This multiplicity of rates increases the cost of compliance while not really benefiting revenue. Heterogeneity prevails in the structure of tax as well. Apart from general sales tax, most states levy an additional sales tax or a surcharge. In addition, the states levy luxury tax as also an entry tax on the sale of imported goods.

All these practices of heterogeneity in structure as well as rates cause diversion of



Scanned by CamScanner

trade as well as shifting of manufacturing activity from one state to another. Further, widespread taxation of inputs relates to vertical integration of firms, i.e., the existing system of taxes militates against ancillary industries and encourages them to produce more and more of the inputs needed rather than purchase them from ancillary industries.

The existing system of commodity taxes is non-neutral. It interferes with the producer's choice of inputs as well as with the consumers's choice of consumption, thereby leading to severe economic distortions.

**How can VAT address these issues :**

VAT would not cause cascading, nor would it cause vertical integration of firms. Also, it provides total transparency of the incidence of tax. This is because, VAT is a multi-stage sales tax levied as a proportion of the value added. It is collected at each stage of the production and distribution process, and in principle, its burden falls on the final consumer.

Another feature of VAT regime is discontinuation of the sales tax based incentives to new industrial units. Until now, all the states were granting such incentives to new industries in the form of exemption from tax on the purchase of inputs as well as on the sale of finished goods, sales tax loans and/or tax deferral.

**VAT in Maharashtra**

Maharashtra State has introduced VAT system in Sales Tax with effect from 1st October 1995. VAT means Value Added Tax. In simple Words VAT system means paying tax on sales and getting back the tax paid on the purchase. The net burden of the tax is limited to the extra tax payable on the difference between the sale-price and purchase-price, which will be equal to the amount of expenses and profit present in the sale price.

Section 12-A of Bombay Sales Tax Act 1959 has been amended by Act 16 of 1995 by substituting Subsection (3). By this new sub section the dealers having turnover of above Rs. 1 crore are denied the claim of resale of goods purchased from registered dealers. That means they will have to pay taxes on their resale, which were not taxable according to earlier provisions. When they pay taxes on the resale they will be entitled for the refund of the amount of tax paid on the purchases. For the purpose subsection (4) provides for set off to be calculated on the purchase price of the goods for which the deduction of resale has been denied

Scanned by CamScanner

on sales side. According Rule 42-H and 46-B has been amended to provide for set off on the purchases related to resale on which tax is to be paid under VAT system.

**THE MERITS OF VAT**

